
सोलापूर तरुण भारत
आसमंत



# बटेंगे तो कटेंगे!

**काँग्रेसकडून होत असलेला जातीनिहाय जनगणनेचा आग्रह हा भारताच्या आणखी एका फाळणीची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी केला जात आहे. काँग्रेसकडून वरकरणी आर्थिकदृष्ट्या मागास जातींना राखीव जागा देण्याचा उद्देश सांगण्यात येत असला, तरी हा तर्क लवकरच भारतातील मुस्लीम आणि ख्रिस्ती धर्मीयांना लागू केला जाईल. त्यानंतर मागास जातींच्या समुदायाप्रमाणेच मुस्लिमांना स्वतंत्र राखीव जागा देण्याची मागणी रेटली जाईल आणि त्याचे पर्यवसान भारताची पुन्हा फाळणी होण्यात होईल. त्यामुळे सर्वच धर्मांतील जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे.**

लक्ष्यवेध

**प्रतिनिधी**

काँग्रेसकडून, विशेषत: त्या पक्षाचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्याकडून देशात जातीनिहाय जनगणना करण्याचा आग्रह धरला जात आहे. जातीनिहाय जनगणनेची मागणी चुकीची नसली, तरी त्यामागील काँग्रेसचा उद्देश मात्र वाटतो तितका सरळ नाही. काँग्रेसला हा मुद्दा निवडणुकीत मते मिळवून देणारा वाटतो आणि त्यांच्या नेत्यांच्या आकलनानुसार या मुद्द्यावर भाजपला बचावात्मक पवित्रा घ्यावा लागत आहे. त्यामुळे काँग्रेसकडून जातीनिहाय जनगणनेची मागणी जोरकसपणे रेटली जात आहे.

राहुल गांधी यांनी तर 'भारतसुंदरी'सारख्या सौंदर्यस्पर्धांमध्येही स्पर्धकांच्या जातींचा शोध घेण्याचा प्रयत्न करून या मुद्द्यावर आपण किती टोकाला जाऊ शकतो, ते दाखवून दिले. त्यांच्या त्या वक्तव्याची खिल्ली उडविण्यात आली असली, तरी या प्रश्नावर आपली भूमिका अधिक बळकट करण्याची त्यांना संधी मिळाली, हेही तितकेच खरे.

आगामी विधानसभा निवडणुका आणि उत्तर प्रदेशातील विधानसभा पोटनिवडणुकीत हा मुद्दा कदाचित मतांचे ध्रुवीकरण करू शकतो, ही शक्यता लक्षात आल्यामुळेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हा मुद्दा गांभीर्याने घेतला आहे. रा. स्व. संघात जात-पात मानली जात नाही. संघात जातीनुसार प्रवेश किंवा पदेही दिली जात नाहीत, हेही सर्वांना ठाऊक आहे. तरीही संघाने जातीनिहाय जनगणनेस पाठिंबा दर्शविला आहे. याचे कारण या आकडेवारीमुळे देशात प्रत्येक जातीची आर्थिक व सामाजिक स्थिती काय आहे, ते समजण्यास मोठी मदत होईल. त्याचा उपयोग सरकारला आपल्या नव्या योजना आणि आर्थिक धोरण निश्चित करण्यास होईल. तसे झाल्यास गरजू समाजापर्यंत सरकारी योजनांचे लाभ अधिक प्रकर्षाने पोहोचविता येतील, हा त्यामागील विचार. थोडक्यात, संघाला या जनगणनेचा वापर समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी होणे अपेक्षित आहे.

संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी जातीनिहाय जनगणनेचे स्वागत करताना हाच मुद्दा अधोरेखित केला. सामाजिक किंवा आर्थिकदृष्ट्या कोणत्या जाती मागास आहेत, ते स्पष्ट होण्यासाठी सरकारला आकडेवारीची गरज लागल्यास त्यासाठी जातीनिहाय जनगणना उपयुक्त ठरेल. अशा जातींपर्यंत सरकारी योजनांचे लाभ पोहोचविण्यासाठी जातीनिहाय जनगणना खूप उपयुक्त ठरू शकते, असे ते म्हणाले. मात्र, या आकडेवारीचा उपयोग राजकीय स्वार्थासाठी केला जाण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. भारतात जात हा संवेदनशील मुद्दा असून, देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने जातीजातींमधील संबंध हेही महत्त्वाची भूमिका बजावतात, असे सांगून ते म्हणाले की, या मुद्द्याचा संकुचित राजकीय लाभासाठी वापर होऊ नये. यातील विरोधाभास असा की, स्वातंत्र्यानंतर किमान ५५ वर्षे देशात काँग्रेस पक्षाची सत्ता होती. २००४ ते २०१४ या काळातही काँग्रेस सत्तेत होती. पण, आपल्या कार्यकाळात काँग्रेसने जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा कधीच उपस्थित केला नाही. उलट, या पक्षाने त्यास विरोधच केला. पण, २०१९ मध्ये सलग दुसऱ्यांदा लोकसभा निवडणूक हरल्यानंतर काँग्रेसने अचानक जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा उचलून धरला आणि आता त्या पक्षाने त्याला आपला प्रमुख मुद्दा बनविला आहे. यातही गंमत म्हणजे, ज्या राज्यांमध्ये काँग्रेसची सत्ता आहे, तेथील सरकारांनी जातीनिहाय जनगणना केली असली, तरी त्याची आकडेवारी जाहीर केलेली नाही. कर्नाटक राज्यात अशी जातीनिहाय जनगणना करण्यात आली असली, तरी तेथील सरकारने ती जाहीर केलेली नाही. बिहारमध्ये जेडीयू व राजद या पक्षांच्या मदतीने काँग्रेस सत्तेत असतानाही अशी जनगणना झाली होती.

जातीनिहाय जनगणना ही एरवीही जनगणनेच्या कामाचा एक भाग असतो. पण, सरकार आजवर जातीनिहाय धार्मिक लोकसंख्या जाहीर करीत नसे. लोकसंख्येत हिंदू-मुस्लीम-ख्रिस्ती वगैरे प्रमुख धर्मीयांचे प्रमाण किती, तेवढेच जाहीर केले जात असे. आता केवळ हिंदू समाजातील जातींचे प्रमाण आणि त्यांची आर्थिक स्थिती जाहीर करण्याची मागणी केली जात आहे. पण, जातीनिहाय जनगणना करायची असेल, तर सर्वच धर्मांतील जातींची जनगणना केली पाहिजे. जातीव्यवस्था फक्त हिंदू धर्मात आहे, हा आजवरचा सर्वात मोठा भ्रम असून तो राजकीय कारणास्तव हेतूतः जोपासला गेला आहे. भारतात सर्वच धर्मांच्या लोकांमध्ये काही प्रमाणात जातीव्यवस्था अस्तित्वात आहे. मुस्लीम समाजात अनेक जाती आहेत. शिवाय, शिया व सुन्नी या प्रमुख पंथांसह अहमदिया, बोहरी, आगाखानी खोजा वगैरे अनेक उपपंथही आहेत. या सर्व समाजांची आर्थिक स्थिती भिन्न आहे. ख्रिस्ती धर्मातही कॅथलिक, कॅथलिक सीरियन, मलबारी वगैरे उपपंथ आहेत. तीच स्थिती शीखांची आहे. त्यामुळे जातीनिहाय जनगणना ही सर्वधर्मीयांची झाली पाहिजे. सध्या तरी काँग्रेस आणि तिच्या मित्रपक्षांकडून केवळ हिंदू धर्मीयांना लक्ष्य केले जात आहे. त्याचे कारण २०१९ मधील लोकसभा निवडणुकांचे निकाल. केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यापासून हिंदू समाज एकजूट होऊ लागला आहे. काँग्रेसच्या आजवरच्या मुस्लीम लांगूलचालनाच्या राजकारणाचे दुष्परिणाम काय आहेत, त्याची झळ हिंदू समाजाला जाणवू लागली होती. मोदींच्या नेतृत्वाखाली हिंदू समाज एकवटू लागल्याने काँग्रेसला आपला राजकीय अंत दिसू लागला होता. हिंदू मतांमध्ये फाटाफूट केल्याशिवाय आपले राजकीय अस्तित्व नष्ट होईल, हे लक्षात आल्यानेच काँग्रेसला एकाएकी जातीनिहाय जनगणनेचा साक्षात्कार झाला. हिंदूंमध्ये जातीच्या मुद्द्यावर फूट पाडणे हे अतिशय सोपे काम होते. आता मागास जातींचा आधार घेऊन त्यांना अधिक वाटा देण्याची मागणी काँग्रेसकडून केली जात आहे. त्यामागील खरा उद्देश हा निकष मुस्लीम समाजालाही लागू करणे हा आहे. मुस्लीम समाजही मागास आहे, असे भासवून त्यांना स्वतंत्र राखीव जागा देण्याची मागणी काँग्रेसकडून केली जाईल. त्याचे अंतिम पर्यवसान देशाची आणखी एकदा फाळणी करण्यात होईल, याची दाट शक्यता आहे. ही अतिशयोक्ती नाही. स्वातंत्र्यापूर्वीही याचप्रकारे देशाच्या मुस्लीमबहुल प्रांतांचे रुपांतर पाकिस्तानात करण्यात आले होते. म्हणूनच जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा गांभीर्याने आणि तारतम्याने घेतला पाहिजे आणि योगी आदित्यनाथ यांचा 'बटेंगे तो कटेंगे' हा संदेश लक्षात ठेवला पाहिजे.

# पाकिस्तानसमोर नव्या 'बलु'च्या बंडाचे आव्हान

**मागील काही दिवसांत पाकिस्तानातील बलुच आंदोलनाने उग्र स्वरुप धारण केले असून, सैन्यावरील जीवघेणे हल्ले शरीफ सरकारच्या जिव्हारी लागले आहेत. त्यानिमित्ताने पाकिस्तानपासून कायमच स्वतंत्र होण्याची मागणी करणारा बलुचिस्तान प्रांत, त्यासाठीची बलुची आंदोलने आणि भारताची भूमिका यांचा आढावा घेणारा हा लेख...**


परराष्ट्रकारण

**अनय जोगळेकर**

पाकिस्तानचा सर्वात मोठा प्रांत असलेल्या बलुचिस्तानमध्ये हिंसाचाराने पुन्हा एकदा थैमान घातले आहे. 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी'ने २६ ऑगस्ट रोजी मुसाखेल, पिशिन, क्वेट्टा, सिबि, मस्तुंग, कलात, बोलान, पंजगुर, बेला, तुर्बात, संतसर आणि पासनी येथे हल्ले केले. त्यात पाकिस्तानचे १०२ सैनिक मारले गेल्याचा दावा करण्यात आला. बेला येथील हल्ल्यात एकाच ठिकाणी ४० सैनिकांना मारल्याचा दावा करण्यात आला. २६ ऑगस्ट हा बलुचिस्तानचे माजी मुख्यमंत्री नवाब अकबर शाहबाझ खान बुग्ती यांचा स्मृतिदिन होता. प्रारंभीच्या काळात पाकिस्तानी सैन्य आणि सरकारसोबत जुळवून घेणाऱ्या बुग्तींनी जनरल परवेझ मुशर्रफ यांच्या काळात सशस्त्र बंड केले होते. २००६ साली याच दिवशी पाकिस्तानच्या सैन्याने केलेल्या कारवाईत त्यांची हत्या करण्यात आली होती.

भारताच्या फाळणीच्या वेळेस स्वतंत्र देश होऊ इच्छिणारा बलुचिस्तान पाकिस्तानने बळजबरीने आपल्यात विलीन करुन घेतला. तेव्हापासून बलुच लोकांचा संघर्ष सुरु असला, तरी या संघर्षाचे स्वरुप आणि व्याप्ती बदलली आहे. १५ ऑक्टोबर आणि १६ ऑक्टोबर या कालावधीत पाकिस्तानमध्ये शांघाय सहकार्य परिषदेची बैठक आयोजित करण्यात आली असून त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही निमंत्रित करण्यात आले आहे. पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी म्हटले आहे की, बलुचिस्तानमधील हल्ले हा शांघाय सहकार्य परिषदेला दिलेला इशारा आहे. त्यांच्या विधानात तथ्य आहे. चीन शांघाय सहकार्य परिषदेच्या केंद्रस्थानी आहे. मध्य अशियातील भूतपूर्व सोव्हिएत देशांना त्यात केंद्रस्थानी ठेवले असले, तरी त्यातून चीनचा उद्देश एकीकडे अरबी समुद्र, तर दुसरीकडे युरोपशी जोडणार्या मार्गिका उभारणे हा आहे. चीनचा 'बेल्ट रोड प्रकल्प' सुरु होण्याच्या पूर्वीपासूनच त्याने चीन- पाकिस्तान आर्थिक मार्गिकेत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. ही मार्गिका चीनच्या पूर्व किनार्याला तिबेट, सिंकियांग आणि पाकिस्तानमार्गे अरबी समुद्राशी जोडते. बलुचिस्तानमधील ग्वादर बंदर हे या मार्गिकेचे केंद्रस्थान आहे.

बलुचिस्तानचा आकार पाकिस्तानच्या ४० टक्के इतका असला, तरी बलुची लोकांची संख्या अवघी ७० लाखांच्या आसपास आहे. बलुच लोक टोळ्यांमध्ये विभागले असून त्यात बुग्ती आणि मर्री या टोळ्या सगळ्यात मोठ्या आहेत. गेल्या सात दशकांमध्ये बलुचिस्तानमध्येही छोटी, मध्यम शहरे विकसित झाली आहेत. पुढच्या पिढीतील बलुच तरुणांनी पाकिस्तान किंवा ब्रिटन आणि अमेरिकेत जाऊन शिक्षण घेतल्यामुळे त्यांच्यातून नवीन नेतृत्व उदयास आले आहे. त्यांना पाकिस्तानच्या सत्तेमध्ये समान वाटा हवा आहे. आपल्या प्रांतासंबंधीचे निर्णय घेण्याचे अधिकार हवे आहेत. पण, त्यांना विकास प्रक्रियेत सामील न करता पाकिस्तानने त्यांची चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानने आपल्या पंजाब आणि अन्य प्रांतांतून लोक आणून बलुचिस्तानची लोकसंख्या बदलण्याचे प्रयत्न चालवले आहेत. **(पान ४ वर)**






# रूपे गणेशाची...

**श्रीगणेशाचे मंगलमय आगमन हा समस्त जनांमध्ये आनंदाचा महापूर आणणारा क्षण असतो. भारतात गणेशाच्या नानाविध मूर्ती आढळतात. त्यामधील वैविध्य अभ्यासकांबरोबरच श्रद्धाळूंनाही मोहित करून टाकते. त्यामुळेच गणेशमूर्तींचा अभ्यास आणि त्यातून प्राचीन काळात डोकावण्याची, तो काळ अभ्यासण्याची उपलब्ध होणारी संधी हा अनेकांच्या औत्सुक्याचा विषय राहतो. गणेशमूर्तींच्या या अनुपम सौंदर्याविषयी...**

निमित्त

**डॉ. गो. बं. देगलूरकर**

सर्वत्र गणपतीचे आगमन झाले आहे. हा सगळा काळ श्रद्धा, भक्ती, आराधना यांनी भारलेला असतो. आपण जाणतो की, घरात पूजला जाणारा गणेश, हा उत्सव लोकमान्य टिळकांनी समाजाभिमुख केला आणि तेव्हापासून गणपतीचे माहात्म्य इतरेजनांना समजू लागले. उत्सवात त्यांचा सहभाग वाढू लागला. साहजिकच यानिमित्ताने त्यांच्या मनात गणेशाबद्दल कुतूहल निर्माण झाले. उत्सवाच्या निमित्ताने गणेशाच्या वेगवेगळ्या पद्धतीच्या मूर्ती तयार केल्या जाऊ लागल्या. आपण गणेशाच्या मूर्तींसंदर्भात विचार करतो तेव्हा लक्षात येते की, एकेकाळी भारतात नाना प्रकाराने गणपतीच्या मूर्ती निर्माण झाल्या.

ऐतिहासिकदृष्ट्या किंवा पुरातत्त्वदृष्ट्या पाहिले तर आपल्याला माहिती असणाऱ्या काळापासून म्हणजेच कुषाणकाळापासून गणपतीच्या मूर्ती मिळू लागल्या आहेत. इसवी सनाच्या पाचव्या-सहाव्या शतकात गणेशाची रूपे विशेषत्वाने लक्षात येऊ लागली. साधारणत: आठव्या-नवव्या शतकानंतर मोठा आणि महत्त्वाचा देव म्हणून, ६४ कलांचा; अनेक विद्यांचा अधिपती म्हणून लोक त्याकडे पाहायला लागले. हळूहळू त्याची मोठ्या प्रमाणात पूजा होऊ लागली. अर्थात या उत्सवाचे प्रचंड स्वरूप लोकमान्य टिळकांनी निर्माण केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या निमित्ताने पाहायला मिळाले.

गणपतीच्या किती प्रमाणात आणि कशा कशा मूर्ती आहेत, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. आज संशोधन करताना मला अशा नानाविध गणेश मूर्ती पाहायला मिळाल्या. त्यामधील वैविध्य पाहूनच हा देव सर्वव्यापी, सर्वसाक्षी असल्याची जाणीव होते. विशेष म्हणजे ज्ञानेश्वरीमध्ये ज्या गणपतीचे वर्णन केले आहे, तो षड्भूज म्हणजेच सहा हातांचा गणेश आहे. साधारणत: गणपतीच्या मूर्ती २-४-६-८ ते १०-१२-१४ आणि २० हातांपर्यंतही बघायला मिळतात. भक्त वाढत जातात तशा देवाकडून त्यांच्या अपेक्षाही अधिक असतात. अपेक्षापूर्तीच्या दृष्टीने भक्तच देवाचे अनेक हात अभिप्रेत धरतो. याच कारणाने गणपतीच्या २० हातांपर्यंतच्या मूर्ती आपल्याला मिळतात. पण ज्ञानेश्वरीतील उल्लेख सहा हातांचा आहे. असे गणपती एका अर्थी दुर्मिळ असतात, असे म्हणता येईल. याचे कारण म्हणजे, विविध प्रकारच्या गणेशमूर्ती मिळत असल्या वा निर्माण केल्या गेल्या असल्या, तरी सहा हातांचे गणपती फार नाहीत. मी ग्वाल्हेरच्या झाशीच्या राणीच्या महालातील मूर्तींच्या वस्तुसंग्रहालयाला भेट दिली, तेव्हा तिथे अशा सहा हातांच्या गणेशमूर्ती बघायला मिळाल्या. अधिक लक्ष देता या मूर्तींचे वर्णन ज्ञानेश्वरीच्या नमनाच्या ओव्यांमध्येच दिसते. **देखा षड्दर्शने म्हणिपती। तेचि भुजांची आकृती।। म्हणऊनि विसंवादे धरिती। आयुधे हाती।। तरी तर्क तोचि परशु। नीतिभेदु अंकुशु।। वेदांतु तो महारसु। मोदकाचा।। एके हाति दंतु। जो स्वभावता खंडितु।। तो बौद्धमत संकेतु। वार्तिकांचा।। मग सहजे सत्कारवादु। तो पद्मकरु वरदु।। धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु। अभयहस्तु।।** असे म्हणत ज्ञानेश्वर इथे एक रूपक साधतात. आधी उल्लेख केल्याप्रमाणे गणपतीच्या अशा मूर्ती दुर्मिळ असतातच; पण त्यातही नृत्य षड्भूज गणेश अत्यंत दुर्मिळ आहे.

गणेशाच्या नृत्यमूर्ती आढळतात. आपण त्याला नृत्यगणेश म्हणतो. पण सहा हातांचा गणेश नृत्य करीत असल्याची मूर्ती सापडणे अत्यंत दुर्मिळ आहे. महाराष्ट्रच नव्हे तर भारताच्या दृष्टीने बघायचे तर अशी एकमेव मूर्ती नांदेड जिल्ह्यात देगलूरजवळ एका गावात आढळते. तो नृत्य गणेश असून सहा हातांचा आहे आणि ज्ञानेश्वरीमध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याच्या हातात आपल्याला सर्व आयुधे दिसतात. अशाच गणपतीची एक मूर्ती सिम्बॉयोसिस संस्थेच्या मुलींच्या मेडिकल कॉलेजमागील गणपती देवळात प्रतिस्थापित करण्यात आली आहे. गणपतीच्या इतर मूर्तींसंदर्भात विचार करतो तेव्हा एकमुखी गणपती तर दिसतोच; पण त्याची अनेक मुखे असणाऱ्या मूर्तींदेखील बघायला मिळतात. अशीच एक गणेशमूर्ती नेपाळजवळील पाटण येथे आपल्याला मिळते. ती सहा मुखांच्या गणेशाची असल्यामुळे दुर्मिळात दुर्मिळ समजली जाते. गणपतीच्या पाच मुखांच्या मूर्ती अधिक प्रमाणात आढळत असल्या, तरी त्यातही दोन प्रकार आहेत. एकाला महागणपती म्हणतात. त्याला ५ मुख, १० हात असतात. त्याच्याजवळ वाहन म्हणून फक्त उंदीर असतो. पण त्यातील एक प्रकार असणारा हेरंब ५ मुखाचा, १० हाताचा असला, तरी त्याबरोबर वाहन म्हणून सिंह असतो. म्हणजेच उंदराबरोबरच सिंहदेखील बघायला मिळतो.

थोडक्यात, हेरंब आणि महागणपतीमधला हा फरक लक्षात राहतो. उंदराशिवाय गणपतीचे दुसरे एक वाहन म्हणजे मोर. मयुरेश्वर गणपतीचे वाहन मोर आहे. गणेशाच्या अशाही मूर्ती दिसतात. एका अर्थी ही गणपतीची माहिती झाली. **(पान ४ वर)**

# अमेरिकेच्या मातीच्या कणाकणांत शेक्सपिअर



विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले

तुम्ही पु. ल. देशपांड्यांचा 'वाऱ्यावरची वरात' हा फर्मास तमाशा पाहिलाय का? असे दचकू नका. मी बरोबर शब्द वापरलाय. 'वाऱ्यावरची वरात' हा तमाशाच आहे. हल्ली 'तमाशा' हा शब्द उगीचच बदनाम झालाय. तमाशा म्हणजे पाचकळ, द्वयर्थी विनोद आणि उत्तान शृंगारिक नाच, लावण्या यांनी मंचावर घातलेला धुडगूस, असे जे रूप त्याला प्राप्त झाले आहे, त्याला मराठी चित्रपट मुख्यत: कारणीभूत आहेत. मुळातला तमाशा किंवा नाटकाचा तमाशा हे एक अतिशय समकालीन, प्रवाही, रसरशीत असे लोकनाट्य होते.

समकालीन घटनांवरचा अतिशय खुसखुशीत विनोद आणि त्याचा जोडीला नृत्य-नाट्य-गीत आणि संगीत यांची बहारदार मेजवानी, असे या लोकनाट्याचे सैलसर रूप असायचे. सुरुवातीच्या अर्ध्या भागात गण, गौळण, बतावणी, रंगबाणीचा फार्स अशा छोट्या-छोट्या नाटिका किंवा सध्याच्या 'हास्यजत्रा' भाषेत 'स्किटस्' असायची. मध्यंतरानंतरच्या अर्ध्या भागात वग म्हणजे एक सलग कथा उलगडून सांगणारे नाटक असायचे. तमाशाच्या फडाचा प्रमुख ज्याला सरदार किंवा नाईक असे म्हणत, तोच या नाटकाच्या तमाशाचा निर्माता, दिग्दर्शक, लेखक सर्व काही असे. आता हा फॉर्म्युला 'वाऱ्यावरची वरात'ला लावून पहा. उत्तरार्धात 'एका रविवारच्या कहाणी'मधून चाळमालक बापूसाहेब आणि त्यांच्या घरात गाणी-बजावणी करण्यासाठी जमलेले त्यांच्या चाळीतले एकापेक्षा एक भारी नमुने यांनी विनोद आणि नाट्यसंगीताची बहार उडवून दिलेली आहे. तर, पूर्वार्धात गरुडछाप तपकिरीची फिरता विक्रेता, महाराष्ट्रगीत, दारू म्हणजे मादक पेय हा शाळकरी मुलांचा संवाद इत्यादी नाटुकल्यांमधून समाजातला अनेक समकालीन घटनांच्या, व्यक्तींच्या, प्रवृत्तींच्या फर्मास फिरक्या घेण्यात आल्या आहेत. यातलेच एक नाटुकले एका शाळेत घडते आहे.

मंचावर अध्यक्ष म्हणून साहित्यिक पु. ल. देशपांडे विराजमान झाले आहेत. भाषणात दर एका वाक्याला चार शिव्या हासडणारा शाळेचा मुख्याध्यापक, 'बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी देशपांडे आणि आजचे आमचे हे नुसतेच देशपांडे' असा उल्लेख करीत सगळ्यांचाच निकाल लावतो. मग शाळेच्या आश्रयदात्या आणि गावातल्या महिला मंडळाच्या अध्यक्ष सौभाग्यवती गुणवंताबाई बेचरदास शाह यांचे भाषण होते. त्या म्हणतात, 'आम्ही सारख्या एका फॉरेनहून दुसऱ्या फॉरेनला फिरत असतो. नुकताच आम्ही अमेरिकेच्या फॉरेनला जाऊन आलो. तिथे आम्ही शेक्सपिअरचे थडगे पाहिले.' इथे पु. ल. म्हणतात, 'अहो, शेक्सपिअरचे थडगे इंग्लंडमध्ये आहे.' एखाद्या मच्छराचे हाताने निवारण करावे तसे अध्यक्षपदावरच्या पु. लं. ना झटकून टाकीत गुणवंताबाई म्हणतात, 'आम्ही या-या डोळ्यांनी पाहिले. शेक्सपिअरचे थडगे अमेरिकेत आहे. अमेरिकेच्या मातीच्या कणाकणांत शेक्सपिअर आहे.' महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातल्या शाळा, शिक्षक, विद्यार्थी, महिला मंडळे, त्यांची राजकारणे या सगळ्यांची अतिशय भेदक आणि कदाचित म्हणूनच अत्यंत मनोरंजक अशी खिल्ली या नाटुकल्यात उडवण्यात आलेली आहे. शेक्सपिअर खरोखरच अमेरिकेच्या मातीच्या कणाकणांत आहे. निदान असावा, अशी अमेरिकेच्या म्हणजे आधुनिक अमेरिकन राष्ट्राच्या 'फाऊंडिंग फादर्स'ची इच्छा होती, असे एमिली फोल्गर हिनेच म्हटले आहे. कोण होती ही एमिली फोल्गर? एका फॉरेनहून दुसऱ्या फॉरेनला जाणारी कुणी गुणवंताबाई बेचरदास शाह नव्हती. स्टँडर्ड ऑईल या जगद्विख्यात तेल कंपनीचा अध्यक्ष हेन्री क्ले फोल्गर याची विद्वान, साहित्यप्रेमी आणि दानशूर पत्नी होती. ओ खर्डे घासे पत्रकार स्तंभलेखक, काय भंकस लावलीय राव तुम्ही? पु. ल. देशपांडे काय, तमाशा काय. शेक्सपिअर काय, अमेरिकेचे फाऊंडिंग फादर्स काय, नेमके सांगताय तरी काय तुम्ही आम्हाला? का गोविंदाला दह्यादुधाऐवजी भलताच कोणता द्रवपदार्थ पोटात ढकललाय? थांबा, थांबा; प्रिय वाचक, असे एकदम एकेरीवर येऊ नका. सगळे काही तुम्हाला अगदी बयाजवार म्हणजे क्रमाने सांगतो. सन १७७५ साली अमेरिकेतले १३ प्रांत किंवा संस्थाने एकत्र आली आणि त्यांनी आपला मूळ मायदेश जो इंग्लंड त्याच्याविरुद्ध बंड पुकारले. हेच ते प्रसिद्ध अमेरिकन क्रांतियुद्ध. या युद्धाच्या नेत्यांना युरोपातल्या गलिच्छ राजकारणाचा अगदी वीट आला होता. त्यामुळे त्यांनी त्यांच्या नव्या देशाची राज्यघटना लिहीत असताना अनिर्बंध सत्ता आणि सत्ता राबवणाऱ्या व्यक्तींची अनिर्बंध सत्तालालसा यांच्यावर शक्य तितके अंकुश लावून सत्ता ही लोककल्याणासाठीच राबवली जाईल, असे पाहिले. या नेत्यांना 'फाऊंडिंग फादर्स ऑफ अमेरिका' असे म्हटले जाते. हे एकंदर १६ जण होते. आज त्यांच्यापैकी फारच प्रसिद्ध असलेले म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टन, बेंजामिन फ्रँकलीन, टॉमस जेफरसन, अलेक्झांडर हॅमिल्टन, जॉन ॲडम्स आणि सॅम्युअल ॲडम्स. १७८९ साली 'अमेरिक संयुक्त संस्थाने' या स्वतंत्र आणि सार्वभौम लोकशाही राष्ट्राचा जॉर्ज वॉशिंग्टन हा पहिला राष्ट्राध्यक्ष बनला. प्रथमपासूनच हे नवे राष्ट्र युरोपीय गुंतागुंतीच्या राजकारणापासून दूर राहून आपली वेगळी वाटचाल करीत राहिले पण सत्तरेक वर्षांतच ते यादवी युद्धाच्या वावटळीत सापडले. आफ्रिकेतल्या काळ्या लोकांना युरोपीय गोऱ्या लोकांनी गुलाम म्हणून राबविण्यासाठी पळवून आणले होते. ही गुलामगिरीची प्रथा चालू ठेवणे हा लोकशाहीची उच्च मूल्ये सांगणाऱ्या अमेरिकन राष्ट्रावरचा कलंक होता. त्यावरून यादवी युद्ध पेटले. पण शाबास त्या राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकनची. युद्ध पेटलेले असतानाच त्याने गुलामगिरी रद्द करणारा कायदा संमत करून टाकलासुद्धा. आणि मग रुबाबात युद्ध पण जिंकले. हे सर्व १८६१ ते १८६५ या काळात घडले. यानंतर सन १९०० पर्यंतच्या काळात अमेरिकेने संशोधन, विकास, विज्ञान, तंत्रज्ञान अशा सर्व भौतिक क्षेत्रांमध्ये युरोपच्या पुढे एकदम मुसंडीच मारली.

ऑटोमोबाईल इंजिनचा शोध आणि त्याचे इंधन असणारे तेल यांचा भावी काळात प्रचंड मागणी येणार हे ओळखणारे उद्योजक मुख्यत: अमेरिकन होते. त्यांनी भराभर तेल कंपन्या काढल्या. मोथिल, एक्झॉन, शेव्हरॉन, टेक्साको आता पुढच्या काळात दिगंत गाजलेल्या तेल कंपन्यांनी तेल विहिरी शोधून काढल्या आणि प्रचंड संपत्ती कमावली. यापैकीच एक होता स्टँडर्ड ऑईल कंपनीचा अध्यक्ष हेन्री क्ले फोल्गर. हा अमेरिकन राज्यघटनेचा एक लेखक बेंजामिन फ्रँकलिन याचा दूरचा नातेवाईक होता. आपला साधारणपणे असा अनुभव असतो की, यशस्वी धंदेवाला माणसाचा वाङ्मय, साहित्य, ग्रंथ यांच्याशी संबंध नसतो. छापलेल्या पुस्तकांपेक्षा नोटा छापण्यात त्याला जास्त स्वारस्य असते. पण हेन्री फोल्गर वेगळा माणूस होता. स्टँडर्ड ऑईलचा ताळेबंद तो जितक्या आनंदाने वाचत असे, तितकाच किंबहुना जरा जास्तच आनंदाने तो शेक्सपिअर वाचत असे. त्यामुळेच एमिली जॉर्डन ही हुशार, रसिक वाचक आणि विदुषी स्त्री त्याची पत्नी झाली. दोघांनी मिळून शेक्सपिअरच्या स्वत:च्या पुस्तकांबरोबरच शेक्सपिअरवर लिहिले गेलेले साहित्य जमा करायला सुरुवात केली.

विल्यम शेक्सपिअर हा इंग्लंडच्या वॉरविकशायर परगण्यातल्या स्ट्रटफर्ड-अपॉन-ॲव्हॉन या खेड्यात सन १५६४ साली जन्मला. साधारण सन १५८५ साली तो लंडनला आला. सन १६१६ साली मृत्यू होईपर्यंत त्याने ३९ नाटके, १५४ सुनीत काव्ये आणि ३ खंडकाव्ये रचली. राणी एलिझाबेथ पहिली हिच्या राजवटीचा हा काळ होता. इंग्लंडची युरोपात एक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू होती. नेमक्या या बहाराच्या काळात शेक्सपिअरची अनेक नाटके रंगमंचावर आली आणि अतोनात गाजली. नुसते तेवढेच नव्हते. शेक्सपिअरच्या नाटकांमधून, काव्यांमधून मानवी स्वभाव वैशिष्ट्यांचे जे सूक्ष्म दर्शन घडत होते ते फारच उच्च दर्जाचे. अभिरुचीचे आणि सार्वकालिक होते. त्यामुळे सर्वसामान्य आणि दर्दी रसिक सगळेच थरारून गेले. शेक्सपिअरच्या समग्र साहित्याची पहिली छापील आवृत्ती त्याच्या मृत्यूनंतर सन १६२३ साली निघाली. तिला म्हणतात 'फर्स्ट फोलिओ.' असे मानले जाते की, या फस्ट फोलिओ आवृत्तीच्या त्यावेळी फक्त ७५० प्रती छापण्यात आल्या होत्या. आज यापैकी फक्त २३५ प्रती जगभरच्या विविध संग्राहकांकडे आहेत आणि त्यातल्या तब्बल ८२ प्रती हेन्री फोल्गरकडे आहेत. वेगवेगळ्या संग्राहकांकडून त्याने त्या म्हणतील त्या किमतीला खरीदल्या होत्या. सर्वात महाग प्रत त्याने १९०३ साली ४८ हजार ७३२ डॉलर्स देऊन मिळविली होती. या फर्स्ट फोलिओ खेरीज शेक्सपिअरची नि शेक्सपिअरविषयक अशी एकंदर २ लाख ७७ हजार पुस्तके आणि ६० हजार हस्तलिखिते असा हा अतिशय समृद्ध संग्रह आहे.

१९३० साली हेन्री फोल्गर मरण पावल्यावर १९३२ साली फमिली फोल्गरने 'फोल्गर शेक्सपिअर लायब्ररी' अशी भव्य वास्तूच उभी केली. कुठे? तर अमेरिकेची राजधानी असणाऱ्या वॉशिंग्टन शहरातच अमेरिकन संसद आणि अमेरिकन सर्वोच्च न्यायालय या लोकशाही मूल्य व्यवस्था सुदृढ करणाऱ्या विशाल इमारतीच्या कॅपिटॉल हिलवर आहेत. अगदी तिथेच, फोल्गर शेक्सपिअर लायब्ररीच्या स्थापनेच्या वेळी एमिली फोल्गर म्हणाली होती, 'हा कवी आमचा (म्हणजे अमेरिकेचा) एक महान प्रेरणास्त्रोत आहे. एक असा स्त्रोत की, ज्याच्यापासून आम्ही अमेरिकन लोक राष्ट्रीय विचार, श्रद्धा आणि अक्षय आशा मिळवत राही.' पुढे ती म्हणते, 'अमेरिकन राज्यघटनेच्या निर्मात्यांनादेखील शेक्सपिअरबद्दल आदर होता. कारण त्याच्या व्यक्तिरेखांमधील अन्यायी हुकूम शहांमुळे, अनिर्बंध होऊ पाहणाऱ्या सत्ताधाऱ्यांना व्यवस्थेचे लगाम कसे लावायचे, हे त्यांना समजले. तर, अशी ही फोल्गर लायब्ररी २०२० पासून नूतनीकरणासाठी बंद होती. ती आता पुन्हा सुरू झाली आहे. तब्बल ८० कोटी ५० लक्ष डॉलर्स खर्चून झालेले हे नूतनीकरण अर्थातच विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे समृद्ध आहे. 'फर्स्ट फोलिओ' आवृत्तीच्या ८२ प्रती हा या लायब्ररीचा सगळ्यात मोठा आकर्षण बिंदू आहे. त्या सर्वांच्या सर्व प्रती काचेच्या कपाटांमधून मांडलेल्या आहेत. तुम्ही त्या आभासी पद्धतीने चाळूसुद्धा शकता. वेळोवेळी युरोपीय किंवा अमेरिकन संशोधकांनी अशी संशोधने मांडलेली आहेत की, शेक्सपिअर नावाचा खराखुरा माणूस कधी अस्तित्वातच नव्हता किंवा शेक्सपिअरची म्हणून समजली जाणारी नाटके अन्यच लोकांची आहेत. या लोकांना आपल्या खऱ्या नावाने लोकांपुढे यायचे नव्हते. म्हणून त्यांनी आपली नाटके शेक्सपिअरच्या नावावर दाखवली. यांमध्ये ख्रिस्तोफर मार्लो, ऑक्सफर्डचा सरदार फडवर्ड डि व्हेर इत्यादी बरीच प्रसिद्ध मंडळी होती. फोल्गर ग्रंथालयाने असे संशोधन ग्रंथसुद्धा आवर्जून संग्रही ठेवले आहेत. एकंदरीत पु. लं.च्या गुणवंताबाईचा शेक्सपिअर खरोखरच अमेरिकेच्या मातीच्या कणाकणांत मुरलाय. आता पुढे डोनाल्डतात्या ट्रम्प आणि कमळाक्का हॅरिस त्याचे काय करतात बघूया. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

# कल्पवृक्ष- नारळ (श्रीफळ)



आजीचा बटवा

नारायण कारंजकर

भ्र. ९४२३७५८४०१

हिंदू संस्कृतीमध्ये नारळाने फार महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. जैन धर्मियातही नारळ महत्त्वपूर्ण मानला जातो. नारळ 'श्री' फळ असल्याने सर्वच धर्मियात त्याची ख्याती आहे. पूजेमध्ये तर श्रीफळ आवश्यकच असते, त्याशिवाय पूजेची सांगताच होत नाही. श्री गणेशोत्सवात गणपतीजवळ १० दिवस नारळही ठेवला जातो. तसेच खोबरे घालून केलेले मोदकही गणपतीपुढे ठेवले जातात. नवरात्रात घटस्थापना करताना जलकुंभावर नारळ ठेवून पूजा केली जाते. सत्यनारायणाच्या पूजेत नारळ असतो. तर शनिवारी श्रीशनिदेवास अगर मारुतीस, गुरुवारी श्री दत्तात्रेयास आदीप्रमाणे विविधवारी या वाराच्या देवास नारळ वाढविले जातात. देवाचे नवसही नारळाचे तोरण बांधून फेडले जातात. मंगलकार्यात तर नारळ आवर्जुन असतोच. देवधर्माप्रसंगी नारळ आणण्यात येत असल्याने त्यास 'श्रीफळ' म्हटले जाते. सुवासिनी ओटी भरताना तांदूळ, हळकुंडा बरोबरच खोबऱ्याची वाटी अवश्य ओटीत घालतात. नारळी पौर्णिमेस नारळाचा मोठ्या प्रमाणात. उपयोग केला जातो. तसेच विविध कार्यक्रमात नारळ देऊन सन्मान करण्याची, निरोप देण्याची प्रथा आहे. काही विशिष्ट वेळी 'नारळ दिला' असा वाक्य प्रचारही उपहासाने वापरतो.

**विविध पदार्थात वापर:-**

धर्मात जसे नारळाने स्थान मिळविले आहे' तसेच आहारातही नारळाने स्थान आपल्या अंगच्या: गुणाने प्राप्त केले आहे. विविध भाज्या, चटण्या, त्याचबरोबर डिंकलाडू, करंजा, मसालेभात, आदी असंख्य पदार्थात नारळाचा कमी अधिक प्रमाणात परवडेल तसा वापर केला जातो. खोबरेल तेलाचा केसास लावण्यास व खाद्यतेल म्हणूनही वापर केला जातो. ओला नारळ अगर खोबरे, नारळाचे तेल, नारळाची शेंडी, नारळाची करवंटी, नारळाचा; 'फड, नारळाचे लाकूड आदी सर्वच नारळाच्या झाडाचा भाग माणसाच्या उपयोगी .येत असल्याने' नारळास 'कल्पवृक्ष' म्हटले जाते. नारळाच्या झाडाचे विविध उपयोग काय काय आहेत ते व कोकणात नारळी, पोफळीच्या बागा असल्याचे लहानपणी भूगोलात वाचल्याचे चांगले आठवते. नारळासच मांड म्हणतात. विशेषतः समुद्रकिनारी नारळाची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. दक्षिण भारतात नारळाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. सोलापुरात सिध्देश्वर मंदिर परिसरात, हुतात्मा बागेत नारळाची असंख्य झाडे आहेत त्यांना फळेही येत असतात. आयुर्वेदात नारळासही मोठे महत्त्व आहे. असते. स्निग्धांश जास्त असतो. नारळात अ व ब जीवनसत्व काही प्रमाणात असते. स्निग्धांश जास्त असतो.

**विविध भाषी नावे:-**

नारळास संस्कृतमध्ये नारिकेल, पयोधर, दृढफल, सदाफल म्हटले जाते. तसेच हिंदीमध्ये, नारियल, गुजराती- नाळीमेर, इंग्रजी- कोकोनट, कानडी- टेंगिनकाई, लॅटिन- कोकोसा न्यूसीफेरा आदी विविध भाषेत नावे आहेत.

नारळ शोष, तृषा, पित्त, वातपित्त, रक्तदोष, दाह, दंतक्षय याचा नाश करणारा असून गुरु स्निग्ध, शीत, बालकर आदी त्याचे गुणधर्म आहेत.

**विविध औषधी उपयोग:-**

विविध पदार्थात वापर धर्मात जसे नारळाने स्थान मिळविले आहे तसेच आहारातही नारळाने स्थान आपल्या अंगच्या गुणाने प्राप्त केले आहे. विविध भाज्या, चटण्या, त्याचबरोबर डिंकलाडू, करंजा, मसालेभात, आदी. असंख्य पदार्थात नारळाचा कमी अधिक प्रमाणात 'देवाची करणी आणि नारळात पाणी' असे परवडेल तसा वापर केला जातो. खोबरेल आपण म्हणतो हे पाणी मधुर असते. ते भूक तेलाचा केसास लावण्यास व खाद्यतेल म्हणूनही वाढविणारे लघवी साफ करणारे, जळजळ थांबविणारे आहे. रक्तासारखी ओला नारळ अगर खोबरे, नारळाचे तेल, लघवीच्या वेळेस तिडीकं मारणे अगर वेदना होणे यावर ६ ते १० तोळे नारळाचे पाणी रोज प्यावे. गुणकारी आहे.

धुपनी हा भगिनी वर्गात आढळणारा आजार आहे. त्यामुळे अनुत्साह राहतो. अंगावरून तांबडे किंवा पांढरे नाही. कंबर दुखते. तोंडाची चव कमी होते. भूक लागत नाही. तोंडास पांढुरकेपणा येतो. अशावेळी शहाळ्याचे पाणी कामदुधा सुवर्णमासिक एक गुंज प्रमाणात घालून सकाळी प्यावे.

**स्नायुदुखी, सूज:-**

स्नायुं दुखावणे, स्नायुला सूज येणे, मुरगळा आदीवर खोबर्याचा कीस उपयोगी ठरतो. नारळाचा कीस हळदीची पूड घालून गरम करावा. व त्या चवाने दुखावलेला भाग शेकावा. नंतर थोडी गरम करून तो चव दुखणाऱ्या भागावर बांधून टाकावा. असा काही दिवस उपचार करावा. प्रत्येक वेळी नवीन कीस घ्यावा. त्यामुळे ठणका कमी होतो, सूजही उतरते तसेच आराम. वाटतो. आपण खोबरेल तेल डोक्यास लावण्यास वापरतो. खोबरेल तेल शुध्द असेल तर ते निश्चितच गुणकारी ठरते. खोबरेल तेल शक्यतो घाण्यातून काढून आणावे. केसाचे सर्व रोगावर शुध्द खोबरेल तेल गुणकारी आहे. थंडाई देण्यास खोबरेल तेल रात्री झोपताना डोक्यास, तळपायास चोळावे, सुखाची शांत झोप येते. ग्रामीण भागात नारू रोग मोठ्या प्रमाणात आढळतो. नारळाच्या डोळ्याजवळ भोक पाडून त्यात ६ गुंजा नवसागराची पूड घालून रात्रभर ठेवावे. सकाळी नारळाचे हे पाणी पिऊन खोबरे खावे. शक्यतो दिवसभर उपोषण करून रात्री दहीभात खावा.

**खरुज, गजकर्ण:-**

खरुज, गजकर्ण या विकारावरही नारळाचा चांगला उपयोग होतो. नारळाचे डोळ्याजवळ भोक पाडून त्यात नवसागर पूड व तुरटीची लाही प्रत्येकी ६ गुंजा व २ गुंजा घालावी. हे नारळाचे पाणी आटवावे व तयार झालेले तेल खरुज, व गजकर्णावर लावावे. किंवा नारळाच्या करवंटाचा पसरट भाड्यांत ठेवून पेटवावा म्हणजे भांड्यात तेल जमा होते. ते तेल खरुज, गजकर्णावर लावले तरी गुणकारी आहे. उचकीवर नारळाची शेंडी व रेशीम जाळून निर्माण झालेली राख मधातून थोडी खाण्यास द्यावी. उचकी थांबते. उलटी (वांती) यावरही ही राख मधातून द्यावी. हे औषध दिल्यानंतर दोन तासाने कामदुधा, दूध व साखर द्यावी. अर्श विकारावर कित्येकदा रक्त पडते. रुग्णास अशक्तपणा येतो. अशावेळी दोन चमचे नारळाचे दूध व साखर घेत जावे. कोरडा खोकला येऊन रक्त पडत असल्यास ओले खोबरे, मनुके व खडीसाखर खावी किंवा एकत्र रस काढून प्यावे. विकार दूर होतो.

(पान ६ वर)


# दे गयी धोखा हमे निली-निली आँखे, सिनेमा हाच श्वास, सिनेमा हाच ध्यास राज कपूर

सिनेजगत

देवेंद्र प्रभुणे

हिंदी चित्रपटांचा इतिहास ज्या वेळेस लिहिला जाईल, त्यात अग्रभागी कपूर कुटुंब असेल, हे निर्विवाद व नि:संशय! मूकपटांपासून ते आजतागायत, कपूर कुटुंबातील कोणता न कोणता सदस्य नायक म्हणून हिंदी चित्रपटात झळकला नाही, असे कोणतेही वर्ष मला तरी आठवत नाही. पेशावरच्या सभ्रांत कुटुंबातील वकिलीचे शिक्षण घेतलेला एक नाट्यवेडा तरुण नाटकाला जीवन वाहण्यासाठी मुंबईस येतो आणि आपल्या देखण्या व बलदंड व्यक्तिमत्त्वाने अल्पावधीतच हिंदी चित्रपटसृष्टीत आपले स्थान बळकट करतो. त्याचे नाव पृथ्वीराज कपूर.

'आलम आरा' या भारतातील पहिल्या बोलपटात पृथ्वीराज कपूर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. १९३० ते १९४५ या कालखंडातील पृथ्वीराज कपूर हे एक मातब्बर नाव होते. त्याचसोबत गावोगावी जाऊन नाटके मंचित करण्यासाठीदेखील पृथ्वीराज कपूर विख्यात होते. याच कलासक्त व नाट्यप्रेमी कलावंताच्या घरी १४ डिसेंबर १९२४ रोजी एका निळ्या डोळ्यांच्या बाळसेदार बालकाने जन्म घेतला. 'बाप से बेटा सवाई' या उक्तीस सार्थ करणाऱ्या त्या बालकाचे नामकरण झाले ते रणबीर राज कपूर.. वडिलांचा देखणेपणा व आईचा नाजूकपणा यांचा मनोहारी संगम राज कपूर यांच्या व्यक्तिमत्त्वात झाला होता. अनुवांशिकता व सभोवतालचे वातावरण यामुळे बालपणापासूनच त्यांच्यामधील कलावंत फुलू लागला. पृथ्वीराज कपूर यांच्यासमवेत नाटकांमध्ये बाल-कलाकार म्हणून भूमिका करून राज कपूर यांनी आपल्या कलावंत जीवनाचा ओनामा केला. १९३५ साली आलेला 'इन्किलाब' हा त्यांचा बाल-कलावंत म्हणून पहिला चित्रपट. तद्नंतर 'गौरी' (१९४३), 'हमारी बात' (१९४३) व 'वाल्मीकि' (१९४६) या चित्रपटात त्यांनी फुटकळ भूमिका केल्या. 'वाल्मीकि' या भालजी पेंढारकरांच्या चित्रपटात भूमिका करताना मिळालेल्या मानधनातून त्यांनी चेंबूर येथे जागा खरेदी केली. 'गौरी' चित्रपटात ते दिग्दर्शक केदार शर्मा यांचे सहायक होते. त्या चित्रपटाच्या सेटवर ते हरकाम्या म्हणून वावरत. पृथ्वीराज कपूर यांनी आपल्या वलय व प्रसिद्धीचा कोणताही गैरफायदा आपल्या कोणत्याही पुत्रास घेऊ दिला नाही व त्यांना स्वबळावर चित्रपटसृष्टीत आपले स्थान निर्माण करण्यास उद्युक्त केले. बालपणापासूनच राज कपूर यांना कलाक्षेत्राचे अनिवार आकर्षण होते. चित्रपट क्षेत्रात काहीतरी भरीव करून दाखवण्याची मनीषा त्यांनी सदैव बाळगली. औपचारिक व पुस्तकी शिक्षणाचा त्यांना फारसा सोस नव्हताच. 'चित्रपट हेच भागधेय, चित्रपट हेच जीवनध्येय' हा मूलगामी मंत्र त्यांचे अवघे आयुष्य व्यापून होता. राज कपूर हे अतिशय द्रष्टे व महत्त्वाकांक्षी कलावंत होते. स्वत:च्या मालकीची चित्रपट निर्मिती संस्था व स्टुडिओ असल्याखेरीज आपल्याला अभिप्रेत असलेली चित्रपट निर्मिती आपण करू शकणार नाही, हे त्यांनी फार अगोदरच जाणले होते. म्हणून त्या दिशेने त्यांनी अगदी तरुणपणातच पावले टाकण्यास सुरुवात केली. सुदैवाने १९४७ पासून त्यांचा अभिनेता म्हणून बोलबाला सुरू झाला. नीलकमल, चितोडविजय, दिल की रानी हे १९४७ साली आलेले त्यांचे नायक म्हणून पहिले तीन चित्रपट. योगायोगाचा भाग म्हणजे, या तिन्ही चित्रपटांत सौंदर्यवती मधुबाला त्यांची नायिका होती. वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी त्यांनी आपल्या 'आर. के. स्टुडिओ' या चित्रनिर्मिती संस्थेची पायाभरणी केली व आपला निर्माता-दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट 'आग' (१९४८) हा रसिकांसमक्ष प्रस्तुत केला. कलाकाराला आवश्यक असलेली स्फूर्तिदेवता व आंतरिक सौंदर्याचे श्रेष्ठत्व या संकल्पनांभोवती फिरणारा 'आग' समीक्षकांची प्रशंसा मिळवता झाला. परंतु तिकीटबारीवर फारसा यशस्वी ठरला नाही. यापासून धडा घेत राज कपूर यांनी पुढील चित्रपटांसाठी सर्वांना भावणाऱ्या प्रणय कथेची जाणीवपूर्वक निवड केली. याच चित्रपटासाठी त्यांनी शैलेंद्र व हसरत जयपुरी हे नव्या दमाचे गीतकार व शंकर-जयकिशन हे लोकोत्तर संगीतकार कायमस्वरूपी आपल्या निर्मिती संस्थेत सन्मानपूर्वक प्रविष्ट केले. या तरुण तुर्कांनी मन्वंतर घडवले. विशुद्ध प्रेमाची महती विशद



करणारा 'बरसात' सर्वच बाबतीत जमून आला होता. भारतीय संस्कृतीच्या मर्यादेत राहून चित्रित केलेले प्रमाथी प्रणय प्रसंग व काश्मीरच्या निसर्गरम्य सौंदर्याचा स्तरीय व लोकप्रिय संगीताद्वारा केलेला अप्रतिम आविष्कार म्हणजे 'बरसात'..! आर्थिकदृष्ट्या स्थिरावलेल्या राज कपूर यांनी आपला समाजवादाची भलामण करणारा, भारतीय संस्कृतीचे महन्मंगल गोडवे गाणारा चित्रपट हे आपले प्रतिमान निश्चित केले. चित्रपटाची कथा, पटकथा व संकलन या बाबींकडे विशेष लक्ष पुरविणारा दिग्दर्शक म्हणून राज कपूर अल्पावधीतच विख्यात झाले. एक साक्षेपी संकलक त्यांच्यामध्ये विद्यमान होता व चित्रपटाच्या अंतिम प्रस्तुतीमध्ये या कौशल्याची त्यांना मोलाची साथ लाभली. १९५० च्या दशकात चार्ली चॅप्लीनसदृश भटका, सर्वसामान्य भारतीय नवयुवक त्यांनी सातत्याने रंगवला. एका विशिष्ट गृहीतक किंवा संकल्पनेभोवती केंद्रीत संगीतमय प्रणयकथा या प्रतिमानावर आधारित 'आवारा' (१९५१) व 'श्री ४२०' (१९५५) ही भारतीय चित्रपटांच्या मांदियाळीतील लखलखती रत्ने.. 'जन्मापेक्षा परिवेश हा मनुष्याच्या जडणघडणीस जास्त जबाबदार असतो' हे गृहीतक ठासून मांडणारा 'आवारा' (१९५०) च्या भारतीय समाजाचे यथायोग्य चित्रण तर करतोच तसेच शेवटी उज्ज्वल भवितव्याचे सुवर्ण-स्वप्नही दाखवतो. 'श्री ४२०' ही एकाअर्थी नेहरूजी प्रणीत समाजवादी राजकारणाची भारतीय चित्रपटाच्या पडद्यावर आलेली सर्वोत्कृष्ट कलाकृती. 'सत्यमेव जयते' या बोधवचनाचा उद्घोष करणारा व सर्वसामान्य जनतेच्या आशा- आकांक्षांना सर्वोपरी ठेवणाऱ्या 'श्री ४२०' चित्रपटाचे अप्रतिम संगीत हे वैशिष्ट्य.

(पान ६ वर)

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# अतींद्रिय शक्तीचे चमत्कार!




**१.** माझे एक मित्र चिदानंद रेड्डी जंगल खात्यात सहायक वनसंरक्षक म्हणून वन्यजीव विभागात कार्यरत होते. जेसीज नागपूर रॉयलचे संस्थापक अध्यक्ष राजेश दुबे यांच्यामुळे त्यांची माझी ओळख झाली. अनेक वर्षांपासून आम्ही जेसीजच्या विविध कार्यक्रमात भेटायचो. चिदानंदजी एक अतिशय हुशार, मेहनती, मनमिळावू व शिस्तप्रिय व्यक्ती होते. जवळपास १८ वर्षांपासूनची आमची नि:स्वार्थ मैत्री! पण वाढत्या वयात दोघांच्याही जबाबदाऱ्या वाढत गेल्यामुळे आमच्या तेवढ्या भेटी होत नव्हत्या. एका भेटीत ते निवृत्त होत आहेत म्हणून त्यांनी सांगितले. नंतर मध्ये सहा महिन्यांचा काळ गेला आणि ५ जून २०१९ च्या सकाळी मला त्यांची खूपच आठवण येऊ लागली. त्यांना भेटायची अनावर ओढ वाटू लागली. मी त्यांना सतत दोनतीनदा फोन केला तर कुणी उचलला नाही. मग राजेश दुबेंना फोन करून विचारले की, ''चिदानंदजींचा फोन वगैरे बदलला की काय?' ते म्हणाले, 'नाही.' मग चिदानंदजींचे छोटे बंधू नित्यानंदजींना मी फोन केला की, ''चिदानंदजींचा फोन का लागत नाही आहे? मला त्यांच्याशी खूप बोलायची इच्छा होतेय.'' ते आधी स्तब्ध झाले. मग म्हणाले, ''तुम्ही लगेच त्यांच्या घरी पोहोचा.'' मी पोचलो तर कळले की चिदानंदजी अत्यवस्थ आहेत. कुणाशीही बोलणे बंद आहे. माझ्यातील अनावर इच्छेने मी त्यांच्या जवळ पोहोचलो. त्यांना पाहिले! त्यांचा चेहरा शांत होता. नंतर अगदी थोड्याच वेळात त्यांचे निधन झाले.

**१. नेमके काय घडले?:** मला तिथे नेमक्या वेळात पोहोचलेले पाहून त्यांच्या घरच्या सर्वांनाच आश्चर्य वाटले. कारण त्यांची प्रकृती चांगली नाही, हे त्यांनी कुणालाच सांगितले नव्हते. आता मला कळले की, काही केल्या माझ्या डोळ्यापुढून त्यांचा चेहरा का हलत नव्हता? अत्यवस्थ असतानाच्या परिस्थितीत विचारांच्या आदान-प्रदानाची खरी सुरुवात चिदानंदजींनीच केली होती. त्यांच्या जीवनाचा आता अंतिम क्षण आलेला आहे आणि मला त्याची काहीही कल्पना नाही, हे त्यांना ठाऊक होते. माझा निरोप घेण्याची त्यांना तीव्र इच्छा होती. तोंडाने बोलणे थांबले होते. श्वास सुरू होता. पण त्याही अवस्थेत त्यांचे मन पूर्ण शक्तिनिशी काम करत होते. म्हणूनच मला भेटायच्या त्यांच्या उत्कट इच्छेच्या तीव्रतेने माझ्या दैनंदिन विचारांच्या वर्तुळाला भेदून त्यांनी माझ्याशी संपर्क साधला आणि माझ्या मनाने एक प्रकारे प्रतिक्षिप्त क्रिया करून मला त्यांना भेटायची, त्यांच्याशी बोलायची तीव्र इच्छा निर्माण केली. शेवटी त्यांच्या निधनाच्या पूर्वी मी त्यांच्या जवळ पोहोचलो. बोलणे झाले नाही, पण हे जग सोडून ते निघाले, हा संदेश माझ्याजवळ पोहोचवण्यात ते यशस्वी झाले.

**२.** ते दोघे एका हॉटेलमध्ये बसले होते. त्यातील युरी गेलर होता तर दुसरा मानसोपचारतज्ज्ञ होता. खरंच एक माणूस दुसऱ्याचे विचार ठरवून ओळखू शकतो का, याचे परीक्षण करायला ते बसले होते. मुद्दाम कठीण जावे म्हणून मानसोपचारतज्ज्ञाने युरीकडे पाठ करून कागदाच्या छोट्या तुकड्यावर अमिबाचे चित्र काढले आणि कागद खिशात ठेवला. मग त्याने पुन्हा युरीकडे वळून त्याला कागदावर काढलेले चित्र ओळखायला सांगितले.

युरीने कुठली चलाखी करू नये म्हणूनच या दोघांकडे तिसरा माणूस लक्ष ठेवून होता. युरीने अगदी एक मिनिटात अगदी हुबेहूब तीच आकृती काढून दाखवली. म्हणजे एक माणूस ठरवून दुसऱ्याच्या मनातले विचार ओळखू शकतोश हे सिद्ध झाले. तसेच त्यांच्या अनेक कार्यक्रमात ते आपल्या मानसिक शक्तीने धातूच्या किल्ल्या, चमचे स्पर्शही न करता वाकवतात किंवा तुकडे करतात. त्यांच्यावर अनेक लोकांनी हातचलाखी असावी, असा आरोप करायचा प्रयत्न केला. पण त्यांनी त्यांच्या मानसिक शक्ती खऱ्या आहेत, हे अनेकदा सप्रमाण सिद्ध करून दाखवले.

**३.** धीरेंद्र कृष्ण गर्ग, म्हणजेच बागेश्वर धाम सरकार महाराज हे भारतीय कथाकार व बागेश्वर धाम सरकारचे पीठाधीश आहेत. हे भारतातील मध्यप्रदेश राज्यातील छतरपूर जिल्ह्यातील गार्हा गावातील प्रसिद्ध धार्मिक तीर्थक्षेत्र आहे. त्यांचा जन्म ५ जुलै १९९६ रोजी छतरपूर जिल्ह्यातील गार्हा गावात गर्ग कुटुंबात झाला. ते एका सामान्य गरीब कुटुंबातील आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातीलच सरकारी शाळेत झाले.



लहानपणी ते आजूबाजूच्या गावात भिक्षा मागून, रामचरितमानस आणि सत्यनारायण कथा पाठ करून आपला उदरनिर्वाह करत असत. श्रीहनुमान आणि संन्यासी बाबांच्या आशीर्वादाने त्यांना सिद्धी प्राप्त झाली आहे, असे ते सांगतात. लोककल्याण आणि मानवसेवेसाठी ते या शक्तींचा वापर करतात. त्यांच्या मानसिक आणि शारीरिक समस्यांचे निदान करतात. बागेश्वर धामची सेवा पंडित धीरेंद्रजी शास्त्रीजींचा परिवार तीन पिढ्यांपासून करत आहेत. त्यांच्या युट्यूबवर उपलब्ध असलेल्या अनेक व्हिडीओंमधून ते कुठल्याही व्यक्तीच्या मनातील विचार, भूतकाळ सहज ओळखतात, हे सिद्ध झाले आहे.

**टेलिपथी :** संकटकाळी सहाय्य मिळावे म्हणून प्रिय व्यक्तीला किंवा प्रसंगी अपरिचित व्यक्तीलासुद्धा जिवाच्या आकांताने मारलेली हाक, मृत्यूची चाहूल, आजारपण, काळजी... कारण कुठलेही असो, पण अशावेळी भावनांच्या उत्कटतेमुळे, सर्व अडथळे पार करून अपेक्षित व्यक्तीला आठवणींच्या, उत्सुकतेच्या किंवा एकविचाराच्या स्वरूपात तो संदेश मिळतो. मग ज्याला कुठल्याही स्वरूपात संदेश मिळतो; तो मग गरजू व्यक्तीजवळ पोहोचतो. अशा प्रकारे कुठल्याही इतर ज्ञानेंद्रियांचा वापर न करता केवळ भावनेच्या किंवा विचाराच्या उत्कटतेने एका मनाने दुसऱ्या मनाशी संवाद साधण्यालाच 'टेलिपथी' म्हणतात.

गुरू-शिष्य, आई-वडील आणि त्यांचा मुलगा- मुलगी, भाऊबहीण, मित्र- मैत्रिणी, प्रियकर-प्रेयसी, वक्ता- श्रोते, एकमेकांचे कट्टर शत्रू किंवा प्रतिस्पर्धी किंवा संकटग्रस्त व्यक्ती/ पाळीव प्राणी आणि त्यांना सहाय्य करू शकणारे याप्रकारे कुठल्याही जोडीत टेलिपथी म्हणजे मनाने मनाशी थेट संवाद घडू शकतो. याशिवाय काही व्यक्तींना जन्मजातच कुणाचेही मनातील विचार सहज वाचता येण्याची क्षमता असते. अशा प्रकारात कुठलेही संकट किंवा भावनेची किंवा विचारांच्या तीव्रतेचा संबंध नसतो. तेव्हा अशा परिस्थितीत दुसऱ्याचे मनातील विचार ओळखण्याला टेलिपथी म्हणत नाहीत. त्याला माईंड-रीडिंग म्हणजे मनाचे वाचन म्हणतात. काहींना ही क्षमता विशिष्ट अभ्यास करूनही विकसित करता येते.

**पाळीव प्राणी आणि टेलिपथी :** ज्यांच्या घरी पाळीव प्राणी आहेत त्यांना अनेकदा अनुभव आले असतील की, त्यांनी तोंडाने बोलून कुठलीही आज्ञा न देता त्यांच्या घरचे पाळीव प्राणी केवळ घरातील व्यक्तीच्या मनातले विचार ओळखून त्यानुसार वागतात. पाळीव प्राणी आपल्या मालकाच्या मनातले विचार कसे ओळखतात ते एका प्रयोगशाळेत एका प्रयोगात सिद्ध झाले. एका पाळीव मांजरीच्या मालकिणीला खोलीच्या बाहेर खुर्चीत बसवले. खोलीच्या आत जमिनीवर टिक्करबिल्ला किंवा लंगडी खेळायला काढतात तसे चौकोन काढले. त्यात वेगवेगळे आकडे लिहिले. नंतर मांजरीला खाली सोडण्यात आले. खोलीच्या बाहेर मालकीण ज्या क्रमाने आकडे लिहिलेल्या चौकोनात जाण्यासाठी मांजरीला फक्त मनाने आज्ञा देत होती व तशा खुणा पेनने खोलीबाहेर बसून कागदावर करत होती; अगदी त्याच क्रमानुसार तिची मांजर त्या त्या चौकोनात जात होती. कोणत्या कोणत्या चौकोनात जायला सांगायचे त्याचा क्रम परीक्षकांनी ठरवला होता.

अतींद्रिय शक्ती म्हणजे काय? साधारण माणूस आपले ज्ञानेंद्रिय वापरून जे करू शकत नाही ते जेव्हा एखादी व्यक्ती केवळ मानसिक शक्ती वापरून करून दाखवते तेव्हा त्या शक्तीला अतींद्रिय शक्ती म्हणतात. उदाहरणार्थ महाभारताच्या काळात धृतराष्ट्राच्या राजवाड्यात बसून संजयने आपल्या दूरदर्शन सिद्धीचा वापर करून कुरुक्षेत्रातील महाभारताच्या युद्धात काय चालू आहे ते आपण टीव्हीवर पाहतो तसे पाहून धृतराष्ट्राला सांगितले. म्हणूनच भगवान कृष्णाने अर्जुनाला समुपदेशन करताना सांगितलेली भगवद्गीता आज आपल्यापर्यंत पोहोचली. त्या दूरदर्शन सिद्धीला आजच्या भाषेत 'क्लेरव्होयांस' असे म्हणतात.


या शिवाय एकाच वेळी अनेक ठिकाणी हजर असणे, रामायण काळातील हनुमानाने केले तसे शरीराला खूप मोठे किंवा अतिसूक्ष्म म्हणजे छोट्या आकाराचे करणे, एका ठिकाणी अदृश्य होऊन दुसऱ्या ठिकाणी प्रकट होणे, एका ठिकाणी शरीर ठेवून वेगवेगळ्या ठिकाणी फिरून येणे अशा अनेक सिद्धी ऋषिमुनींना हस्तगत होत्या. पण या साऱ्या शक्ती किंवा सिद्धी आजही शक्य आहेत का? की, हा सर्व अंधश्रद्धेचाच भाग आहे? असतील तर या अतींद्रिय शक्ती कशा प्राप्त होतील? याबद्दल आजही जगात संशोधन सुरूच आहे. सिद्धी म्हणजे काय? 'सिद्धी' या शब्दाचा अर्थ आहे पूर्णता, प्राप्ती, सफलता इ. 'सिद्धी' हा शब्द मार्कंडेय पुराणात, महाभारतात मिळतो.

पंचतंत्रामध्ये असामान्य कौशल्य, असामान्य क्षमता अर्जित करण्यास सिद्धी असे म्हटले गेले आहे. 'मनुस्मृती'मध्ये या शब्दाचा प्रयोग 'ऋणमुक्ती' यासाठी केला आहे. सांख्यकारिका, तत्त्वसमास, तांत्रिक बौद्धसम्प्रदाय यामध्ये या शब्दाचा अर्थ विशिष्ट पद्धतीने दाखविला आहे- 'चमत्कारिक साधनाद्वारा अलौकिक शक्तींचे अर्जन म्हणजे सिद्धी.' उदाहरणादाखल पाहावयाचे झाल्यास दिव्यदृष्टी! एकाच वेळेस दोन जागी असणे, आपल्या आकारास सूक्ष्म अथवा मोठे करणे इ. हिंदू धर्मात आठ सिद्धीवर विश्लेषण आढळून येते.

पातंजल योगशास्त्रात '**जन्म औषधि मन्त्र तपः समाधिजाः सिद्धयः।**' असे म्हटले आहे. अर्थात जन्माने, औषधिद्वारा, मंत्राद्वारा, तपाने आणि समाधीचे सिद्धींची प्राप्ती केली जाते. मार्कंडेय पुराणात आठ सिद्धींचे वर्णन आहे. कठोर उपासनेमुळे व विशिष्ट प्रकारच्या आचरणाने त्या प्राप्त होतात, असा समज आहे. हनुमानाने गरिमा सिद्धी वापरून आपले शरीर मोठे केले व लंकेकडे उड्डाण केले, असा समज आहे. '**अणिमा महिमा चैव लघिमा गरिमा तथा। प्राप्तिः प्राकाम्यमीशित्वं वशित्वं चाष्ट सिद्धयः ।।**'

**अणिमा :** म्हणजे शरीराला खूप लहान करणे
**महिमा :** म्हणजे शरीर खूप मोठे करणे
**गरिमा :** म्हणजे शरीराला खूप वजनदार करणे
**लघिमा :** म्हणजे शरीराला खूप हलके करणे
**प्राप्ति :** कुठेही जाऊ शकणे
**प्राकाम्य :** दुसऱ्याच्या मनातले विचार जाणून घेणे.
**ईशित्व :** यात साधक स्वत:च ईश्वर स्वरूप होतो.
**वशित्वं:** कुणालाही वश करून घेणे म्हणजे दुसऱ्या व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार नियंत्रित करणे.

आमच्या संस्थेतील मानसशास्त्राच्या संशोधनासाठी केलेल्या प्रयोगात अनेक उत्साही विद्यार्थी व स्त्री-पुरुष भाग घेत असतात. अशा प्रयोगातसुद्धा खूपच रोमांचकारी अनुभव येत असतात. पण या अशा प्रयोगांमध्ये अतींद्रिय शक्ती जागृत होवो किंवा न होवो; पण पालकांच्या त्यांच्या मुलांबद्दल असलेल्या अनेक तक्रारी मात्र दूर होतात व मुलांचा अभ्यासात व चांगल्या सवयी लावण्यासाठी अशा प्रयोगांचा खूप फायदा होतो. त्यांची एकाग्रता शक्ती, निरीक्षण शक्ती, स्मरणशक्ती यात निश्चित वाढ होते. मोबाईलचे व्यसन दूर करायला मदत होते. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## हरिनाम घेता । सुखावलो ।।

अंतरी नांदतो । त्रैलोक्याचा धनी ।।
जन्मभरी ध्यानी । नाही आले ।।१।।

चंचल मनाला । विकाराची बाधा ।।
विषयात सदा । गुंतलासी ।।२।।

दिव्याखाली तम । गिळिले उजेडा ।।
लावूनी झापडा । अंध झाला ।।३।।

जाणले मी सार । भाव शुद्ध मना ।।
अंतरीची वीणा । झंकारली ।।४।।

उजळला दिप । संतवाणी होता ।।
हरिनाम घेता । सुखावलो ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८



## तांडव करितो नटराजा

तांडव करितो नटराजा, गिरिजापती शंकर,
गौरीहर दीनानाथ, तांडव करिता नटराजा।।धृ।।
भस्म अंग विलेपन, जटाजूट रुद्रमाल,
बायांबर कटी सोहे, नाचत श्री शिवनाथ
तांडव करितो नटराजा...
चतुर्भुज करन्यास, कमलनयन मृदुभाव,
वीणावादन करित, सरस्वती माता
तांडव करितो नटराजा...
कृपाकरी आम्हावरी, नटराज आदिदेव,
दर्शन तव व्हावे अता, कृपाळू हे दीनानाथा
तांडव करितो नटराजा...

डॉ. मिलिंद इंदूरकर

## चंद्रमा

अक्षरें ओवीत होतो चांदण्यांची कल्पना,
चंद्र माझ्या अंतरंगी जागवी त्या भावना
व्यापले आकाश सारे मेघ काळे दाटले,
चंद्रमाचे तेज सरले राहिला तो एकला
उग्रतेने ग्रासलेला दिवस आता संपला,
चंद्रछायेला मिळाली मनोवेधक भूमिका
रात्रीच्या भ्रमणात जागी एक रुसलेली कळी,
चंद्रमाची वाट बघते आईच्या मांडीवरी
आर्त विरही गीत ऐकून थबकला तो चंद्रमा,
क्षोभ एका माधवीचा व्यक्त करतो चंद्रमा

राजीवलोचन पुंडलिक

# अन्नधान्य महागाई आणि 'अमूल'ची भरारी

**गेल्या काही दिवसांमध्ये भारताचा मोठा व्यापारी भागीदार म्हणून अमेरिकेचा उदय झाला आहे. ही बातमी समोर येण्याच्या सुमारास अन्नधान्याच्या महागाईपासून दिलासा मिळण्याची शक्यता कमी असल्याचे तथ्य समोर आले. या पृष्ठभूमीवर तेलबियांचे उत्पादन वाढवण्याला सरकारचे प्रोत्साहन असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, 'अमूल' हा जगातील सर्वात मजबूत फूड ब्रँड बनल्याची बातमी पुढे आली**

अर्थोद्योग
महेश देशपांडे

**गे**ल्या काही दिवसांमध्ये भारताचा मोठा व्यापारी भागीदार म्हणून अमेरिकेचा उदय झाला आहे. ही बातमी समोर येण्याच्या सुमारास अन्नधान्याच्या महागाईपासून दिलासा मिळण्याची शक्यता कमी असल्याचे तथ्य समोर आले. या पृष्ठभूमीवर तेलबियांचे उत्पादन वाढवण्याला सरकारचे प्रोत्साहन असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, 'अमूल' हा जगातील सर्वात मजबूत फूड ब्रँड बनल्याची बातमी पुढे आली. चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये (जानेवारी-जून) भारताचा सर्वोच्च व्यापार भागीदार म्हणून अमेरिकेचा उदय आला आहे. या कालावधीत देशाने चीनसोबत ४१.६ अब्ज डॉलरची व्यापार तूट नोंदविल्याचे एका अहवालात म्हटले आहे. 'रिसर्च इन्स्टिट्यूट ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह' (जीटीआरआय) ने आपल्या अहवालात म्हटले आहे की, जानेवारी ते जून २०२४ दरम्यान देशाच्या व्यापारी मालाची निर्यात ५.४१ टक्क्यांनी वाढून २३०.५१ अब्ज डॉलर झाली. अहवालानुसार, ४१.६ अब्ज डॉलरची प्रचंड व्यापार तूट असलेल्या यादीत चीन अव्वल स्थानी आहे. जानेवारी-जून २०२४ दरम्यान चीनला ८.५ अब्ज डॉलर निर्यात होती तर आयात ५०.१ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली. डेटाच्या विश्लेषणातून दिसून आले आहे की, भारत २३९ देशांना उत्पादनांची निर्यात करतो आणि यापैकी १२६ देशांनी निर्यातीत सकारात्मक वाढ दर्शविली आहे. भारताच्या एकूण निर्यातीमध्ये या देशांचा वाटा ७५.३ टक्के आहे. निर्यातीमध्ये वाढ असणाऱ्या प्रमुख देशांमध्ये अमेरिका, संयुक्त अरब अमिराती (यूएई), नेदरलँड, सिंगापूर आणि चीन यांचा समावेश आहे. तथापि, इटली, बेल्जियम, नेपाळ आणि हाँगकाँग या ९८ देशांमधील निर्यातीत घट झाली आहे. अहवालानुसार अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा निर्यात आहे. या वर्षाच्या पहिल्या सहामाहीमध्ये चीन हा भारताचा सर्वात मोठा आयातदार राहिला. चीनची आयात ४६.२ अब्ज डॉलरवरून ५०.१ अब्ज डॉलर झाली. 'जीटीआरआय'चे संस्थापक अजय श्रीवास्तव म्हणाले, चीन आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये भारताचा अव्वल व्यापार भागीदार राहिला; परंतु जानेवारी ते जून २०२४ या कालावधीत अमेरिका भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनला. चीन दुसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार म्हणून दुसऱ्या स्थानावर राहिला, एकूण व्यापार ५४.४ अब्ज डॉलरवरून ५८.६ अब्ज डॉलर झाला. त्यात ७.७ टक्क्यांनी वाढ झाली. लोहखनिज, फार्मास्युटिकल्स, मौल्यवान खडे, बासमती तांदूळ, रसायने आणि स्मार्टफोन यासारख्या क्षेत्रांमुळे व्यापारी मालाच्या निर्यातीत वाढ झाली. सेवांच्या आघाडीवर निर्यात ६.९ टक्क्यांनी वाढून १७८.२ अब्ज डॉलर झाली तर आयात ५.७९ टक्क्यांनी वाढून ९५ अब्ज डॉलर झाली.




दरम्यान, अर्थ मंत्रालयाने आपल्या मासिक आर्थिक आढाव्यात महागाई कमी होत असल्याचे म्हटले आहे, पण येत्या काही दिवसांमध्ये अन्नधान्य चलनवाढीपासून कोणताही दिलासा मिळणार नाही, असे रिझर्व्ह बँकेचे मत आहे. कौटुंबिक चलनवाढीच्या अपेक्षा वाढत आहेत. त्यामुळे अन्नधान्याच्या किमतींवरील दबावाचे संभाव्य परिणाम लक्षात घेऊन चलनविषयक धोरण ठेवावे लागेल. रिझर्व्ह बँकेने चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीचे इतिवृत्त प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार जुलैमध्ये खाद्यपदार्थांमध्ये वाढ झाली. बेस इफेक्टमुळे किरकोळ चलनवाढ दुसऱ्या तिमाहीमध्ये कमी होऊ शकते; परंतु तिसऱ्या तिमाहीमध्ये महागाई वाढू शकते. असमान हवामानामुळे अन्नधान्य महागाई वाढण्याचा धोका आहे. जागतिक तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत चढउतार होत आहे. मोबाईलसेवेच्या दरामध्ये वाढ झाल्यामुळे महागाई वाढू शकते. चांगला मान्सून आणि खरीप पिकांच्या पेरणीत वाढ, जलसाठ्यामध्ये वाढ आणि रबी हंगामात चांगले उत्पादन होण्याचा अंदाज यामुळे अन्नधान्य महागाई कमी होण्याची आशा व्यक्त केली.

या पृष्ठभूमीवर एक लक्षवेधी बातमी समोर आली. भारताचे तेलासाठी इतर देशांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी तेलबियांचे देशांतर्गत उत्पादन वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. या योजनेंतर्गत स्वस्त आयातीमुळे देशांतर्गत किमती प्रभावित होऊ नयेत, यासाठी पिकांचे उत्पादन वाढवणे, लागवडीचे क्षेत्र वाढविणे आणि डायनॅमिक आयात शुल्क रचना लागू करण्याची योजना आहे. कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सरकार शेतकऱ्यांकडून मोहरी, सोयाबीन आणि भुईमूग यासारख्या तेलबिया किमान आधारभूत किमतीवर खात्रीपूर्वक खरेदी करण्याची व्यवस्था करत आहे. सूत्रांनी सांगितले की, कृषी मंत्रालयाने तेलबिया, विशेषत: मोहरी, भुईमूग, सोयाबीन, तीळ आणि नायगर बियाणांची उत्पादकता वाढवण्यासाठी २० राज्यांमधील ३४७ जिल्ह्यांमध्ये ६०० क्लस्टर्स निश्चित केले आहेत. भारत हा वनस्पती तेलाचा जगातील दुसरा सर्वात मोठा ग्राहक आणि सर्वात मोठा आयातदार आहे. आपल्या वार्षिक वापराच्या सुमारे ५८ टक्के गरजा आयातीद्वारे पूर्ण केल्या जातात. पुढील तीन ते चार वर्षांमध्ये देशांतर्गत वापर सुमारे ३० दशलक्ष टनांपर्यंत पोहोचू शकतो, असा व्यापारी सूत्रांचा अंदाज आहे. आता एक खास बातमी. 'अमूल'ने संपूर्ण जगात दबदबा निर्माण केला आहे. अमूल जगातील सर्वात मजबूत फूड ब्रँड बनला आहे. 'अमूल' ही खाद्य उत्पादने बनवणारी महाकाय कंपनी आहे. तिचे संपूर्ण देशभर वर्चस्व आहे. आता जगातही 'अमूल'ने मान्यता मिळविली आहे. एका अहवालानुसार, 'अमूल' आता जगातील सर्वात मजबूत फूड ब्रँड बनला आहे. ब्रँड फायनान्सच्या अहवालात याला एएए+ रेटिंग देण्यात आले आहे. कंपनीची ब्रँड व्हॅल्यूदेखील ३.३ अब्ज डॉलर झाली आहे. कंपनीने मागील वर्षी या यादीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या 'हर्षे'ला मागे टाकले. 'अमूल'चा इतिहास जवळपास ७० वर्षांचा आहे. ब्रँड फायनान्सच्या 'ग्लोबल फूड अँड ड्रिंक्स रिपोर्ट, २०२४' नुसार 'अमूल' आता जगातील सर्वात मजबूत फूड ब्रँड बनला आहे. 'ब्रँड स्ट्रेंग्थ इंडेक्स'वर त्याचा स्कोअर १०० पैकी ९१ आहे. याशिवाय कंपनीला एएए+ रेटिंग मिळाले आहे. २०२३ च्या तुलनेत यावर्षी 'अमूल'चे ब्रँड मूल्य ११ टक्क्यांनी वाढून ३.३ अब्ज डॉलर झाले आहे. ब्रँड मूल्याचा कंपनीच्या उलाढालीशी काहीही संबंध नाही. २०२२-२३ या आर्थिक वर्षात अमूलची विक्री १८.५ टक्क्यांनी वाढून ७२ हजार कोटी रुपये झाली आहे. ब्रँड फायनान्स अहवालात 'अमूल'ला 'हर्षे' सोबत एएए+ रेटिंग देण्यात आले आहे; पण 'हर्षे'चा ब्रँड व्हॅल्यू ०.५ टक्क्यांनी घसरून ३.९ अब्ज डॉलर झाला आहे. त्यामुळे त्याला यंदाच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. दुग्ध व्यवसायात भारताच्या बाजारपेठेत 'अमूल'चे मोठे नाव आहे. 'अमूल'चा दूध बाजारात ७५ टक्के, लोणी बाजारात ८५ टक्के तर चीज मार्केटमध्ये ६६ टक्के वाटा आहे. कंपनीने जगभरात मोठा ठसा उमटवला आहे. अहवालात दिलेल्या माहितीनुसार 'नेस्ले' हा जगातील सर्वात मौल्यवान फूड ब्रँड म्हणून पुढे आला आहे. त्याचे बाजारमूल्य गेल्या वर्षीच्या तुलनेत ते सात टक्क्यांनी घसरले आहे. सध्या ते अंदाजे २०.८ अब्ज डॉलर आहे तर १२ अब्ज मुल्यांकनासह 'लेज' या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. नॉन-अल्कोहोलिक बेव्हरेज क्षेत्रात कोका-कोला पहिल्या क्रमांकावर तर पेप्सी दुसऱ्या क्रमांकावर आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री बाळाजी जोशी यांचा जन्म २७ जानेवारी १९०१ मध्ये झाला. ते मराठी लेखक आणि साहित्यिक या शिवाय कोशकार व सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक-संशोधक म्हणूनही ओळखले जातात. १९५१ मध्ये प्रकाशित असलेल्या त्यांच्या वैदिक संस्कृतीचा विकास ह्या ग्रंथाला १९५५ मध्ये भारतीय साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. हा मराठी ग्रंथाला मिळालेला पहिला साहित्य अकादमीचा पुरस्कार होता. अस्पृश्यता निवारण, विधवांचे पुनर्विवाह, अशा सामाजिक कार्यात सुद्धा लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सहभाग घेतला.**

# 'वैदिक संस्कृतीचा विकास' मधील सामाजिक सांस्कृतिक विकासाचे संदर्भ

साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे


भ्र. ७५८८५६५५७६

इतिहास कपुराणाची व रामायणाची संस्कृती या व्याख्यानामध्ये रामायण महाभारत आणि इतर पुराने यांच्या प्रेरणेतून ललित कला निर्माण झाली. त्याच पद्धतीने भारतीय नाट्याचा उगम व विकास यामध्ये विचार करताना अलेक्झांडर सिकंदरच्या स्वारी सोबत अनेक ग्रीक कलावंत भारतामध्ये आले आणि ग्रीक नाटकांची छाप भारतीय नाटकांवर पडली. असे सांगत असताना एखाद्या कलेचा विकास विकास होण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत असतात त्यावर लेखकाने भाष्य केलेले दिसते.

कालिदास भवभूती सम्राट हर्षवर्धन अशा विविध नाटककरांच्या नाटकाचा परामर्श लेखकाने घेतला आहे. भवभूतीच्या माधव-मालती या नाटकातील माधव विद्यार्थीदशेत असलेला तरुण आहे, या उल्लेखातून नाटककाराच्या नाटकातील पात्र शिक्षण उत्सुक होते म्हणजे त्या काळातील समाजही शिक्षण उत्सुक असावा असा कयास काढता येतो. नाटकाप्रमाणे काव्यशास्त्राचा उल्लेख ऋग्वेदामध्ये अशी सुरुवात करत लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी काव्य क्षेत्रातील विविध टप्प्यांचा आढावा घेताना भरताचे रससिद्धांत, अशा विविध उदाहरणातून काव्यानंदाची अनुभूती विषद केली आहे. त्याच सोबत संत ज्ञानेश्वरांनी स्थापन केलेला भागवत धर्म आणि तुकारामाच्या कार्यकालापर्यंत विवेचन केलेले दिसून येते. बौद्ध व जैन या धर्मा विषयीच्या व्याख्यानामध्ये जैन आणि बुद्ध हे बौद्धिक तत्त्व संशोधन करणारे दर्शनाचार्य होते असे ते म्हणतात.

विकासाकरिता विद्रोह करावा लागतो त्या अनुषंगाने बौद्ध आणि जैन धर्माकडे लेखक पाहतात असे दिसते. ज्ञान किती आहे? हे सांगत असताना माझ्या हातात मोजके पाने आहेत आणि अरण्यात मोजता येणार नाही इतकी.... या उदाहरणातून बुद्धाने विश्वामध्ये ज्ञान फार मोठ्या प्रमाणात असून ते स्वतः चे स्वतः मिळवायचे असते असे सांगितले आहे. आपल्या पहिल्या पाच शिष्यांना वाराणसी जवळील एका तपोवनात गौतम बुद्धाने मध्यम मार्ग सांगितला. यातून बुद्ध धर्मातही गुरु शिष्य परंपरा अस्तित्वात होती. बुद्ध आपल्या शिष्यवर्गासह किंवा एकटे देश पर्यटन करीत असत.

सम्राट अशोकाने आणि इतर राजांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे बौद्ध धर्माच्या काळात सामाजिक आणि सांस्कृतिक उत्कर्ष मोठ्या प्रमाणात झाला. चिनी यात्रेकरू ह्यू एन श्वाग याने नालंदा विद्यापीठाचे जे वर्णन केले त्यावरून बौद्ध काळातील शैक्षणिक संस्थाना किती महत्त्व होते आणि त्यावर त्या काळात किती खर्च केला जात असे याचा विचार लक्षात घेण्यासारखा आहे. आचार्य गण, विद्यार्थी गण, विविध कलाकृतीचे शिक्षक थँक्यू सुंदर निवासस्थाने, मध्यवर्ती विद्यापीठ, कलापीठ या सर्वांचे त्याने वर्णन केलेले आहे. यावरून नालंदा विद्यापीठामध्ये वसतिगृह आणि वेगवेगळ्या विषयासाठी वेगवेगळ्या शिक्षक ही संकल्पना त्या काळापासून अस्तित्वात होती हे लक्षात येते.




गौतम बुद्धांचे समकालीन असलेल्या महावीर जैन त्याचे पहिली धर्म परिषद चंद्रगुप्त मौर्यच्या वेळी भरली असा उल्लेख सापडतो. बौद्ध धर्म आणि जैन धर्म यामुळे सांस्कृतिक विकासाला मोठ्या प्रमाणात गती मिळाली. त्यानंतर मुसलमानाच्या आक्रमणानुसार त्यांच्यासोबत आलेल्या अरबी इराणी तुर्की आणि मोगल संस्कृतीचा भारतीय संस्कृतीवर परिणाम झाला. कबीर, नानक अशा संतांच्या विचारसरणीत हिंदू आणि इस्लामिया दोन्ही धर्म विचारसरणीचा प्रभाव दिसू लागला. पुढे हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही जमाती एकत्र नांदू लागल्या. पुढे ब्रिटिश राज्याच्या स्थापनेने भारतीय जीवन आणि भारतीय संस्कृती त्यात अमुलाग्र बदल होत गेले. नागरिकांना समानच दर्जा देणारी शिक्षण संस्था जन्मास आली. आधुनिक विद्या कला व पाश्चात्य साहित्य यांच्या शिक्षणाचा लाभ सर्वांना होऊ लागला. त्यामुळे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून गेला. इंग्रजी शिक्षणामुळे क्रांतिकारक विचाराचे नेतृत्व उदयाला येऊ लागले.

लिखाण, वृत्तपत्रे, पुस्तके, शिक्षण इत्यादी साधनाच्या मदतीने समाज जीवन मोठ्या प्रमाणात बदलले. भारतीय संस्कृतीमध्ये शिक्षणामुळे कसा अमुलाग्र बदल होत गेला. याबाबत वरील प्रकारे लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी महत्त्वाचे विवेचन केले आहे, ते म्हणतात, इंग्रजी राज्याने आधुनिक शिक्षण, भौतिक सुविधा आणि सुधारलेली राज्यव्यवस्था यांची स्थापना करून काल्पनिक विश्वाला हादरा दिला. वैदिक संस्कृतीमधील श्रुती, स्मृती व पुराणे यांचे स्थान इतिहास, गणित, भूगोल, सृष्टी विज्ञान इत्यादी आधुनिक विद्यांनी घेतले. शब्दप्रामाण्य आणि रूढी प्रामाण्य झुकारून देणारा नवशिक्षितांचा वर्ग निर्माण झाला. बुद्धिवादामुळे जुन्या परंपरेतील दोषाचे व वैगुण्याचे अवलोकन करणारी दृष्टी लाभले आणि विज्ञानाने तपासलेली आचार विचार पद्धती रूढ करण्याचा उत्साह प्राप्त झाला. शिक्षण संपल्यानंतर प्रौढ वयास अनुरूप अशा शिक्षित वधूची आकांक्षा भारतीय तरुणांमध्ये उत्पन्न होऊ लागली. स्त्री शिक्षणाची चळवळ म्हणजेच स्त्री स्वातंत्र्याचे चळवळ होय. अशा वेगवेगळ्या उदाहरण आतून इंग्रज काळानंतर शिक्षणामध्ये घडून आलेल्या क्रांती बाबत लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपले विचार अतिशय सडेतोडपणे मांडले आहेत. महात्मा फुलेंसारख्या समाज सुधारकांचे शैक्षणिक कार्य अधोरेखित करून सर्वसामान्य लोकांना आधुनिक इंग्रजी विद्येचे शिक्षण लाभावे, सामाजिक जीवनात समता स्थापन व्हावे यासाठी तत्कालीन समाजसेवकांनी कार्य केल्याचे लेखकाने सांगितले आहे. राजा राममोहन राय, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, योगी अरविंद घोष, मानवेंद्रनाथ रॉय अशा तत्कालीन समाजातील महत्त्वाच्या व्यक्तींचा धर्मविषयक विचार सुद्धा लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या वैदिक संस्कृतीचा विकास या ग्रंथातील लिखाणाद्वारे उलगडले आहेत.

वैज्ञानिक दृष्टी व भारतीय संस्कृती यामध्ये भारतात गेल्या बाराशे वर्षात वैज्ञानिक प्रगती का थांबली? व वैज्ञानिक दृष्टी का कुंठित झाली याचे मीमांसा केली पाहिजे असे सुद्धा लेखक म्हणतात. यावरून बाराशे वर्षांपूर्वी असलेला वैज्ञानिक दृष्टिकोन आपसी हेवेदावे, जातीय आणि धार्मिक भेदाभेद याशिवाय अंधश्रद्धा यामुळे आपण हरवून बसलो याकडे लेखक आपले लक्ष वेधतात. प्राचीन जगाच्या विज्ञानाचा पाया भारताने घातला हे गृहीत धरले तरी आठव्या शतकापासून भारतातील वैज्ञानिक प्रगती खुंटलेली आहे, त्या मागचे कारणे सुद्धा लेखकाने दिलेले आहेत. या उलट ग्रीस देशात परंपरागत धर्म श्रद्धेवर आघात करणारे पंडित पुढे आले. त्यांना देहांत शिक्षा झाली. प्रसंगी निर्वासित व्हावे लागले तरी ग्रीक तत्त्वज्ञान विकसित पावत राहील. कार्ल मार्क्स, प्लेटो, अँरिस्टॉटल इतर ग्रीक तत्त्वज्ञानी यांचे वैचारिक पातळीवरील संशोधन सुरू होते. त्यामुळे युरोपियन देशात प्रचंड वैचारिक क्रांतीचे वारे वाहू लागले. विज्ञानाचे आराधना युरोपमध्ये वाढू लागली. सतराव्या शतकात वैज्ञानिक क्रांती सुरवात झाली. एकंदरीत मानव जातीशास्त्र व इतिहासाचे तत्वज्ञान या सर्वाच्या आधाराने भारतीय संस्कृतीचा विकास कसा झाला याबाबतचे प्रदीर्घ चिंतन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वैदिक संस्कृतीचा विकास या ग्रंथामध्ये लिहिला आहे.

पान १ वरून

## पाकिस्तानसमोर नव्या 'बलु'च्या बंडाचे आव्हान

पंजाबमध्ये दिवसाला सुमारे १५० ते २०० भारतीय रुपये मजुरी मिळते. बलुचिस्तानमध्ये दुप्पट पैसे मिळत असल्यामुळे अनेकजण तिथे जाऊन स्थायिक व्हायला प्राधान्य देतात. त्यामुळे बलुचिस्तानमधील लोकांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे.

बलुचिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणावर खनिजसंपत्ती आहे. तेथील खाणींचे ठेके चिनी कंपन्यांना देण्यात आले आहेत. आपल्या संपत्तीतील अर्धा हिस्सा चीन घेतो. सुमारे ३० टक्के वाटा पाकिस्तान सरकार अन्यत्र वळवते आणि आपल्याला केवळ २० टक्के मिळतात, अशी त्यांची भावना आहे. त्यामुळे त्यातील अनेकांनी हाती शस्त्रे घेतली आहेत. अन्य समाजांत लोक जसे भरजरी वस्त्र किंवा दागिने घालून मिरवतात, तसे बलुच लोक पाकिस्तानच्या स्वातंत्र्यापूर्वीपासूनच शस्त्रास्त्रे मिरवतात. बलुचिस्तानचा इतिहास अतिशय रंजक आहे. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि इराणमध्ये वाटला गेलेला बलुचिस्तान ओसाड आणि रुक्ष आहे. असे म्हणतात की, देवाने मातीपासून जग तयार केल्यावर उरलेली माती बलुचिस्तानमध्ये टाकली. हजारो वर्षांचा इतिहास असला, तरी तेथील लोकसंख्या छोट्या छोट्या टोळ्यांमध्ये विभागली गेली आहे.

ब्रिटिशांच्या काळातही हा सगळा प्रदेश विविध खानांच्या अधिपत्याखाली होता. त्यातील 'कलात' हे सगळ्यात मोठे संस्थान होते. कलातच्या खानाने भारताच्या फाळणीनंतर कलात आणि अन्य संस्थानांसह स्वतंत्र बलुचिस्तान देश तयार व्हावा, यासाठी मोहम्मद अली जिन्हांना आपला वकील म्हणून नेमले होते. पण, स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानने लष्करी बळाचा वापर करुन बलुचिस्तानवर ताबा मिळवला. तेव्हापासून विविध बलुची गट स्वातंत्र्यासाठी लढत आहेत. सुरुवातीच्या काळात पाकिस्तानने अमानुष पद्धतीने त्यांचे बंड चिरडण्याचा प्रयत्न केला. ते यशस्वी होत नाही, हे लक्षात आल्यावर प्रमुख टोळीवाल्यांना पैसा चारुन किंवा त्यांना सत्तेत वाटा देऊन त्यांच्यावर राज्य केले. पण, आता बलुच लोकांचे नेतृत्व सरदारांच्या हातून जाऊन नवीन पिढीच्या हाती आले आहे. ती सुशिक्षित आहे. लोकशाहीवर विश्वास ठेवणारी असून आपली गार्हाणी मांडण्यासाठी समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करत आहे. पाकिस्तानला असा संशय आहे की, भारतात अटल बिहारी वाजपेयींच्या सरकारच्या काळात पाकिस्तानबाहेर स्थायिक झालेल्या बलुच फुटीरतावाद्यांना मदत करायला सुरुवात केली.

पाकिस्तानच्या काश्मीरमधील कारवायांना बलुचिस्तानमध्ये उत्तर द्यायची योजना आकारास आली. यातील एकही गोष्ट पुराव्यानिशी सिद्ध करण्यात पाकिस्तानला अपयश आले असले, तरी २००९ साली इजिप्तमधील शार्म अल शेख येथे पार पडलेल्या अलिप्ततावादी चळवळीच्या बैठकीत भारत आणि पाकिस्तानकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या संयुक्त वक्तव्यात बलुचिस्तानचा संदर्भ जोडण्यात पाकिस्तानला यश आले. भारताने हे नाकारले असले, तरी या घटनेमुळे डॉ. मनमोहन सिंग यांची प्रचंड नाचक्की झाली. २०१४ साली नरेंद्र मोदी पंतप्रधान आणि अजित डोवल राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार झाल्यानंतर भारताने उघडपणे बलुच लोकांच्या आकांक्षांना साद घालायला सुरुवात केली. सुरुवातीला या संघर्षाची व्याप्ती पाकिस्तानपुरती मर्यादित होती. पण, आज त्यात चीन आणि अमेरिकेचा समावेश झाला आहे. चीनने 'बेल्ट रोड प्रकल्पा'अंतर्गत पाकिस्तानमध्ये ६५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला असून, त्यातील अनेक प्रकल्प बलुचिस्तानमध्ये आहेत. ग्वादर बंदरामुळे आसपासच्या लोकांना समुद्रात मासेमारी करता येत नसल्यामुळे त्यांच्यात नाराजी आहे. तेथे सापडलेल्या नैसर्गिक वायूच्या विक्रीतून मिळणार्या महसुलाच्या अवघा १२.५ टक्के वाटा बलुचिस्तानला मिळत असल्यामुळे आपल्याला लुबाडले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. आजवर पाकिस्तान अमेरिकेकडे भारताविरोधात तक्रार करत असे. पण, आता चीनला शह देण्यासाठी अमेरिकाही बलुच लोकांना मदत करत असल्याची भीती पाकिस्तानला आहे. पाकिस्तानच्या डोक्यावर चीनचे प्रचंड कर्ज असून 'बेल्ट रोड प्रकल्पा'च्या यशातच ते कर्ज फेडले जाण्याची शक्यता होती. आज बलुचिस्तानमधील बंडामुळे पाकिस्तानचे आर्थिक भवितव्य आणखी धूसर होत आहे.

## रूपे गणेशाची



दुसरीकडे तांत्रिकांचेही काही गणपती आहेत. मला अशा काही मूर्तींकडेही गणेशभक्तांचे लक्ष वेधण्याची इच्छा आहे. सर्वप्रथम इथे लक्षात घ्यायला हवे की, तंत्राचे दोन प्रकार आहेत. एका प्रकाराला वामाचार म्हणतात आणि दुसरा आहे तो समायाचार. नाही म्हटले तरी संपूर्ण देशात मिळून वामाचाराच्या मूर्ती पाच-पन्नासाच्या संख्येत बघायला मिळतात. महाराष्ट्रातच अशा चार-सहा मूर्ती आहेत. त्यातील काही औंढा नागनाथला तर हिंगोली जिल्ह्यात आणखी एके ठिकाणी मिळतात. या सगळ्यात मी विशेष लक्ष वेधू इच्छितो ते कुंडलिनी गणेशमूर्तीकडे. कुंडलिनी गणेशाची एकमेव मूर्ती महाराष्ट्रात असून भारतात अन्यत्र कुठेही बघायला मिळत नाही. कालौघात ते क्षतिग्रस्त झाले आहेत. एकमेव असल्यामुळे ती विशेष महत्त्व राखून आहे. कुंडलिनी गणपतीचे व्यवच्छेदक लक्षण असे की, मूर्तीला वेणी असते. मूर्तीच्या मानेपासून खाली नितंबापर्यंत पाठीवर तिपेडी वेळी रुळत असल्याचे स्पष्ट दिसते. या मूर्तीबद्दल गणेश अथर्वशीर्षामध्ये '**त्वं मूलाधारः स्थितोसि नित्यम।। त्वं शक्तित्रयात्मकः।। त्वां योगिनो ध्यायन्ती नित्यम।।**' असे वर्णन आहे. म्हणजेच योगी नित्य ध्यान, पूजा करतात अशी ही मूर्ती आहे. या मूर्तीच्या पाठीवर कुंडलिनी म्हणजे वेणी आहे. ही तिपेडी वेणी नागिणीसारखी पाठीवरून रुळत खाली येते आणि खाली मूलाधार आहे. अशा पद्धतीने ही वेणी आपल्याला दिसते. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात कुंडलिनीचे वर्णन आहे. ते वर्णनही या कुंडलिनी गणेशाला तंतोतंत लागू पडते. म्हणूनही या मूर्तीचे महत्त्व अधोरेखित होते.

मुख्य म्हणजे ती सामान्य भाविकांना पूजेत ठेवता येते. ते तिची पूजा करू शकतात. इथे लक्षात घ्यायला हवे की, कल्पनेतून निर्माण केलेल्या मूर्तींना शास्त्राधार नसतो. मुद्दाम हे सांगायचे कारण म्हणजे गणेश मंडळे गणपतीच्या वेगवेगळ्या प्रकारच्या मूर्ती घडवतात. त्यांचा आकारही भला मोठा असतो. कुठे युद्ध सुरू असेल तर उत्सवातील गणेशाच्या हातात बंदूक दिलेलीही पाहायला मिळते. असे बरेच प्रकार बघायला मिळतात. पण लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे या गणेशमूर्तींची पूजा केली जात नाही, तर त्यासमोर ठेवलेल्या छोट्या मूर्तीची पूजा केली जाते. कल्पनेतून निर्माण झालेल्या गणेशमूर्तींची पूजा शास्त्रशुद्ध म्हणता येत नाही. गणेशाची आराधना, पूजा करता अशा एक ना अनेक बाबींची दखल घ्यावी लागते. अभ्यास करता या देवतेची नानाविध वैशिष्ट्ये समोर येतात. ती तिचे महत्त्व आणि माहात्म्य दाखवून देतात. (लेखक प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ; संशोधक आहेत.)

## सुवर्ण गणेश



संपूर्ण कोकण किनारपट्टीला समुद्राची साथसंगत लाभलेली आहे. समुद्राची गाज कोकणवासीयांच्या जगण्यातलं अविट संगीत आहे. दिवेआगार कोकणातले एक छोटसं गाव. समुद्र उशाला घेऊन वसलेले दिवेआगार आणि इथला सुवर्ण गणेश पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र झालेलं. इथला समुद्र निसर्गाचं अथांग विशाल रूप आहे आणि इथला सुवर्ण गणेश अरूपाचे रूप आहे. आम्ही म्हणजे आनंद, अपर्णा, निधी, अनिश आणि आम्ही दोघे अशी सहा जण दिवेआगारला गेलो.

आम्ही ज्या रिसॉर्टमध्ये उतरलो होतो त्याच्यापासून काही अंतरावर सुवर्ण गणेशाचं मंदिर असल्याचं कळलं. आम्ही रात्री अंधार पडल्यावर सुवर्ण गणेशाच्या दर्शनाला गेलो. कारण रात्री सुवर्ण गणेश मंदिरात दीपोत्सव असल्याचे कळले होते. प्राचीन बांधणीचं लाल दगडात बांधलेलं मंदिर, समोरचा सभामंडप, मंदिराच्या उजव्या-डाव्या बाजूला उभ्या असलेल्या दगडी-लाल दीपमाळा पणत्यांनी लखलखत होत्या. सभामंडपासमोर पन्नासेक माणसं एकावेळी बसू शकतील एवढा ओटा होता. त्या ओट्यावर, सभामंडपात सगळीकडे पणत्या झगमगत होत्या. भवताली साचून राहिलेल्या काळोखावर आपल्या इवल्या इवल्याशा प्रकाश थेंबांनी त्या पणत्या मात करू पाहात होत्या. असंख्य ज्योती प्रकाशाचे कण वातीच्या टोकावर घेऊन तेवत होत्या. गाभाऱ्यातही पणत्यांची आरास मांडली होती. सुवर्ण गणेशाची मूर्ती त्या प्रकाशाच्या तेजाने उजळली होती. सुवर्ण गणेशाची पूर्णाकृती मूर्ती इथे नाही.

देवळाच्या गाभाऱ्यात शेंदूरचर्चित गणेश मूर्ती आहे तर सुवर्ण गणेशाचा सोन्याचा मुखवटा चारही बाजूंनी काच असलेल्या एका चौकोनी मंजुषेत कडेकोट बंदोबस्तात ठेवलेला आहे. झळझळीत असा तो सुवर्ण गणेश पाहतच राहावे असा तेजस्वी, देखणा आहे. कोकणात एका गावातल्या एका बाईच्या शेतात सोन्याचा गणपती सापडला. तिने तो गावातल्या मंदिरात ठेवला. सगळीकडे या सुवर्ण गणेशाची ख्याती पसरली. सुवर्ण गणेशाच्या दर्शनाला लोक दुरून दुरून यायचे. एक दिवस या सुवर्ण गणेशाची चोरी झाली. चोरट्यांनी सुवर्ण गणेश चोरला. पोलिसात तक्रार नोंदवली गेली आणि सुवर्ण गणेश चोरणारे चोरटे सापडले. त्यांनी ती गणेश मूर्ती वितळवली होती. तिचा गोळा केला होता. त्याच सुवर्ण गोळ्यातून गणेशाचा मुखवटा तयार करून दिवेआगाराच्या एका गणेश मंदिरात लोकांना दर्शनासाठी ठेवण्यात आला. तोच हा सुवर्ण गणेश. देवळात एका फलकावर ही सगळी माहिती लिहिली होती. कदाचित त्या सुवर्ण गोळ्यातून पूर्णाकृती मूर्ती तयार करणे शक्य झाले नसेल म्हणून केवळ गणेशाचा मुखवटा तेवढा घडवला असेल. जो निर्गुण निराकार आहे, त्याला माणसांनी मूर्तीचा आकार दिला. त्याला सोन्यातचांदीत घडविले तरी त्यातील मूळ तत्त्व कायम राहतं. भक्तांना सगुण भक्तीसाठी एक माध्यम हवे असते. मग ईश्वरी तत्त्वाला मूर्तिरूप दिले जाते. कुठल्याही नाम रूपाने असो, ईश्वर भक्तासांठी देवळाच्या गाभाऱ्यात स्थित असतो. देवीदेवतांच्या रूपाचे वर्णनं आपल्याला पोथ्यापुराणांमध्ये वाचायला मिळते. तेच प्रमाण मानून देवाच्या मूर्ती घडवल्या जात असणार. मग ती दुर्गा असते.

गणेश असतो. विटेवर युगे अठ्ठाविस उभा असलेला विठ्ठल असतो. प्रत्यक्षात ईश्वराला कोणी पाहिलेलं नाही. तापसी, योगी, साधुसंत यांना ईश्वर दर्शन घडल्याचे दाखले मिळतात. संतांच्या चरित्रात धार्मिक ग्रंथामध्ये ईश्वरी स्वरूपाचे वर्णन असले, तरी त्याचे स्वरूप पूर्णपणे कोणालाही आकळलेलं नाही. देवाच्या मूर्ती घडवताना आधार असतो धर्मग्रंथांचा, देवीदेवतांच्या रूपवर्णनाचा. त्यांच्या चमत्काराच्या अनेक दंतकथा, पोथ्या-पुराणांमधून वाचायला मिळतात. बुद्धीची देवता श्रीगणेश शाडू मातीच्या, पितळेच्या, तांब्याच्या, चांदीच्या सोन्यात मूर्तिरूपात घडवली जाते. अनेक देवी-देवतांपैकी आपल्याला सुपरिचित असलेले आणि भक्तांना प्रिय असलेले दैवत म्हणजे श्रीगणेश. श्रीगणेश; महादेव आणि पार्वती मातेचं अपत्य आणि सर्वांची लाडकी देवता.

महाराष्ट्रात श्रीगणेशाची असंख्य देवळे आहेत. अष्टविनायक तर प्रसिद्धच आहेत. श्रीमंत पेशवे यांचे आराध्य दैवत श्रीगणेश होते. पुण्यात ठायी ठायी श्रीगणेशाची मंदिरे आहेत. श्रीगणेश हे देवीसारखे उग्र दैवत नाही. शक्तीच्या उपासनेत कमी पडले तर ती कोपेल अशी श्रद्धाळूंना भीती वाटत असते. गणपतीच्या पूजा-अर्चनेच्या बाबतीत सर्व काटेकोर व्हायला हवं असा प्रयत्न असतो, पण कुठे काही कमी पडले तर तो दयाळू कृपाळू श्रीगणेश निभवून नेणार, असा विश्वास असतो. अलिकडे काही लोकांना श्रीगणेश आपले सर्व अपराध बिनदिक्कत पोटात घालणार, याची पूर्ण खात्रीच असते. त्यामुळे सार्वजनिक गणपती बसवायचा अन् गणपतीच्या मंडपामागे रात्री उशिरापर्यंत दारूजुगाराचा अड्डा जमवायचा. गणपतीसमोर स्टेजवर उत्तान गाण्यावर त्या गाण्यापेक्षाही उत्तान हावभाव, अंगविक्षेप करून तरणे पोरपोरी अन् लहान मुले बेभान नाचत असतात. श्रीगणेश आपल्या बारीक डोळ्यांनी अन् तीक्ष्ण दृष्टीने सर्व पाहात असतो. दिवसरात्र अश्लील गाणी आपल्या सुपासारख्या कानांनी ऐकत असतो.

लंबोदर गजानन भक्तांचे अपराध आपल्या पोटात घालत असतो. वाद्यांचे कर्कश आवाज नाईलाजाने ऐकत असतो. मात्र, गणेशोत्सव मंडळांनी तयार केलेले देखावे अतिशय देखणे असतात. बरीचशी मंडळे समाजप्रबोधनपर कार्यक्रम करतात, समाजोपयोगी कार्य करतात. या मंडळांनी गणेशोत्सव सत्कारणी लावलेला असतो. गणपती बाप्पा हे सगळं पाहताना नक्कीच सुखावत असेल; मात्र काही श्रीगणेशाच्या गोड गोंडस रूपाचे जे काही आधुनिकीकरण करतात ते योग्य वाटत नाही. गणपती अथर्वशीर्षात गणेशाच्या मूळ रूपाचे जे वर्णन केले आहे... 'एकदंत वक्रतुंड चर्तुहस्तं पाशांकुश धारीणं शेंदुरचर्चित लंबोदर' असं गणेशमूर्तीचे रूप भक्तांना अपेक्षित आहे. तो एकदंत आहे, तो चतुर्भुज आहे. पाश आणि अंकुश त्याने धारण केले आहे. तो शेंदूर चर्चित आहे. त्यांच्या एका हातात तुटलेला दात आहे. तो गणेश लंबोदर आहे. आपण याच रूपात श्रीगणेशाला पाहात आलो आहे. त्याचे वाहन मूषकराज त्याच्या सोबत असतो. तो वरद गणेश आहे. भक्तांना वर देणारा आहे. तो विघ्नहर आहे. भक्तांवर आलेले विघ्न तो दूर करतो.

फळांचा गणेश, फुलांचा गणेश, वस्तूंची गणेशमूर्ती कुठल्या तरी नेत्यापुढाऱ्याच्या रूपातील गणेशमूर्ती विविध पोशाखातील गणेशमूर्ती करणे म्हणजे त्या मुळारंभ आरंभ असलेल्या बुद्धिदेवतेचे विडंबन आहे. गणेश मूर्ती 'रक्तवर्ण सुपूजितम' अशीच असावी. 'योगिनो ध्यायन्ति नित्यम्' योगी ज्याचे ध्यान करतात असा हा श्रीगणेश. श्रीगणेशाची स्थापना झाली की, घरात पावित्र्याचा सुगंध दरवळतो. गणेश १४ विद्या ६४ कलांचा अधिपती आहे. तो सर्वत्र आहे. तो चराचरात भरून राहिलेला आहे. दिवेआगारच्या सुवर्ण गणेशासमोर नतमस्तक होताना श्रीगणेशाची अनेक रूपे डोळ्यांसमोर आली. कुणा एका स्त्रीला तिच्या शेतात मिळालेली मूळ गणेश मूर्ती चोरीला गेली, पण चोरट्यांकडून मिळालेल्या सोन्यातून श्रीगणेशाचा मुखवटा तर घडवता आला. शेतात सापडलेला गणेश आता वेगळ्या रूपात भक्तांच्या समोर आला. सगुण भक्ती करणाऱ्यांना हा सुवर्ण गणेश लाभो; निर्गुण भक्ती करणाऱ्यांच्या हृदयात तो स्थित आहेच. तो सगुण असो की निर्गुण, तो आनंदमय आहे.

ज्योती पुजारी

संतांनी भारतीय एकता व एकात्मतेचा पाया दृढ करण्याचे ऐतिहासिक कार्य केले. सकल समाजाला भक्तीच्या ध्वजेखाली सन्मानपूर्वक स्थान दिले. त्यामुळेच भारतातील अनेक पंथ- संप्रदायात मुस्लिम संतजनांची नावे दिसतात. संत कबीर, रहीम रसखान प्रमाणेच महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायात श्रीगोंद्याचे मुस्लिम संत शेख महंमद यांच्या साहित्याचे कार्य व योगदान विशेष आहे. 'पवन विजय' 'योगसंग्राम' हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ' नमोजी अव्यक्त रामा' अशी ग्रंथाची सुरवात करून तो रामाचे विविध प्रकारे गुण वर्णन करतो.

लेखांक ३६

# संत शेख महंमदाच्या 'योगसंग्राम' मधील 'राम'

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

**शेख महंमद अविंध।**
**परी त्याचे हृदयी गोविंद्।।**

महाराष्ट्रातील संत मालिकेत 'श्रीगोंदा' (नगर) येथील मुस्लिम समाजातील वारकरी संत शेख महंमद यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. त्यांचा 'योग संग्राम' हा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. इ.स. १६२६ ते १६९६ हा संत शेख महंमद यांचा काळ असून संत एकनाथांचे गुरू जनार्दनपंत हे शेख महंमदांचे गुरुबन्धू मानले जातात. साक्षात्कारी योगपुरुष चांद बोधले हे त्यांचे गुरू होते.

मालोजीराव भोसले शेख महंमदांना गुरुस्थानी मानत होते. महाराष्ट्रात त्यांना संत कबीरांचा अवतार म्हणूनही मानले जाते. त्यांनी मराठीत अभंग, ओवी मधून विपुल काव्यरचना केलेली आहे. त्यांचे 'योग संग्राम', 'पवन विजय', 'निष्कलंक प्रबोध' हे ग्रंथ त्यांच्या तत्त्वचिंतनाचे व साक्षात्कारी भक्तीचे दर्शन आहेत.

**नारळ वरूता कठीण। परी अंतरी जीवन।**
**शेख महंमद अविंध। परि त्याचे हृदयी गोविंद्।।**

हा त्यांचा अभंग वारकरी भक्ती संप्रदायाशी ते कसे समरस झाले होते याचे द्योतक आहे. त्यांची श्रीगोंदा (जि. पु.अहिल्यादेवी नगर) येथे समाधी असून फाल्गुन वद्य नवमीला तेथे मोठी यात्रा भरते.

संतकवी महिपती, पंडित कवी मोरोपंत आणि समर्थ रामदास भक्त हनुमंत स्वामी यांनी आपल्या साहित्यात शेख महंमदाची कार्यस्तुती केलेली आहे. संत शेख महंमद हे पंढरीची वारी करणारे होते त्यामुळे 'राम कृष्ण हरी' हा वारकरी नाममंत्र त्यांच्या नामस्मरण भक्तीचा केंद्रबिंदू आहे.

**श्रीकारि नमोजी नारायणा।**
**'या अल्ला' म्हणती यवन।**
**यावेगळी अनेक स्तवने।**
**साही दर्शनांची।।**

असा अद्वैत विचार मांडून हिंदु मुस्लिम ऐक्याचा त्यांनी आपल्या आचारातून व विचारातून पुरस्कार केला. ' नमोजी अव्यक्त रामा।' अशा मंगलाचरणाने त्यांनी 'योग संग्राम' ग्रंथाचा प्रारंभ केलेला आहे.



गीता, भागवत या ग्रंथाबरोबरच विविध पुराणे आणि वाल्मिकी रामायणासह अनेक रामायणे यांचा संत शेख महंमदाचा व्यासंग होता. हे त्यांच्या ग्रंथातील श्रीराम चरित्रातील विविध प्रसंग वर्णनावरून दिसते. 'योगसंग्राम' च्या ७ व्या अध्यायात संत शेख महंमद म्हणतात,

**रघुनाथ जन्मला मातेच्या कुशी।**
**सोडविले तेहतीस कोटी देवांशी।**
**अनेक उद्धरिले पतिताशी। निज नाम मंत्रे** ।।७:३०।।

शेख म्हणतो बिभीषण रामाचा भाऊ

'योगसंग्राम' ग्रंथातील १७ व्या अध्यायातील प्रतिपादनात संत शेख महंमद पुन्हा एकदा रामकथेतील प्रसंगाचा दाखला देतात. या अध्यायातील ओवी क्र. १६४ ते १८६ अशा २३ ओव्या रामकथेविषयक आहेत. त्यामध्ये आपणास 'राम-बिभीषण' नात्या संबंधात एक नवी गोष्ट शेख महंमद सांगतात-

**पिंड होता घरीने नेला।**
**त्याचा बिभीषण जन्मा आला।**
**मागुता रामापे ठाकून आला।**
**नाते बन्धुचे धरूनिया।।** (यो.सं.अ. १७ ओ. १७०)

पुत्र प्राप्तीसाठी यज्ञदेवाने जो प्रसाद दिला तो राजा दशरथाने आपल्या तीन राण्यांना, कौसल्या- सुमित्रा- कैकयी यांना दिला. तो कैकयीच्या हातातून झडप मारून एक घार घेऊन जाते. तोच पिंड (प्रसाद) अंजनीबरोबर बिभीषणाच्या आईला कैकसीला घारीकडून मिळतो. आणि त्या पिंडापासून कैकसीला बिभीषण होतो. त्यामुळे एकाच यज्ञ पायस पिंडापासून राम व बिभीषणाचा जन्म झाल्याने ते दोघे धर्मदृष्ट्या बंधू होतात. या मुळच्या बंधूभावामुळे बिभीषण रामाला जाऊन मिळतो आणि लंका विजयानंतर राम त्याला भाऊ समजूनच लंकेचे राज्य देऊन टाकतो. ही मूळ वाल्मिकी रामायणात नसलेली कथा संत शेख महंमदानी नेमकी कोणत्या रामायणातून घेतली ते लिहिलेले नाही.

'योगसंग्राम' ग्रंथातील जो संग्राम आहे तो आत्मा विरूद्ध विकार असा आहे. याच्या १७ व्या अध्यायात राम विरूद्ध वाली व राम विरूद्ध रावण अशा युद्धाला ते 'निर्मल आत्मा' विरूद्ध 'विकारवश अहंकार' अशा रूपकात सादर करतात. या अहंकाराने वाली व रावण शरीर व्यापलेले आहे. आणि अशा वालीस व रावणास रामाने म्हणजे निर्मल आत्म्याने ठार केले असून विकारी शरीरावर आत्म्याचा विजय झाला आहे. त्याचे वर्णन 'रामे पुरुषार्थ केला खरा।' अशा शब्दात केलेले आहे. 'योगसंग्राम'च्या काही ओव्यांमध्ये राम व हनुमंताचे सख्य वर्णन केलेले आहे.

**रामनाम अनेक युगाचे जुनाट:-**

'योगसंग्राम' मध्ये संत शेख महंमद यांनी रामायणातील 'श्रावणबाळ' कथा वर्णिलेली आहे. ही कथा सांगून शेख महंमद रामनाम हे राम जन्मा पूर्वीचे अनेक युगाचे जुनाट आहे असे म्हणतात.

श्रावणबाळाला दशरथाचा बाण लागला तेव्हा तो मरणप्राय वेदनांनी घायाळ होऊन पडला तेव्हा राम राम असा अखेरचा धावा करीत होता. त्या ओव्यांपैकी काही ओव्या पहा-

**राम नाम अगाध। अनेक युगाचे जुनाट।**
**श्रावणबाळ राम राम। मुखे उच्चारी ।।**

राम नामाचा असाच अगाध महिमा सांगताना संत शेख महंमद सागर सेतूचा प्रसंग वर्णन करतात व राम नामाने शिला (दगड) समुद्रात तरल्याचे सांगतात. योगसंग्राम ग्रंथाचा समारोप करतानाही संत शेख महंमद राम नामाचे वाचकांना स्मरण करून देतात. राम नामाच्या प्रभावापुढे यम सुद्धा लोटांगण घालतो असे म्हणत ते राम नामाचे माहात्म्य गातात.


**मुखातून 'श्रीराम जय राम' द्रवे।**
**यम लोटांगणी जाती** ।। (१८.२८४)

रावणाच्या बंदीवासात केवळ सीताच नव्हती तर अनेक देवही बंदीवास भोगत होते. या देवांची रामाने सुटका केली अशा प्रकारे राम हा देवांपेक्षा पराक्रमी होता. हीच रामाची थोरवी आहे.

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग १३)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्तत्वाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्यांचं सदैव जागृत असलेलं कवीमन. त्यांच्या कथा, कादंबरी, नाटक आदी सर्व साहित्यप्रकारातून डोकावतं ते त्यांचं कवीहृदय. म्हणून मागच्या भागात मी रवींद्रनाथांना कवींद्रनाथ असं म्हटलं होतं. त्यांच्या कविता म्हणजे केवळ शब्दांची जुळणी किंवा नादमय अशी रचना नव्हती. प्रसिद्ध आंग्ल कवी वर्डस्वर्थ याने कवितेची व्याख्या करताना 'Sontaneoru overflow of powerful feelingr' असं म्हटलं आहे. पण रवींद्रनाथांची कविता यापेक्षाही खूप काही वैशिष्ट्ये धारण करणारी आहे.

रवींद्रनाथ जीवनातील सत्य, सुंदर आणि शिव या त्रयीचे उपासक होते. त्यांनी निसर्गसह जीवनाच्या विविध क्षेत्रातील अनुभव घेतला, तो अत्यंत रसरशीतपणे आणि जिवंत होऊन त्यांच्या काव्यात प्रकट झाला आहे. अशी कविता सर्वव्यापी होते. जागतिक स्तरावर काव्यातील उदात्त भावनांची अनुभूती देण्याचं सामर्थ्य अशा रचनांमध्ये प्रकटतं. 'गीतांजली' हा त्यांचा काव्यसंग्रह नोबेल पुरस्कारप्राप्त ठरला तो याच सगळ्या काव्यगुणांमुळे. ज्या वयात मुलं लिहावाचायाला शिकतात, शाळेत जायची सुरुवात करतात, त्या वयात रवींद्रनाथांनी कवितेशी मैत्री केली. त्यांची आणि कवितेची लहानपणापासूनची जी गट्टी जमली, ती अगदी आयुष्याच्या अखेरीपर्यंत. अगदी आपल्या आयुष्यातील शेवटचे क्षण मोजत असतानाही हा महाकवी कवितेची आराधना करीत होता. सात ऑगस्टला त्यांचे निधन झाले. त्या दिवशी आपल्या मृत्यूच्या केवळ अर्धा पाऊण तास आधी त्यांनी ' मृत्यूवर ' कविता केली आणि आपल्या जवळ असणाऱ्या व्यक्तींना ती लिहून घ्यायला सांगितली.

पु. ल. देशपांडे यांनी आपल्या 'रवींद्रनाथ: तीन व्याख्याने' या पुस्तकात गांधीजींच्या जीवनातील एक प्रसंग सांगितला आहे. तो लक्षात घेतला म्हणजे रवींद्रनाथांच्या कवितेतली ताकद लक्षात येते. गांधीजी तसे कवितेचे रसिक म्हणून प्रसिद्ध नाहीत. ते कवितेचे किंवा गीताचे रसिक किंवा जाणकार असूही शकतील. पण, आपल्याला ते माहिती आहेत ते प्रामुख्याने स्वातंत्र्यासाठी शांततेच्या मार्गाने लढा देणारे, सत्याग्रहाचे शस्त्र उपासणारे गांधीजी.

गांधीजींसारख्या नेत्यांना किंवा आपलं ध्येय ज्यांच्या दृष्टीसमोर कायम आहे अशा महापुरुषांना आपल्या जीवनातील गोष्टींचा अग्रक्रम ठरवावा लागतो. कशाला प्राधान्य द्यायचे आणि कशाला नाही हे ठरवावे लागते. त्यासाठी त्यांना बरेचदा वैयक्तिक सुखाचा त्याग करावा लागतो. तसाच काही विचार करून गांधीजींनी आपली काव्यरसिकता बाजूला ठेवलेली असू शकते. पण तरीही रवींद्रनाथांच्या काही कविता या त्यांच्या जीवनाच्या आधार झाल्या होत्या.

गांधीजी १९३२ साली येरवडा येथील तुरुंगात उपोषण करीत होते. गांधीजींच्या मनाची अवस्था काहीशी निराश आणि नाजूक झाली होती. अशा त्यांच्या त्या मानसिक अवस्थेच्या काळात ७२ वर्षे वय असलेले रवींद्रनाथ त्यांना भेटायला आले. त्यावेळी गांधीजी मनामध्ये रवींद्रनाथांची कविताच आठवत होते.

जणू त्या कवितेच्या शब्दांचा त्यांना आधार वाटत होता. आणि अशा त्या नाजूक क्षणी त्या महामानवाने या महाकवीला आपली ती कविता म्हणायला सांगितलं. आणि त्या महात्म्याच्या विनंतीवरून या महाकवीने चक्क ही कविता गाऊन दाखवली. त्या कवितेचे शब्द होते... (पान ६ वर)

# संत गाडगेबाबासारखा विनोदसम्राट झाला नाही

अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

विनोदी साहित्यनिर्मिती करुन माय मराठीची सेवा करणारे समस्त विनोदी साहित्यिक आपापल्यापरीने विनोदाचे दालन उघडून हास्य परंपरा समृद्ध करण्याचे वैभवशाली कार्य अव्याहतपणे सुरु ठेवतात. आपली आवड, छंद, व्यासंग प्रत्येकाने जोपासावे तो लोकशाहीने आपल्याला दिलेला अधिकार आहे. त्यातही जो व्यासंग आपण जोपासतो त्याचा संबंध हा जनकल्याणासाठी आहे. तो उपक्रम आपण जाणिवपूर्वक जोपासला पाहिजे, पण हे कार्य करतांना माझ्यातील 'मी' मोठा करुन जो विनोदवीर जगेल. तो इतरांना किती आनंदी करेल हे सांगता येत नाही, पण तो स्वतःच जास्त दुःखी होण्याची शक्यता अधिक आहे.

विनोदी साहित्यिक किंवा वक्ता म्हणून एकदा का ख्याती मिळायला सुरुवात झाली की आपल्या प्रत्येक वाक्याला लोकांनी हसून किंवा 'व्वा व्वा' करुन दाद दिली पाहिजे. हा आजार त्या व्यक्तीला जडतो. कोणत्याही छंदाचा आनंद घेणे ही बाब खूप महत्वाची, पण त्याचा आजार होणे याला उत्तम कसे म्हणावे? विशेषता ज्याच्याकडे बेताचीच शिदोरी आणि संयमाचा अभाव असतो अशा विनोदवीरांच्या अपेक्षा मात्र खूप मोठ्या असतात. एका साहित्य संमेलनात एका विनोदवीराने विनोद केला. तो कोणाच्याही लक्षात आला नाही. कोणीही हसले नाही. मग व्वा..व्वा..ची दाद मिळाली नाही किंवा कोणाच्याही चेहर्यावरची रेषही हलली नाही. तेव्हा हे महाशय मनातून खूप चिडले, माझा विनोद समजण्यासाठी लेव्हल पाहिजे असे माईकजवळ येवून अक्षरशः ओरडलेच. त्यामुळे माईकमधून त्यांचा आवाज फाटला. एक खोडसाळ श्रोता जोरात ओरडून म्हणाला, आता खास विनोद झाला. त्यानंतर मग, व्वा.. व्वा..,बहोत अच्छे, क्या बात है! असा जल्लोष करुन एकच हशा पिकला. त्यामुळे व्यासपीठावर उभे राहणाऱ्या समस्त सारस्वत पुत्रांनो, श्रोत्यांना मूर्ख समजण्याची चूक अनावधानाने सुद्धा करु नका. ते खूप लवकर आपले मूल्मापन करुन आपण किती महामूर्ख आहात हे पुराव्यासह सिद्ध करु शकतात. याचा विसर पडू देवू नका. आपण चार पुस्तकं वाचली आणि थोडासा सभाधिटपणा आला की या क्षेत्रातले जग आपण जिंकले, असा सोयीचा समज आपण करुन घेतो पण तो समज आपला प्रचंड गैरसमज आहे. हे ठरवण्याचे काम मायबाप श्रोते करत असतात. अतिशय शांतपणे प्रत्येक पावलावर विचार जो करु शकतो, तोच दर्जेदार विनोद करुन इतरांना आनंद देऊ शकतो.



अलिकडे प्रसार माध्यमामुळे विनोदासाठी खूप चांगले दिवस आले आहेत. त्यामुळे विनोदी साहित्य आणि विनोदी सादरीकरणाला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. उत्कृष्ठ विनोदी सादरीकरणाला 'हास्यसम्राट' हा सन्मान देऊन या कार्याचा गौरव करण्यात येतो. मालिकेत स्क्रिप्ट ठरलेली असते. त्यामुळे तिथे संवाद ठरवून दिलेले असतात. ज्या वेळी हे सादरीकरण सभेत जाऊन आपल्याला करायचे असते, तेव्हा उत्स्फूर्त बोलून बरेच प्रासंगिक विनोद करण्याची संधी असते. ते विनोद करुनही विनोदाचा दर्जा घसरणार नाही, याची दक्षता घेणारा खरा हास्यसम्राट. श्रोत्यांनी हसावे म्हणून दर्जाहिन विनोद करणे हे व्यवसायनिष्ठ विनोवीरांचे ध्येय, पण श्रोत्यांची अभिरुची बदलावी. त्या अभिरुचीत त्यांच्या मानवी मनाचा व विचारांचा उच्चांक दिसावा. ते उन्नत होण्याला आपण किती प्राधान्य देतो?

गडगंज मानधन घेवून अतिशय उच्च विद्याविभूषित विनोदवीर गर्दी खूष करण्यासाठी दर्जाहिन विनोद करतात. पातळी सोडून विनोद करण्याची चढाओढ अलिकडे लागलेली दिसते. त्यावेळी दर्दी श्रोत्यांना या सादरीकरणा विषयी काय वाटते? याचा विचार करण्याची गरज त्यांना अजिबात वाटत नाही. आम्ही लोकांना खूप हसवतो आणि 'रडवणं खूप सोप्पं, हसवणं खूप अवघड' या वास्तवाचा आधार घेवून बकवास विनोदी सादरीकरणात रमलेले विनोदवीर मी पाहिले आहेत. त्यांच्या कार्यक्रमात हशा आणि टाळ्याऐवजी, शिट्या, आरडाओरड आणि बकवास कॉमेंट्स मोठ्या प्रमाणात दिसून येतात. राजकीय नेत्यांच्या कोणत्याही आनंदाप्रित्यर्थ होणारे कार्यक्रम केवळ मतदार खूष करण्यासाठी दर्जाहिन असले तरी हरकत नाही. या मानसिकतेला नेमकी कोणती उपमा द्यावी. जमलेली गर्दी फक्त खूष झाली पाहिजे. ही अत्यंत सवंग मनोवृत्ती अलिकडे खूप रौद्ररूप धारण करत आहे. उत्कृष्ठ विनोदी लेखकाच्या लेखणीतून उतरलेले विनोदी साहित्यनिर्मितीचे सोने करण्याचे महान कार्य तेवढ्याच दर्जेदार सादरीकरणात असते. त्यासाठी विशिष्ट मेहनत घेवून कमावलेला आवाज, उच्चार, आरोह अवरोह, देहबोली, प्रचंड आत्मविश्वास, श्रोत्यांची विनोद ऐकण्याची मानसिकता तयार करुन त्यांना विनोद विश्वात रममाणं करुण आनंद विहारात घेवून जाणे. मी माझं दैनंदिन जीवन काही कालावधीसाठी विसरलो. आपण दैनंदिन समस्या विसरलो, कटकटी विसरलो, आमच्या मनातील राग विसरलो, मुख्य म्हणजे दु:ख विसरलो. मला मानवी जीवनातील आनंद सापडला. हा प्रत्यय जेंव्हा विनोदाचा आस्वाद घेणाऱ्या रसिकाला मिळेल, तेव्हा त्यांची रसिकता वाढीस लागेल. माणसं खळखळून हसली पाहिजे. मानवी जीवनच निर्भेळ आनंद घेण्यासाठी आहे. त्या आनंदाने माणसातील माणूसपण एवढं उत्तुंग व्हावं की ईश्वरालाही माणसांकडून निर्भेळ आनंद कसा घ्यावा? याचे अनुकरण करण्याचा मोह व्हावा. मानवी मनातील, विचारातील बदल वायूवेगाने होणार नाहीत. आपल्या समोर जे उपलब्ध आहे त्यातील काय स्विकारावं आणि काय नाकारावं? हा नेहमीच संभ्रमित करणारा प्रश्न आहे. पण सर्व निश्चित करणारा पथदर्शक मात्र त्याला दिशा देवू शकतो. तो जिथे उभा असतो त्याला व्यासपिठ किंवा विचारपिठ असं म्हणतात.

विनोदातून मनुष्य जीवनातील अंधश्रद्धा, दैववाद, अनिष्ट रुढी, परंपरा ही आपल्या मानगुटीवर बसलेली भूतं उतरवीने शक्य आहे? हे अज्ञानानं पिचून गेलेल्या माणसाबरोबरच पदव्यांच्या भेंडोळ्यांची झूल घेवून मिरवणार्या प्रमाणित विद्वानासमोर आपल्या विनोदाने बिनतोड तर्क मांडून त्यांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचे सामर्थ्य ज्यांच्या विनोदात होतं. स्वत: निरक्षर असुनही सर्वांच्या मनातील अज्ञान काढून टाकून जगी ज्ञानदीप लावण्याचा निर्धार करणारे गाडगेबाबा किती उच्च दर्जाचे विनोद करत होते.अंगावर चिंध्या असणारे बाबा आपल्या वक्तृत्वाने सर्व श्रोतृवृंदाला खिळवून ठेवत, अरे मायबाप हो ज्यानं ही सृष्टी निर्माण केली. तो देव जर एक आहे तरं मग तुमच्या गावात किती देव हायेत.

लोकं एकेका देवाचं नावं सांगायचे. ती यादी दहाबारा देवाची व्हायची. एवढ्या देवानं तुमचं समाधान झालं नाही. म्हणून गावात पीर नसला तरी बाहेर गावी जाऊन नवस फेडता का नाही? ज्यांनं ही सृष्टी निर्माण केली. त्याले मटनाची लालूच दाखवता. देव काय तुमच्या साहेबाचा चपराशी वाटला कारे तुम्हाले? देवाले लालूच दाखवता. बरं मंग बोकडं देवाम्होरं सोडायचा की. पण त्याची खांडखुंड करुन त्याले पोटात टाकून ढेकरं देतं येता. येता का नाही? नवस केल्यावर लेकरु पुन्हा बिमारं पडते का नाही? त्याले डॉक्टराकडं घेवून जायलं पाहिजे पण तुम्ही त्या ढोंगी बाबाकडं घेवून जाता. अंगारे धुपारे करता. अरे, त्यो ढोंगीबाबा महिनामहिना आंघोळ करत नाही. त्याच्या डोस्क्यातून तरातरा ऊवा पळतात. अन् तुम्हाले त्याच्या अंगात देव कसा दिसतोय रे बाबा? त्याचा अंगात देवं येतो म्हणे? असा... इथं ढोंगी बाबासारखं ते घूमून दाखवतं. सारे श्रोते खळखळून हसत. नवसा सायसा लेकरं होती, तं मगं नवरा कायले करती? हा प्रश्न अगदी स्वच्छ अंतकरणानं मायमाऊल्यांना त्यांचं अज्ञान दूर करण्यासाठी विचारण्याचं धाडसं गाडगेबाबाच करु शकत होते. अशा विनोदाला आबालवृद्ध खळखळून हसत. त्या विनोदावर जेव्हा चर्चा व्हायची तेव्हा त्या पाठीमागचा विचारही लोकांना कळायचा.

एकदा तर गाडगेबाबा नाशिकला गोदावरीकाठी गेले. नैवद्य घेवून काही कर्मठ आपल्या स्वर्गातील पितरांना बोलावण्याचे पारंपारिक कार्य अगदी निष्ठेने करत होते. तीथे जाऊन बाबा म्हणाले, मले लय भूक लागली रे! तेवं निवद मलेच खाऊ दे. त्यावर ते सर्व उपस्थित कर्मठ तात्काळ भडकले, अरे आमचे पितरे स्वर्गातून येणारं आहेतं, जेवणं करायला आणि तू कशाला मधेच येवून टपकलासं. गाडगेबाबांनी बरीचं गयावया करुन उपयोग झाला नाही. त्यामुळे ते गोदावरीतीलं पाणी त्यांच्या दिशेने फेकू लागले आणि म्हणाले, माह्या वर्हाडातल्या जमिनीले पाणी देतो. या त्यांच्या उत्तरावर सर्व कर्मठ त्यांना हसायला लागले. वेडा कुठला, तुझे वर्हाड इथून किती दूर आहे रे, इथुनं पाणी कसे पोहचणार तुझ्या वर्हाडात? तुझे डोकेबिके फिरले की काय? गाडगेबाबांनी त्यावर एकच प्रश्न केला. तुमचा निवद खायाले स्वर्गातून तुमचा बा कसा काय खाली येतो रे? स्वर्गापेक्षा तं माहं वर्हाड लयं जवळं हाये ना बे लेकहो. या विनोदतून समोरच्या कर्मठांचे तोंड तर त्यांनी बंद केलेचं पण जो बिनतोड तर्क मांडला तो प्रस्थापितांना हादरा देणारा आणि परिवर्तनवाद्यांना दिशा देणारा ठरला.

गाडगेबाबाचा विनोद लोकांना खूष करणारा नव्हता. त्याचा उपयोग त्यांनी प्रबोधनासाठी केला. हे काम करतांना त्यांना प्रस्थापितांचा रोष पत्करावा लागला. प्रसंगी त्यांच्या जीवावरही बेतले. पण अज्ञान, अंधकार दूर करुन सर्वांना दिशा देण्यासाठी त्यांचा विनोद अखंड कार्यरत राहीला. प्रबोधन एक ईश्वरी कार्य समजून शेवटच्या श्वासापर्यंत समाजसेवेसाठी कार्यरत राहणार्या गाडगेबाबापासून आजचे विनोदवीर काय बोध घेतील? समाजमाध्यम आणि इतर धनदांडगे आयोजक आज विनोदवीरांना त्यांच्या कलेचा भरपूर मोबदला आणि प्रचंड प्रसिद्धी देतात, त्यापैकी काही विनोदवीर हे कार्य चांगल्या हेतूने करतात सुद्धा, पण दुर्दैवाने पैसा, प्रसिद्धी मिळायला सुरुवात झाल्यावर समाजभान सोडा. यांना स्वतःला जपणे तरी शक्य आहे का? हे असे का व्हावे? याला आमच्या जगण्यातील दिशाहिनता जबाबदार आहे?

# ग्रहसंकेत

**(रविवार, ८ सप्टेंबर ते शनिवार, १४ सप्टेंबर २०२४)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर,** ज्योतिष भास्कर

**ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)**

✻ **रविवार, रविवार, ८ सप्टेंबर-** ऋषि पंचमी, जैन संवत्सरी, श्री गजानन महाराज पुण्यतिथी शेगांव, साक्षरता दिन, कलावतीदेवी जयंती बेळगाव, गजानन रथोत्सव तासगाव, मच्छिंद्रनाथ जयंती ✻ **सोमवार, ९ सप्टेंबर-** बलराम जयंती, सूर्यषष्ठी, कार्तिकेय दर्शनाने पापनाश, संत बागडेबाबा पुण्यतिथी ✻ **मंगळवार, १० सप्टेंबर-** ज्येष्ठा गौरी आवाहन (रा. ८.०४ पर्यंत), मुक्ता भरण व्रत, स्वामी रामानंद सरस्वती पुण्यतिथी चिंचगाव टेकडी (कुर्डूवाडी) ✻ **बुधवार, ११ सप्टेंबर-** ज्येष्ठा गौरी पूजन, दुर्गाष्टमी ✻ **गुरुवार, १२ सप्टेंबर-** अदुःख नवमी, ज्येष्ठा गौरी विसर्जन (रात्री ९.५३ पर्यंत), दोरे घेणे, भागवत सप्ताहारंभ, श्री गणेश यात्रा रेठरे रेठरे बु।। ता. कराड ✻ **शुक्रवार, १३ सप्टेंबर-** उत्तरा रवि (वाहन हत्ती), रामकृष्ण परमहंस पुण्यतिथी, लक्ष्मणबुवा मोरजकर पुण्यतिथी आजरा, निसर्गदत्त महाराज महाराज पुण्यतिथी, ईश्वर भारती महाराज पुण्यतिथी बेलेश्वर (बीड) ✻ **शनिवार, १४ सप्टेंबर-** परिवर्तिनी एकादशी, हिंदी राजभाषा दिन.

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ८ (१६ पर्यंत), १०, १२ सप्टेंबर ✻ **डोहाळ जेवण-** १० सप्टेंबर (१० पर्यंत), १२ सप्टेंबर ✻ **बारसे-** ८ (१६ पर्यंत), १० सप्टेंबर ✻ **जावळ-** ८ सप्टेंबर ✻ **गृहप्रवेश-** १४ सप्टेंबर (१० पर्यंत)

### मेष :- यश मिळेल

इज्जत माणसांची नाही, संपत्तीची होत असते. पंचमातील बुधाचा पराक्रमातील मंगळाशी होणारा लाभयोग वैद्यकिय, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात असणार्यांना विशेष लाभप्रद ठरेल. मनात जे-जे चांगले आहे ते- ते साकारण्याचा प्रयत्न करा. श्री गणेश, श्री ज्येष्ठा गौरी कृपा करतील. सरकारी कामे मनासारखी होतील. कलेत प्रगती होईल. शुभ ता. १०, ११

### वृषभः- कला- गुणांचा गौरव

आपल्या छोट्याश्या आयुष्यात जगायचं असेल तर फुलांसाररख निर्मळ आणि सुंदर जगावं. सुखस्थ बुधाचा धनस्थ मंगळाशी होणारा लाभयोग यांत्रिक क्षेत्रात प्रगती करणारा आहे. मनातील योजना साकार करण्याचा प्रयत्न करा. कला- गुणांचा गौरव होईल. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. आत्मविश्वास वाढणार आहे. शिक्षणातून प्रगती होईल. शुभ ता. १०, १३

### मिथुनः- उत्साह, धडाडी वाढेल

जीवनात काही पसरवायचं असेल तर सुगंधासारखी प्रसन्नता पसरवावी. राशीस्वामी बुधाचा राशीतील मंगळाशी होणारा लाभयोग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. उत्साह, धडाडी वाढणार आहे. नव्या विचारांना चालना मिळेल. धार्मिक, सामाजिक कार्यात रमाल. भावंडाबाबत शुभ घटना घडतील. सुख स्वास्थ लाभेल. अडचणी कमी होतील. शुभ ता. १०, १२

### कर्कः- व्यवहार विचाराने करावेत

आपल्या सोबत दुसर्यांचही चांगल व्हावे, असे ज्या व्यक्तीला वाटतं त्या व्यक्तीला जीवनामध्ये काहीच कमी पडत नाही. धनस्थ बुधाचा व्ययातील मंगळाशी होणारा लाभयोग अनुकूल असला तरी सर्व व्यवहार विचाराने करावेत. सरकारी कामे होतील. ज्ञानदान, बॅंक, विमा क्षेत्रात अनुकूलता राहील. फार दगदग करू नका. जुने आजार त्रस्त करतील. शुभ ता. १०, ११

### सिंहः- चांगली वाटचाल

स्वतःवरती विश्वास ठेवा. मग एक दिवस असा येईल की, घड्याळ दुसर्यांचे असेल पण वेळ आपली असेल राशीतच रवि-बुध असल्याने चांगली असेल पण वेळ आपली असेल. राशीतच रवि-बुध असल्याने चांगली वाटचाल करू शकाल. नव्या कामांना गती मिळेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. नव्या संधींचे स्वागत करावे. संघर्षातून प्रगती होत जाईल. शुभ कार्यास थोडा विलंब लागेल. शुभ ता. १०, १३

### कन्याः- वादाचे प्रसंग टाळावेत

माणसाचा सर्वात चांगला सहकारी त्याची प्रकृती आहे. प्रकृतीकडे लक्ष द्या. कर्मस्थ मगळाचा बुधाशी लाभयोग होत आहे. व्यवसायातील निर्णय नुकसानकारक होणार नाहीत याची दक्षता घ्या. धार्मिक कार्यात मन रमवावे. संसाराचाच सतत विचार करू नका. नाही तर अस्वास्थ, चिंता राहिल. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. १०, ११

### तुलाः- प्रतिकुलतेवरमात

भारतात आपण दहा किलो मिटर गाडी विना शिव्या देत चालवत असाल तर आपण स्वतःला निश्चित संत समजा. बुध-मंगळाचा लाभयोग विशेष शुभ फलदायी ठरेल. सरकार दरबारची कामे होतील. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात विशेष अनुकूलता राहिल. सर्व प्रतिकुलतेवर मात कराल. जुने येणे पाठपुराव्यातून वसूल होईल. शुभ ता. ८, १०

### वृश्चिकः- नव्या विचारांना चालना

चूक करणे प्रकृति तर चूक सुधारणे संस्कृति असते. कर्मस्थ बुधाचा मंगळाशी होणारा लाभयोग कार्यक्षेत्रात चांगली फले देणारा आहे. योजलेली कामे विनासायास यशस्वी होतील. कला-गुणांना चांगल्या संधी लाभतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अर्थिक स्थितीत सुधारणा होईल. पोटाच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. प्रकृती सांभाळा. शुभ ता. १०, १२

### धनुः- विशेष प्रगती

काही निर्णय इतरांना विचित्र वाटू शकतात. पण आपल्या आयुष्याला स्थिरता मिळवून देतात. सप्तमातील मंगळाचा भाग्यातील बुधाशी होणारा लाभयोग विशेष प्रगती करणारा आहे. नव्या कामांना गती मिळेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. स्थावर संबंधातील वाद टाळावेत. विचाराने रहावे. कला- गुणांना चांगल्या संधी लाभतील. शुभ ता. ८, १०, १२

### मकरः- अपेक्षित संधी लाभतील

सूर्य आणि वडिल या दोघांची गर्मी सहन करायला शिकावे. ते मावळले तर अंधारच पसरतो. बुध- मंगळाचा लाभयोग प्रगती करणारा आहे. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान वाटेल. हितशत्रूंच्या कारवाया हाणून पाडाल. अडचणीतून वेळीच मार्ग निघत जाईल. गृहनिर्माण, विधी क्षेत्रात अनूकूलता वाढेल. शुभ ता. १०

### कुंभः- फार आसक्ती, फार अनासक्ती नको

पैशाने सर्वकाही विकत मिळेल. पण, आईसारखा स्वर्ग व वडिलांसारखी सावली कुठेच मिळणार नाही. राशी स्वामी शनि राशीतच आहे. त्यामुळे मनात फार आसक्ती व फार अनासक्तीही ठेवू नका. चिकाटीने व विचाराने उचललेली पाऊले निश्चितच लाभदायक ठरतील. नव्या संधी लाभतील. नव्या कामांना गती मिळेल. नव्या ओळखी वाढतील. शुभ ता. १०, १३

### मीनः- दडपण ठेवू नका

माणसाने कधीही तयारीतच राहावे कारण वातावरण व माणसं कधी बदलतील हे सांगताच येत नाही. सुखस्थ मंगळाचा बुधाशी होणारा लाभयोग नवीन स्थावर व्यवहार यशस्वी करणार आहे. उपजत कला- गुणांचा विकास होत जाईल. विचाराने रहावे. मनावर कोणतेही दडपण ठेवू नका. अपेक्षीत प्रगती साधता येईल. नव्या ओळखी पारखून स्वीकारा. शुभ ता. १०, १२, १३

!! शुभ भवतु !!

---


**साधता संवाद**

**प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी** (वतनी)

भ्र. ९४०३०२९१७८

# नदीमाय

दुपार टळून गेली तरी तो नदीच्या कोरड्या पात्रात आवंढे गिळत अस्वस्थपणे उभा होता. वेड्यासारखा मुठीत वाळू गच्च धरून सोडत होता. पुन्हा मुठीत वाळू घ्यायचा पुन्हा सोडायचा. तो काय शोधत होता ते त्याचे त्यालाच उमजत नव्हते पण त्याचा शोध मात्र चालूच होता. खुरट्या झुडपाच्या सावल्या आता पूर्वेकडे हळूहळू लांबत चालल्या होत्या. तसा तो भग्नावस्थेत निपचित पडलेल्या ओसाड खडकावर विसावला.



मावळतीकडे तोंड करून त्यानं पद्मासन घातलं. मावळतीची व्याकुळ किरणे त्याच्या अंगावरून अलगद ओसरली आणि उदास संध्या छाया आपलं जीर्ण पांघरूण घेऊन त्याला लपेटून घेत अवतरली. गायत्री मंत्र पुटपुटत तो शांतपणे ध्यानस्थ होऊ पाहत होता. जवळ ना कलश, ना संध्यापात्र, ना संध्यापळी, ना पाणी तरी साधनेची तळमळ त्याच्या अंतरात दाटली होती. कधीकाळी याच नदीपात्रात छाती एवढ्या वाहत्या पाण्यात उभे राहून उगवतीच्या आणि मावळतीच्या सूर्याला कितीतरी आर्ध्य दिली होती. पण आज... सगळंच कसं बदललं होतं. सगळं... सगळं चित्रच विचित्र झालं होतं.

संध्या छायेचं रूप बदललं आता ती रजनी झाली आणि रजनीची काळरात्र झाली. रातकिड्यांच्या किरकिर्यांनी याच्या समधीचा भंग करण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू केला, दीवाभितांचा नंगानाच सुरू झाला पण याची साधना बळकट होती. त्याचा अंतरी आत्मसंवाद चालूच होता. त्या काळरात्रीचं भयान रूपही त्याला क्षणभरही विचलित करू शकलं नव्हतं. ध्यानमग्न अवस्थेत तो स्वतःशीच संवाद साधत होता, 'आपुलाचि वाद आपणाशी' घालत होता. आणि त्याच्या लोचनातून सारख्या धारा वाहू लागल्या. त्या आनंदाच्या होत्या की दुःखाच्या? काहीच अंदाज लावता येत नव्हता पण त्या धारेला खंड पडत नव्हता एवढं मात्र निश्चित.

रात्रीच्या गर्भात टक...टक...असा आवाज त्याच्या काळजात उमटु लागला. ती त्याच्या हृदयाची स्पंदनं तर नव्हती ना? की...? नेमकं काय होतं ते? आता ती टकटक त्याच्या जवळ जवळ येत असल्यची जणवली. तेव्हा हृदयाची स्पंदनं आणि टकटक एकरूप झाली त्यांच्यात एकप्रकारचं अद्भूत असं अद्वैत साधल्या गेलं. जवळच कुणीतरी काठी आडवी ठेवल्याची चाहूल त्याला लागली आणि ती टकटक स्पंदनात विलीन झाली, तसं कुणी तरी आपल्या जवळ बसल्याची जाणिव त्याला झाली. त्याची समाधी भंग करण्याचा कुणाचा प्रयत्न होता का तो? नाही ना? मग...मग हे काय चाललंय? कुणीतरी त्याच्या समाधीत विलीन होऊ पहातय का...? नेमकं काय? एवढ्यात...एवढ्यात थरथरणारा हात त्याच्या गालावरून फिरू लागला, डोळ्यातल्या धारा पुसू लागला, मायेनं पाठीवर हात फिरत रहिला तसं याला अधिकच गहिवरून आलं. त्याने हळूच डोळे उघडले तर समोर असंख्य सुरकुत्यांचं जाळं पांघरूण, हाड काताडं एक झालेलं, डोक्यावर पांढरे शुभ्र पिंजारलेले केस, तोंडाचं बोळकं झालेलं, पार खोबणीत गेलेले पण अपार करूणेने ओथंबलेले डोळे आणि शुभ्र वस्त्र परिधान केलेली एक जख्ख म्हातारी तरीपण तेजस्वी आणि सात्विकतेची किनार तिच्या व्यक्तिमत्वाला होती. तिच्या स्पर्षात युगानुयुगांचा स्नेह त्याला जाणवला, किती तरी जन्मापासून आसुसलेल्या मायेचा ओलावा त्या स्पर्षात त्याला जाणवला. आता त्याच्या चेहऱ्यावर एक हलकीशी स्मितरेषा उमटली. तो हळूच उठला आणि अतिशय नम्रतेने त्या म्हातारीच्या चरणाला स्पर्ष केला. हात जोडून त्यानं विचारलं, माय तू कोण आहेस? आपल्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरचं कौतुकाचं हास्य तिला लपवता आलं नाही. माय म्हणतोस आणि ओळख विचारतोस होय रे लब्बाडा? असं म्हणत तिने त्याचा गालगुच्चाच घेतला. तसा तो आजूनच गहिवरला. तिनं त्याचा हात धरून आपल्या जवळ बसवलं आणि म्हणाली, मी...नदीमाय आहे.

तुझी वाकी नदीमाय तो आश्चर्याने अवाक् झाला आणि म्हणाला, काय वाकी नदीमाय...माझी वाकी नदीमाय? असं म्हणत त्यानं तिला कडकडून मिठी मारली. किती तरी वेळ तो तसाच तिच्या मिठीत विसावला होता. थरथरत्या हाताने पाठीवर थोपटत त्याला शांत करत म्हणाली, वेड्या एवढा मोठा झालास पण आहे तसाच आहेस वेडा ग्याना कुठला की चल उठ. काय वेडा ग्याना? कोण म्हणत होतं बरं मला असं? हां आठवलं माझी जन्मदात्री भामामाय मला कधी कधी कौतुकानं वेडा ग्याना म्हणायची. त्याला सारं आठवलं आणि त्यानं तिच्या मांडीवर डोकं ठेवलं. तेव्हा आकाशात असंख्य चांदण्या लुकलुकत होत्या आणि चंद्राची बारीकसी कोर हे सगळं पाहात होती. आणि दोघात संवाद सुरू झाला. तो म्हणाला, माय तू एवढी कशी जर्जर जख्ख म्हातारी झालीस? अगं तुझ्या पाणेरी पदरात मी किती तरी वेळा मनसोक्त डुंबलोय. तुझ्या लाटांनी मला किती तरी वेळा बुडवून माझी भिती घालवली माझी, तुझ्या तीरावर बहरलेल्या कैऱ्या, चिंचा खाल्लूयात, झाडा झुडपातली मोहळ झाडून मधाची गोडी कितीदा तरी चाखलीय. आणि आज तुझं रूप हे असं? अगं नदीमाय तू तर चिरतरूण आहेस ना? मग आज...तू ही अशी? खरं सांग नदीमाय खरं सांग तू अशी कशी झालीस? अरे, थांब थांब किती प्रश्नांचा भडीमार करतोस असा?

त्याला थांबवत नदीमाय म्हणाली, काय सांगू लेकरा तुला ते माझं वैभव? साऱ्या गावचीच मी लाडकी वाकी नदीमाय होते. सगळी माझी लेकरं मला रोज कडकडून भेटायची आपली सुख दुःख सागायची. सगळं कसं आबादानी आणि आनंदी आनंद होता. माझी सगळी लेकरं आनंदी पाहिली की, मलाही मुठभर मास यायचं आणि मी अधिकच खळाळायची. पण कुण्या पाप्याची नजर लागली कुणास ठाऊक? दिवस फिरले तसा माणूसही बदलला. माणसातली माणूसकी संपून जीवघेण्या स्वार्थाने तिच्यावर आधीराज्य गाजवायला सुरूवात झाली, माझ्या काळजात भले मोठाले लोखंडी गज आणि सिमेंटचे लगदे घालून मला जागोजागी आडवु लागले. जीवघेणी यंत्र माझी रात्रंदिवस चिरफाड करू लागले.दिवसेंदिवस या माणसांचा अगोचरपणा वाढतच गेला आणि माझ्या तीरावर कित्येक पिढ्यांची साक्ष देणारी डेरेदार झाडांची कत्तल सुरू झाली. पाहता पाहता सगळंच कसं उजाड झालं. माझ्या उघड्या डोळ्यांना ते पहावत नव्हतं पण काय करू...?

हे सगळं मी सहन केलं रे लेकरा पण... पण...ती अधिकच गहिवरली मी तिच्या पाठीवरून हात फिरवत म्हणालो, पण...काय? बोल नदीमाय बोल आज मोकळी हो. तशी आवंढा गिळून ती पुढे म्हणाली, लेकरा मी सगळं सहन केलं असतं रे पण या नराधमांनी माझा प्रवाहच बंद केला आणि मला गंगेला भेटताच येत नाही. त्यामुळे माझा प्राणसखा सागराचीही भेट होत नाही. अरे तुच सांग हे वैधव्य कसं सोसु मी? घरातली लेकरं कितीही श्रीमंत झाली, मोठी झाली, सुखी झाली तरी माय त्यांच्या सुखातच आपलं सुख मानतेच रे पण... पण तिच्या काळजात वैधव्याची ही जखम ठसठसत असतेच ना? हे मायचं ठसठसणारं दुःख कधीच समजू नये यापेक्षा मोठी कोणती शिक्षा असते रे माझ्या लेकरा सांगना? यावर तो तरी काय उत्तर देणार होता? दोघेही सुन्न होऊन निशब्द झाले.

थोड्यावेळाने नदीमायच म्हणाली, एवढ्या दिवसानंतर भेटलो आपण आणि मी हे काय माझच रडगाणं गात बसले. तुझं कसं काय चाललय लेकरा? त्याने तिचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले आणि गुडघ्यावर टेकून म्हणला, काय सांगू माय तुला? पोटाची खळगी भरण्यासाठी शिकलो सवरलो आणि दूर क्षितिजातल्या शहरात गेलो. सगळं कसं छान सगळं कसं छान चालय माय. आणि त्याचा हुंदका दाटला. ती म्हणाली, अरे सगळं छान चाललय म्हणतोस मग असा व्याकुळ का होतोस बाळा? तसं तिच्या मांडीवर डोकं ठेवून तो म्हणाला, माय तुला सोडून शहरात गेलो त्याक्षणीच मी अनाथ झालो गं. अनाथाचं जगणं किती किती जीवघेणं असतं हे शब्दात नाही सांगता येत मला. पण एवढं मात्र खरं आहे की, आता हे जगणं असहाय्य होतय मला म्हणून तुझ्या कुशीत आलो होतो. देशीलना विसावा? तेव्हा ती म्हणाली, पुन्हा तेच, अरे माय म्हणतोस आणि विसाव्याची परवानगी मागतोस? माझा वेडा ग्याना म्हणत म्हतारीनं त्याला कुशीत घेतलं आणि त्याच्या जन्मोजन्मीच्या अनाथपणाचा निचरा होत होता. नदीमायचा पान्हा पाझरू लागला आणि डोळ्यातील मायेचे मोती बिंदूज्ञत्याच्या मस्तकावर ओघळत होते. वैधव्य आणि अनाथपण एकमेकांच्या व्यथांचा मौन संवाद करत होते. नदीमायनं हळूच त्याला उठवलं थरथरत्या हाताने त्याचे दोन्ही गाल आपल्या हातात घेतले आणि त्याच्या मसतकाचे व दोन्ही गालांचे किती तरी मुके घेतले. त्याच्या तोंडावरून आणि सर्वांगावरून हात फिरवत म्हणाली, लेकरा, तुला माऊलींच्या ओटीत टाकलयना? मग तू अनाथ कसा रे वेड्या? तुला आता माऊलींचा आणि तुकोबांचा आश्रय लाभलाय. तू यापुढे कधीही स्वतःला अनाथ किंवा पोरकं समजायचं नाही. आणि मी आहेच ना सदैव तुझ्या पाठीशी इंद्रायणी चंद्रभागेच्या रूपात. यावर ती खिन्नपणे हासली आणि म्हणाली, माझं सोड लेकरा, माझ्या उरात ह्या निष्ठूर माणसानं कितीही लोखंडी गज घातले आणि सिमेंटचे लगदे भरले तरी मी या धरणी मातेत झिरपत राहिन आणि घरा-दारापर्यंत माझ्या लेकरांना पोसण्यासाठी जाईन आणि कधी तरी कोणत्याना कोणत्या रूपात गंगा मातेला भेटेन. माझी काळजी सोड. तुझी लेखणी अभंगवाणी बोलतेय तिला बोलू दे, तिला जीवापाड जप, तिची मुस्कटदाबी करू नकोस. तिच्या कुशीत मोकळा होत जा. तो अत्यंत भावूक होऊन नम्रपणे म्हणाला, इंद्रायणी माय आणि चंद्रभागा मालयला स्मरून सांगतो की, हे वाकी नदीमाय माऊली-तुकोबांच्याच कृपेने हे शब्दधनाचं दान माझ्या झोळीत पडलय. कारण माझ्या झोळीला माझी जन्मदात्री भामामाय आणि तुझी सात्विकता, पवित्रता आणि निषकामतेची किनार आहे. शेवटच्या श्वासापर्यंत या प्रसादिक शब्दधनाचं पाविव्य मी जतन करीन. त्याच्यशी कधीच प्रतारणा करणार नाही. शांतपणे तो उठला मंद मंद पावलं टाकत नदीच्या कोरड्या पात्रात गेला आणि गडबडा लोळु लागला. पुन्हा तीच व्याकुळता त्याच्या डोळ्यात दाटून आली, हातात मुठभर वाळू घेऊन मनाशीच म्हणाला की, शब्द जिथे रेंगाळले तिथेच माझे बालपण होते । नदीतल्या वाळुमध्ये खूप काही दडले होते।।

आज त्याला दिव्यत्वाची प्रचिती आली होती. माऊली-तुकोबाला त्याने मनोभावे साष्टांग नमस्कार केला आणि त्याच्यातला सात्विक भाव पुन्हा आर्ततेने सांगु लागला की, शब्द सरले गीत सरले भावनांचा कल्लोळ झाला ।। आता कुठे आयुष्याचा अर्थ इथे मला कळला ।।

खरच आयुष्याचा अर्थ एवढ्या सहजासहजी कळतच नाही. मुठभर वाळू काळजात साठवून तो जड अंतःकरणाने तो मौनाची चादर लपेटून परतीच्या प्रवासाला लागला.

राम कृष्ण हरि

---

पान २ वरून

## कल्पवृक्ष- नारळ

**वायुविकारावर उपयोगीः-**

ओल्या नारळाचे दूध काढून ते आटवावे म्हणजे तेल वर येते. हे तेल उत्तमप्रकारे वायुदाहक आहे. ह्या तेलात मिरपूड घालून हाता-पायास, अंगास चोळावे वायुचा नाश दूर होतो. अनेकांना बिब्बा उठतो. बिब्बा उतरल्यावर खोबरे उगाळून किंवा जाळून त्या जागी लावावे. त्रास दूर होतो. मूत्रकृच्छ म्हणजे लघवीस वरचेवर जावे लागणे, लघवी करताना जळजळ होणे यावर शहाळ्याच्या पाण्यात वेलदोडे व गोखरूचे चूर्ण मिसळून दिवसातून दोन वेळा घेत जावे. विकार दूर होतो. खोबरे नित्यनियमाने रोज चावून खात जावे. ते पौष्टिक आहे. प्रसुतीनंतर बाळाच्या आईस खोबरे (सुकलेले) लसूण, मिरे, सैंधव यांचे समवेत देत जावे. त्यामुळे वात होण्याची शक्यता रहात नाही. अंगास मुंग्या येणे, अंग जड होणे आदी विकार दूर होतात. लहान मुलात कृमी होण्याची प्रवृत्ती असते. अशा मुलांना रोज नारळाचे पाणी द्यावे. कृमी दूर होतात. करवंटी तेलाचा उपयोग जसा खरुज, गजकर्णावर होतो तसेच करवंटी उगाळून त्यात मध घालून वयोमानाप्रमाणे खावे, त्यामुळे भूक चांगली लागते. अग्निमांद्य दूर होतो.

**दंतमंजनः-** नारळाच्या करवंटीच्या राखेत सैंध व कापूर घालून दात घासावेत. त्यामुळे दात स्वच्छ व बळकट होतात. उंदीर चावल्यास खवंट 'खोबरे मुळ्याच्या पाल्याच्या रसात उगाळून लेप करावा. उंदराच्या विषाचा त्रास होत नाही. नारळाचे फूल रक्त पडणे, कृमिनाशक आहे. तसेच आम्लपित्त, रक्तप्रमेह, हृदयरोग, शूट आदिवरही नाराळाचे औषधी उपयोग आहेत.

## सिनेमा हाच श्वास, राज कपूर

विनोबा भावे प्रणीत डाकूंच्या आत्मसमर्पण संकल्पनेचा धांडोळा घेणारी चित्रकथा म्हणजे 'जिस देश मे गंगा बहती है'! चंबळच्या दस्यूभूमीचे प्रत्ययकारी चित्रीकरण, डाकूंच्या मनोवृत्तीचा व जीवनशैलीचा अचूक अदमास ही 'जिस देश मे गंगा बहती है' या चित्रपटाची सहज लक्षात येणारी वैशिष्ट्ये. अर्थात् काही अनालकलनीय कारणासाठी दिग्दर्शक म्हणून राधू कर्माकर यांचे नाव आहे. पण चित्रपटावर केवळ आणि केवळ राज कपूर यांचाच ठसा आहे. याच दरम्यान (१९४८ ते १९६३) राज कपूर यांची अभिनेता म्हणून कारकीर्द बहरात होती. त्यांचे अभिनय सामर्थ्य दाखवणारा पहिला चित्रपट होता तो महेश कौल दिग्दर्शित 'गोपीनाथ' हा नव-वास्तववादी चित्रपट. १९४० च्या दशकातील महत्त्वपूर्ण व प्रेमाच्या त्रिकोणाचा पायंडा पाडणारा 'अंदाज' (दिलीपकुमार समवेत) राज कपूरच्या सहज अभिनयासाठी ओळखला जातो. आह, चोरी चोरी, शारदा, परवरिश व अनाडी या रसिकप्रिय व लोकप्रिय चित्रपटातील राज कपूर म्हणजे आपल्या प्रतिमाबाह्य अभिनयाचा आविष्कार..! पण, त्यांचा सर्वोत्तम अभिनय-आविष्कार रसिकांसमक्ष आला तो 'जागते रहो' या चित्रपटात. आपल्या गुलछबू व्यक्तिमत्त्वाशी एकदम विसंगत एका खेडवळ इसमाची भूमिका राज कपूरने फार तन्मयतेने वठवली होती. १९६० च्या दशकात राज कपूर हा व्यक्तीपासून संस्थान अतिशय झपाट्याने झाला. (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत)

---

पान ४ वरून

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**जीबॉन जॉखॉन शुकाये जाय, कोरुणाधाराय एशो।। शकल माधुरी लुकाये जाय गीतोसुधारशे एशोजीवन जेव्हा सुकुनी जाते, करुणाधारा होऊनि ये सकल माधुरी लोपुनि जाता, गीत सुधारस होऊनि ये। कर्माचे आकार होऊनि मत्त झाकिती सर्व दिशा हृदयप्रांती जीवननाथा, शान्त पाउले टाकित ये।।**

आपण 'जे न देखे रवी, ते देखे कवी' असं म्हणतो. पण रवींद्रनाथांच्या बाबतीत तर अक्षरशः पाहणाराही 'रवी' आणि लिहिणाराही रवी होता. त्यामुळे त्यांच्याबाबतीत बोलताना 'जे जे पाही रवी, ते ते लिही त्यांच्यातील कवी. 'हा रवी स्वयंप्रकाशित होता. त्याच्या प्रकाशात त्याची कविता उजळून निघाली आहे. त्यांच्या भक्तिगीतात ते आपल्याला धार्मिक वाटतात. ते धार्मिक होतेच पण कर्मकांडांचं अवडंबर पाळणारे नव्हते. त्यापासून त्यांची कविता मुक्त होती. त्यांची कविता कुठल्याही जातिबंधनात, धर्मबंधनात किंवा रुढीबंधनात अडकली नाही. त्यामुळे त्यांच्या कवितेवर अमुक एक अशा प्रकारची कविता असा कुठलाही शिक्का मारता येत नाही. हे त्यांच्या कवीतेचं वैशिष्ट्य आहे. आयुष्याच्या विविध टप्प्यांवर त्यांना ज्या-ज्या अनुभवांनी समृद्ध केलं, ते भाव, ते अनुभव त्यांच्या कवितांतून प्रकटले. त्यांच्या कवितेत त्याप्रमाणे बदल होत गेले. कविता फुलत गेली, खुलत गेली, परिपक्व होत गेली. 'गीतांजली' काव्यसंग्रहातील त्यांची 'चित्त जेथे हो भयशून्य' ही अशीच एक प्रसिद्ध कविता आहे. अतिशय सुंदर अशी ही कविता. त्यात ते म्हणतात- चित्त जेथे असेल भयशून्य आणि मस्तक असेल उन्नत ज्ञान, असेल मुक्त किरकोळ सीमांच्या भिंतीत चिणून, जग नसेल झालेले विदीर्ण खंडित...शब्द उमटतील सत्याच्या घनगर्भातून अन् पूर्णत्वास पोहोचण्यासाठी अथक श्रमांचे बाहू यत्नात राहतील सतत. विवेकाचा निवळशंख निर्झर नाही, जाणार हरवून, प्राण हरपलेल्या सवयींच्या ओसाड खडतर वाळवंटात. तूच नेशील पुढेपुढे बुद्धीला... उदारसंतत विचार आणि कृतीच्या मार्गावर. हे पित्या, जाग येवो, माझ्या देशाला... स्वातंत्र्याच्या त्या स्वर्गात. या कवितेत त्यांनी त्यावेळी जी अपेक्षा व्यक्त केली आहे, ती आजच्या परिस्थितीला देखील लागू पडते. किंबहुना दिवसेंदिवस अधिकच अशा गोष्टींची गरज आहे. 'भयशून्य चित्त, उन्नत मस्तक' या सारख्या गोष्टी शिक्षणातून निर्माण व्हायला हव्यात. खरंच त्या तशा होतात का? अब्राहम लिंकनने 'हेडमास्तरांस पत्र' यात ज्या अपेक्षा त्या व्यक्त केल्या आहेत, त्यांच्याच जवळ जाणारी ही कविता आहे. (क्रमशः)

---

## बालपण


अजुनी प्रार्थितो मी देवा प्रतिदिन
द्यावे मजला पुन्हा ते बालपण
।।धृ।। ते निष्पाप निरागस मन
अवखळ झऱ्यापरी ते जीवन ना
चिंता ना कसले दडपण द्यावे मजला
पुन्हा ते बालपण ।।धृ।। सकाळी
उठूनी चिंता फक्त
शाळेची पाठीवरच्या दप्तरी ओझ्याची
घरी खेळण्या मुक्त असे अंगण
द्यावे मजला पुन्हा ते बालपण
।।धृ।। मित्रांसवे रोज खेळलो कधी
गहीवरलो कधी धुसफुसलो कधी
न शिवले मनास मी तू पण द्यावे
मजला पुन्हा ते बालपण ।।धृ।।
थेंब पावसाचे अंगी झेलावे मायेच्या
पदराने अंग टिपावे कधी न भासे
कोणती अडचण द्यावे मजला पुन्हा
ते बालपण ।।धृ।। निजण्यापूर्वी
नित्य जागलो आजीच्या गोष्टीत
रंगलो त्या कथांमधुनी सुसंस्कार
शिकवण द्यावे मजला पुन्हा ते
बालपण ।।धृ।। आता न कळे कसे
ते दीन सरले मोठेपणी जग पुरते
कळले मोठेपणात या यातना कठीण
द्यावे मजला पुन्हा ते बालपण द्यावे
मजला पुन्हा ते बालपण ।।धृ।।

**प्रशांत राजहंस हनवाडीकर**

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# नात्यांमधील जवळीक, नात्यांमधील दुरावे

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २३२



१९८८ साली जवळीकीची संकल्पना मांडणाऱ्या जॉन बोवलबी यांनी मानसशास्त्रज्ञाला आईची उपमा देत विधान केले होते की बाळाला जशी आई सतत प्रतिसाद देते, संवेदनशील राहून सांभाळते, जगाच्या पटलाशी ओळख करून घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या बाळाला सुरक्षा कवच बहाल करते आणि आवश्यक तिथे विनाविलंब, विनाअट सहारा देते तसे मनोविकासतज्ञाचे काम असते. यामुळेच बाल्याची जोड नात्यांमधून प्रवाहित होत प्रगल्भावस्थेत होते मग साहचर्याची क्षमता विकसित होत जाते, स्वायत्तता सांभाळण्याची कुवत लाभते आणि काहीही गमावण्याचे भय उणावते.

जवळीक कायम ठाम नात्यांच्या शोधात असते. स्वतःला मानव असे जर मानायचे असेल तर स्वास्थ्याच्या अनेक पैलूंना नाते कसे स्पर्श करते हे अनुभवणे अपरिहार्य ठरते. प्रौढत्व आणि शैशव यांचे प्रत्येकी चार टप्पे एकमेकांशी कसे जोडलेले असतात या विषयावर २०१४ साली लेवी आणि ओरलँस यांनी संशोधन केले. त्यांमध्ये अभ्यासाचे चार पैलू उजागर होतात -

(१) भावनिक आणि लैंगिक जवळीक हाताळणे
(२) सुसंवाद- बोलणे आणि श्रवण
(३) मतभेदांशी जुळवून घेणे
(४) नात्यांची आंतरिक जवळीक अपेक्षांना कशी जन्म देते.

लेवी यांनी आत्मीयता/ आपलेपणा, अवलंबन/ टाळाटाळ आणि चिंताग्रस्तता या तीन स्तंभांच्या आधारे माणसांमधील नाती आणि त्यांच्यामधील जवळीक यांचे चार गट सुचविले-

**(१) सुरक्षित संबंध-** किमान टाळाटाळ, किमान चिंताग्रस्तता

इथे नाकारले जाण्याचे भय नाही किंवा जवळपणाचे गुदमरून टाकणारे प्रदर्शनही नाही. सगळं आहे तसं स्वीकारणे. नातं जुळलं तरी ठीक, नातं तुटलं तरी हरकत नाही.

**नात्यांवरील परिणाम-**

* भावनिक सान्निध्याच्या आनंदात समाधान मिळते.
* परस्परावलंबन महत्वाचे असते.
* आवश्यक तेव्हा उपलब्ध. (मैं हूँ ना)
* व्यक्तिगत अवकाशाचा सन्मान
* मतभेदांचा सन्मानपूर्वक स्वीकार
* नात्यांमधील ताणतणावांचे अतिरिक्त ओझे नाही
* मंद, उबदार नातेसंबंध

(२) टाळाटाळ/उडवा उडवी -कमाल टाळाटाळ, किमान चिंता

जवळीक अस्वस्थ आणि त्रासदायक वाटणे, स्वातंत्र्य हवेहवेसे वाटणे आणि स्वत्व जपणे याच्यापुढे समोरच्या व्यक्तीची उपलब्धता तितकीशी महत्वाची नसते असं मानून हा गट कार्यरत असतो. म्हणून की काय इतरांवर विश्वास ठेवणे अवघड जाणे आणि शक्यतो एकला चलो रे वाट चोखाळणे अशी या गटाची मानसिकता असते.

**नात्यांवरील परिणाम-**

* अधिक सान्निध्याची ओढ
* भिन्नत्व जपण्याकडे कल
* अवलंबन आवडत नाही.
* भावनांबद्दल बोलण्यास अनुत्सुक
* स्वायत्त
* अडचणीच्या प्रसंगी निसर्गतः पुढाकार पण भावनाविहीन

(३) **ताण** - किमान टाळाटाळ आणि कमाल चिंता

इथे मानवांना उत्कटतेने जवळीक हवी असते पण त्याचवेळी नात्यांमधील असुरक्षितता वाढीला लागलेली असते. म्हणून जोडीदाराची सलगी लाभत नाही याची काळजी जशी वाटते, तद्वत जवळीकीची हाव माणसांना भीतीदायक/धडकी भरविणारी वाटू शकतो.

**नात्यांवरील परिणाम-**

* असुरक्षिततेची भावना, नात्यांमध्ये जखडलेपणाची जाणीव
* हात सुटण्याची भीती
* जुने हिशेब मनात सदैव रेंगाळणे
* भावनाप्रधान, विवादात रस, नियमनाकडे कल
* दोषारोपाची आवड, स्वतः मात्र अलिप्त
* पाल्यांना वाढविण्यात सातत्याचा अभाव

(४) उत्सुकता अधिक टाळाटाळ - दोन्हींचे प्रमाण कमाल

हा टप्पा साधारणपणे आढळत नाही. इथे नातं /प्रेम टिकणार नाही या भयापोटी, सर्व प्रकारच्या जवळीकीबद्दल अस्वस्थता निर्माण होते. मागे उरतात भीती, जखमा यांच्याच खुणा. याची परिणीती होते विश्वास टाळण्याकडे आणि अवलंबून राहण्याची प्रवृत्ती नाकारण्यामध्ये !

**नात्यांवरील परिणाम-**

* भावना हाताळण्यात अयशस्वी, भावनिक सान्निध्य सहन होत नाही.
* नाती तुटण्यापर्यंत ताणण्याची प्रवृत्ती
* समवेदना
* समाजाच्या कक्षेबाहेरील वर्तन
* पाल्याच्या वाढीमध्ये सहभाग नसणे, अव्यवस्थित गुंतवणूक

वरील प्रत्येक शैलीचा अपरिहार्य परिणाम आपल्या वर्तनावर, आकलनावर आणि सामाजिक पैलूंवर होत असतो आणि त्याचे पर्यायवसान जवळिकीमधील जोडीदारावर होत असते. वरील विवेचनावरून असा निष्कर्ष काढता येईल की चिंताग्रस्त प्रौढ सामान्यतः सातत्याचा अभाव असलेल्या पालकांच्या पोटी जन्मास आलेले असतात. टाळाटाळ करणारे प्रौढ साधारणतः अंतर राखणाऱ्या आणि नाकारणाऱ्या पालकांच्या पोटी आलेले असतात. अंतिमतः शारीर जनुकांच्या रचनेवरून जवळीकीचे कंगोरे स्पष्ट होतात. जवळीकीची शैली ठरते ती बालक-पालक पैलूंवर आणि त्याचा नात्यांवर परिणाम होतो. मारोन यांनी २०१४ साली असे विधान केले की आपण जन्मल्या क्षणापासून ते मृत्यूपर्यंत सतत परस्परांच्या आकृतिबंधात अडकलेले असतो. बालवयात हे बंध घट्ट आणि जवळीकीचे असतात. या नात्यांच्या गुणवत्तेवर आपली मानसिक जडणघडण होत असते जी उत्तरायुष्याचा पाया असते.

**नात्यांचा स्ट्रेस**

नाती जशी हवीहवीशी असतात तशीच त्रासदायकही ! निसर्गदत्त आणि बनविलेली ! जुळलेली आणि लादलेली ! निरपेक्ष आणि अपेक्षांचे ओझं असलेली ! एकतर्फी आणि दोन्ही बाजूंनी पेललेली !

प्रेम, वात्सल्य, माया, आदर, भीती, करुणा, अहंकार, राग, द्वेष आणि अशा अनेक भावनांनी निथळणारी!! चोवीस तास आसपास - पिच्छा न सोडणारी. मग कधीतरी त्यांचा अनामिक स्ट्रेस वाटू लागतो. ती झुगारून द्यावीशी वाटतात. विशेषतः नात्यातील व्यक्तींच्या वागण्याचे संदर्भ लागेनासे झाले की निर्नात्याची ओढ लागते.

स्वच्छ, मोकळ्या नातेविरहित अवकाशाचे आकर्षण वाटू लागते. काही नाती विसर्जित करावी असे वाटते. किती नाती,किती काळ आपण घेऊन फिरत असतो- त्यातील काही बिनकामाची ,उपयुक्तता सरलेली , आ-झी म्हणून उरलेली ! बहुतांशी वेळी फक्त आठवणीत उरलेली! मग जाताना सगळं विसर्जित करून मोकळ्या हातांनी /निर्विकार मनाने गेलेले काय वाईट? असे विचार मनात येतात.

**यात बदल संभवतो कां ?**

बोवलबी यांच्या मते प्रौढपणी जवळीकीच्या शैली बदलणे अवघड असले तरीही अशक्य नसते. स्वतःच्या साठलेल्या, सामान्यतः विस्मरणात गेलेल्या गैरसमजांवर आधारलेले पूर्वानुभव समजून घेतले तर असुरक्षिततेकडून सुरक्षित कवचाकडे वाटचाल शक्य होते पण दृष्टिकोन स्वच्छ, निरभ्र आणि पूर्वग्रहविरहित असावा. सकारात्मक नजरेने पूर्वायुष्याचा स्वीकार केला तर खालील पायऱ्या इच्छित स्थळी नेऊन पोहोचवितात.

काही कारणाने पूर्वी टाळलेलं संपूर्ण अथवा थोडंफार पुन्हा अनुभवता आलं तर प्रवास काहीअंशी सोपा होतो. शक्य असल्यास व्यावसायिक मदत घेता येते. मनाच्या स्थिरावस्थेला नेऊन ठेवणाऱ्या उपचार पद्धतीचा अवलंब करता येतो.

**त्यासाठी काही स्वयंसूचना-**

१) स्वतःच्या जवळीकीच्या शैलीचा पूर्वपरिचय असणे आणि तिचा वापर करून संवादाची द्वारे उघडी ठेवणे
२) भावनांना खुले द्वार देणे
३) समस्यांसाठी सुखरूप आणि विश्वासार्ह मार्ग निवडणे
४) हाताळणीत लवचिकता आणणे
५) सद्य मनःस्थितीचा विचार करून भावी पर्याय निवडणे
६) उपचार घेणारी आणि करणारी व्यक्ती यांच्यातील सलगीचा, निकटतेचा लाभ उठविण्याचा प्रयत्न करणे
७) बाल्यावस्थेतील आणि सद्य स्थितीतील अनुभवांची तुलना थांबविणे
८) आपली शैली आणि पूर्वानुभव अगदीच टाकाऊ नसून त्यांत सुयोग्य बदल करणे आणि नव्याने नात्यांची जोडणी करणे सहज शक्य असते.
९) आपले दुरावे, त्यांची कारणमीमांसा यांना शब्दांकित करणे आणि त्यांतून उदभवलेल्या परिस्थितीचा सामना करणे.

**उपसंहार -**

तीन भागात जवळीकीचे विविध पैलू पाहिल्यावर काही ठाम विधाने संभवतात-

(१) वेदनादायी भूतकाळ, आघातांच्या उरलेल्या स्मृती, निरुपयोगी समजूती आणि वर्तन यातून बाहेर पडण्याचे मार्ग आहेत.
(२) सध्या आयुष्यात असलेल्या जवळच्या-दूरच्यांशी असलेले नाते वारंवार तपासून बघण्यास हरकत नसते.
(३) आपला स्वभाव, आपल्या संवेदना जोपासणे, बदलणे यांत काही गैर नसते.
(४) बाल्यावस्थेतील मूळांकडे त्रयस्थपणे, साक्षीभावाने बघितल्यास अनेक प्रश्नांची उत्तरे असतात, हे जाणवते.
(५) एकेकाळी अंगिकारलेली जवळीकीची रचना भविष्यामध्ये अधिक चांगल्या अवतारात समोर आली तिचा बिनदिक्कत स्वीकार करणे !

अंतिमतः सत्य एकच - नकार, विग्रह (विभक्त), काहीतरी कायमचे हातून निसटून जाणे या साऱ्यांच्या आघातांचा, अनुभवांचा मानसिक स्वास्थ्यावर होणारा बरावाईट परिणाम जवळीकीमधून हाताळला जाऊ शकतो.

उकल
संजय सोनवणी

# हरवलेला गणपती भेटला!

**ज्येष्ठ उद्योजक पुनीत बालन ज्या प्रकारे पुणे शहरातील सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय उपक्रमांचे प्रायोजक आणि पालक झाले आहेत ही माध्यमांसाठी तरी स्वागतार्ह बाब असेलही पण त्यांच्या दानशूरतेमुळे काश्मीरमध्ये लाल चौकात गणपती पुन्हा सुरू झाला ही गोष्ट खरी नाही. मुळात लाल चौकात गेली ४१ वर्षापासून तेथील गलाई (श्रीनगरला राहणारे महाराष्ट्रीय) बांधव नियमित गणपती बसवतात. बालन यांच्या आर्थिक शक्तीमुळे कदाचित वृत्तपत्रांना ही वस्तुस्थिती छापने अडचणीचे आहे. मात्र ही वस्तुस्थिती महाराष्ट्राला माहिती पाहिजे. नाहीतर काश्मीरमधील गणेशोत्सवाचे जनक पुनीत बालन होते असा चुकीचा इतिहास लिहिला जाईल, पण ते मुळीच वास्तव नाही.**

आता घटनेचे ३७० कलम रद्द होऊन आणि काश्मीर राज्याचे द्विभाजन होऊन पाच वर्ष झाली आहेत. ज्यासाठी म्हणून हे आधीच दुर्बल केलेले कलम काढून टाकले त्या कारणांपैकी किती वास्तवात आली हा एक वेगळ्या चर्चेचा गंभीर प्रश्न आहे. आता कोणीही तेथे जमिनी खरेदी करू शकेल या भ्रामक वास्तवावर विसंबले, त्यापैकी किती लोकांनी तेथे प्लॉट घेऊन बंगले बांधले हा प्रश्न तर आता हास्यास्पद वाटेल. मुळात मुख्य भूमीतील भारतीयांना काश्मीरबाबत एकूणच अज्ञान असते आणि त्या अज्ञानाचा उपयोग ते द्वेष पसरवण्यासाठी करत आलेले आहेत हेही एक कटू वास्तव आहे.

खरे तर आम्हाला १९९० आधीच्या काश्मीरच्या समाज-सांस्कृतिक आणि आर्थिक इतिहासाबाबत माहिती नसते. १९४७ आधीच्या काश्मीरच्या इतिहासाबाबत तर घोर अज्ञान असते. एवढेच काय, काश्मीरमधील समाजव्यवस्था आणि मुख्य भूमीतील भारतीयांची समाजव्यवस्था यात खूप अंतर आहे, याचे ज्ञान तर लेखकांनाही नसते मग सामान्य लोकांची अवस्था काय असेल हे पण समजू शकतो. आपल्याला मान्य असलेली व्यवस्था तेथेही होतीच असा दुराग्रह अथवा गैरसमज करून घेऊन जे चित्र उभे केले जाते ते अन्यायाचे तर असतेच पण विशिष्ट संस्कृती कल्पनेतून काश्मीरच्या लोकांवर लादण्याचे अश्लाघ्य प्रयत्न त्यातून होतात. अलीकडेच मी एका लेखिकेने लिहिलेले काश्मीरचा सम्राट ललीतादित्य याच्यावरच्या कादंबरीचे हस्तलिखित वाचले. लेखिकेचे काश्मीरच्या आठव्या शतकातील सामाजिक स्थितीचे अज्ञान तर त्यातून स्पष्ट दिसलेच पण वर्तमानातील काश्मीरचे (म्हणजे कलम ३७० हटवल्यानंतरचे) तेथील स्थितीबद्दलचेही गहन अज्ञान दिसून आले. त्यांचे निवेदन असे होते की श्रीनगरच्या लाल चौकात एकही हिंदू नाही. या महिला कधीकाळी लाल चौकात गेल्या तरी कि नाही हा प्रश्न पडावा असे बेधडक निवेदन. आणि याला कारणही आहे. श्रीनगरमधील संवेदनशील मानल्या गेलेल्या लाल चौकात ना तिरंगा फडकत ना तेथे कधी गणपती बसत अशा वल्गना आपण ऐकल्याच असतील. ३७० रद्द झाल्यावर आता तेथे तिरंगाही फडकेल आणि गणपतीही बसवला जाईल अशा उन्मादी घोषणाही सुरु होत्या. अर्थात असे करण्याचीही हिम्मत नसलेले अशा वल्गना करत होते हेही विशेष! पण हे सत्य नव्हते. खरे, तर श्रीनगरमध्ये लाल चौकात पंचमुखी हनुमान मंदिर प्राचीन काळापासून आजही दिमाखात उभे आहे. खरे तर हे अनेक हिंदू देवतांच्या मंदिरांचे संकुल आहे. या मंदिरात सन्मानाने गणपती बसवायची गणेशोत्सावाची परंपरा ३७० रद्द होईपर्यंत गेली ३७ वर्ष सुरु होती. खरे तर कलम ३७० रद्द करतांना केंद्र सरकारने मोठे लष्कर काश्मीरमध्ये तैनात तर केलेच पण परराज्यातील हिंदू व यात्रेकरुंना काश्मीर सोडून जायचा आदेश दिला. त्यामुळे गणेशोत्सवाची तेथील परंपरा त्यावर्षी खंडित होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

**लाल चौक आणि मराठी बांधवः-**

लाल चौकाच्या परिसरातील सोनारांच्या दुकानांत कारागीर म्हणून सांगली-मिरज भागातील मराठी बांधव तेथे गेली अनेक दशके स्थिर झालेले होते. गणेशोत्सव ही खास मराठी परंपरा असल्याने तेथे दरवर्षी सांगली- मिरजमधुन गणपतीची मूर्ती पाठवण्यात येत होती आणि दिमाखाने गणेशोत्सव साजरा करण्यात येत होता. पण त्यावर्षी ५ ऑगस्ट रोजी घटनेचे कलम ३७० रद्द करण्यात आले. संभाव्य असंतोषावर नियंत्रण ठेवता यावे म्हणून एक अभूतपुर्व परिस्थिती काश्मीरमध्ये निर्माण झाली. संचारबंदी आणि मोबाईलसह सर्व इंटरनेट सेवा बंद करण्यात आल्या. काश्मीरबाहेरच्या नागरिकांना परत जायला सांगण्यात आले. त्यामुळे लाल चौक परिसरातील मराठी माणसंही नाईलाजाने गावाकडे परतली. त्यात त्या वर्षी सांगली भागातील पुराने अनावस्था ओढवली. त्यात काश्मीर खोर्यात खरोखर काय घडते आहे हेही कळायचे मार्ग बंद झाल्याने श्रीनगरला त्या वर्षी गणेशमुर्ती पाठवता येणार नाही हे स्पष्ट झाले. मूर्ती पाठवता आली तरी खूप झाले असते कारण मंदिराच्या पूजार्यांनी गणेशोत्सव साजरा केलाच असता. पुढे जे घडले ते एखाद्या चित्तथरारक कादंबरीलाही लाजवेल असेच...



गणेश मूर्ती वेळेत येत नाही हे पाहून तेथील पूजार्यांनी श्रीनगर-काश्मीरमध्ये राष्ट्र-ऐक्याचे काम करणार्या पुण्याच्या सरहद संस्थेचे कार्यकर्ते व श्रीनगरमधील सामाजिक कार्यकर्ते डॉ. अमित वांच्छू यांच्या कानावर ही परिस्थिती घातली. त्यांनी ही परिस्थिती समजावून घेत सरहद या काश्मीरशी जोडल्या गेलेल्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय नहार यांच्याशी संपर्क साधला. संजय नहार यांनी ही स्थिती समजाऊन घेतली. काहीतरी करतो. असे म्हणून संभाषण संपवले.

श्रीनगरला गणेशमूर्ती कोण पाठवू शकतो याची चाचपणी करण्यासाठी त्यांनी पुण्यातील काही नामवंत गणेश मंडळाशी संपर्क साधायला सुरुवात केली. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण बहुतेक मंडळांनी असमर्थता दर्शवली. शेवटी त्यांनी हुतात्मा बाबू गेनू गणपती मंडळाच्या बाळासाहेब मारणेंचे सहकार्य मिळविले. त्यांचे काही कार्यकर्ते गणेशमूर्ती घेऊन श्रीनगरला जातील असेही सांगितले. तो दिवस रविवार होता. संजय नहारांनी सुटकेचा श्वास सोडला. पण थोड्याच दिवसात जे कार्यकर्ते गणेशमूर्ती घेऊन जाणार हे नक्की झाले होते त्यांनी एकेक करून, काही ना काही कारणे सांगत असमर्थता दाखवायला सुरवात केली. तेही स्वाभाविक म्हणावे लागेल कारण काश्मीरमधील अभूतपूर्व तणावाच्या बातम्या येत असताना आपला जीव कोण धोक्यात घालणार? हे सारे होईपर्यंत मुळात काय चालले आहे याची मला कसलीही कल्पना नव्हती. मी कधीही या उत्सवात सहभाग घेतलेला नाही. मी गणेशाचा अभ्यासक असलो तरी कोणत्याही धार्मिक कर्मकांडावर माझा काडीएवढाही विश्वास नाही. संजय नहार यांना हे माहित असल्याने त्यांनी मला याची कल्पनाही दिली नाही. नेमके त्याच दिवशी सकाळी एक हलकीशी पावसाची सर पडली होती. निसरड्या झालेल्या रस्त्यावरून माझी स्कूटर घसरल्यामुळे मी पडलो आणि माझ्या डाव्या पायाचा गुढगा दुखावला. अंग शेकून निघाले. कसाबसा घरी आलो. इकडे संजय नहारांसमोर यक्षप्रश्न उभा राहिला कि श्रीगणेश श्रीनगरला निघायला सज्ज झाले आहेत पण आता ही मूर्ती घेऊन जाणार कोण आणि त्याची प्रतिष्ठापना श्रीनगरमध्ये होणार कशी?

मी झोपायला जायच्या तयारीत असताना शेवटी रात्री साडेआठच्या आसपास त्यांनी मला फोन केला. मला अत्यंत वेगात सर्व स्थिती सांगितली. मला सध्या धार्मिक ज्वर उसळत असल्याचे त्यांना माहित होतेच. गणेशाची प्रतिष्ठापना लाल चौकात या वातावरणात होण्याचे महत्वही माझ्या लक्षात आले आणि मी त्याच रात्री साडे-बाराच्या फ्लाईटने निघायला संमती दिली. तेव्हा पावणे नउ वाजलेले होते. मला गणपती घेऊन निघायचे असल्याने वेळेची हातघाई होती. मी राणीला (माझी पत्नी) माझ्या निघायची तयारी करायला सांगितले. तिने आश्चर्याने विचारले, कोठे जायचेय तुझे तांगडे आउट असताना. मी तिला शक्य तेवढ्या घाईत स्पष्टीकरण दिले. ती माझ्याकडे आश्चर्याने काही वेळ पाहताच राहिली. तू आणि गणपती बसवायला घेऊन जाणार? घरातल्या गणपतीलाही नमस्कार करताना तुला पाहिले नाही कधी...मी म्हणालो, हा गणपती राष्ट्राच्या ऐक्याच्या भावनेसाठी आहे. मला गेलेच पाहिजे. मग तिने माझे घाईने बॅग भरली. निघताना माझ्या हातात अजून एक गणेशाची छोटी संगमरवरी मूर्ती दिली आणि मला म्हणाली, हे गणपती फक्त दहा दिवसाचे असतात. पण मी देतेय हा कायमचा गणपती आहे. हा तेथे बसवून ये. ती छोटी मूर्ती सुरक्षित ठेवली आणि जायला निघालो.

रिक्षाने मी बाबू गेनू मंडळापर्यंत गेलो. तेथून गणेश मूर्ती ताब्यात घेऊन दोन तासांत रात्री बारा वाजता विमानतळावर पोहचलो. गणेशमूर्ती शाडूची असल्याने तिला नाजूकपणेच हाताळावे लागणार होते. एयरपोर्टवरील कर्मचार्यांनी उत्तम सहकार्य केले आणि मुर्ती मांडीवर घेऊन प्रवास करण्याची परवानगी दिली. दिल्लीपर्यंत हे ठीक होते. पण दिल्ली-श्रीनगर फ्लाईट्मध्ये हेच सहकार्य मिळेल काय याची साशंकता होती. पण शेजारी बसलेल्या सद्गृहस्थांनी या बॉक्समध्ये गणेशमूर्ती आहे हे समजताच अत्यंत प्रेमाने माझ्याशी वार्तालाप केला. श्रीनगर विमानतळावर ट्रॉलीपर्यंत तोच मूर्ती घेऊन आला आणि माझ्यासोबत त्याचे सामान घेऊन तळाबाहेर आला. त्या सद्गृहस्थाचे नाव होते मोहंमद आस्लम. काश्मीरचे लोक प्रेमळ आणि आतिथ्यशील आहेत हा माझा अनुभव १९९६ पासूनचा. पण या बदलल्या स्थितीत काश्मीरींचा क्षोभ, संशयाचे वातावरण आणि अस्वस्थतेमुळे त्यांची प्रतिक्रिया पुर्वी होती तशीच राहील याची खात्री नव्हती. पण या साशंकतेला पहिला तडा या सद्गृहस्थाने दिला.

अमित वांच्छू मला घ्यायला आलेलेच होते. त्यांच्याबरोबर मी निघालो तेव्हा श्रीनगरमध्ये चौका-चौकात निमलष्करी दलांचे जवान होते. सर्व दुकाने बंद होती. एखादा दुसरा हातगाडीवर फळे किंवा भाज्या विकणारा. एकीकडे सरकारी आदेश आणि त्याविरुद्ध निघणारे हुर्रियतसारख्या फुटीरतावादींचे फतवे. या कात्रीत सापडलेले दुकानदार धोका पत्करायला नको म्हणून शक्यतो दुकाने बंदच ठेवत होते. सरकारी कार्यालयांतही मोजकीच उपस्थिती. संपर्काची साधनेच नसल्याने बंदी असल्यासारखी अवस्था. अशा वातावरणात गणेशाची स्थापना कशी होईल आणि किती लोक येतील ही साशंकता माझ्या मनात होती. पण अमित निश्चिंत होता. काश्मिरी पंडित असूनही त्याला मात्र कोठे भय वाटत असलेले दिसत नव्हते.

साडेअकरा वाजता आम्ही लाल चौकात पोहोचलो. तेथे तर कडकडित बंद. झेलमच्या काठावरच पंचमुखी हनुमानाचे भव्य मंदिर. खरे तर हे मंदिर म्हणजे अनेक छोट्या मंदिरांचा समूह. मंदिरात काही भावीक होते. मंदिराचे मूख्य महंत कामेश्वरनाथांनी आमचे अत्यंत उत्साहाने स्वागत केले. शेवटी गणेशोत्सवाची परंपरा अबाधित राहणार याचाच सर्वांना आनंद. लाल चौकासारख्या संवेदनशील ठिकाणच्या मंदिराला कधी अतिरेक्यांचा उपद्रव झाला होता काय हे विचारल्यावर ते हसून म्हणाले की येथे हनुमंताला पीर मानत त्याची पूजा करणारे असंख्य मुस्लिम आहेत.

गणपतीची प्रतिष्ठापना करायची तर फुले, हार हवेतच. पण सारे बंद. हार आणायचे कोठून? मग दाऊद हकीम आणि अजहरने युक्ती लढवली. थोड्या वेळात येतो सांगून ते बाहेर पडले. उगवले परत ते दीड तासांनी. पिशवीत गुलाबाची फुले घेऊनच. मंदिरात बसून त्यांनीच हार ओवला. तोवर जम्मु-काश्मीरचे आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सचीव पांडुरंग पोळे आले होते. मग गणेश प्रतिष्ठापनेची सुरुवात झाली. मूर्ती आलीय ही वार्ता कळताच श्रीनगरमधील काही मंदिरांचे महंतही येऊन पोहोचले होते. भाविकांची गर्दी व्हायला सुरुवात झालेली होती.

काश्मीरी पद्धतीने पूजा सुरु झाली. नशीब असे कि त्याच दिवशी पन नावाचा माता पार्वतीने गणेशाला निर्माण केल्याचा काश्मिरी सण. काश्मिरी व शक पंचांगानुसार दोन्ही तिथी यंदा एकाच दिवशी आलेल्या. त्यामुळे आनंद-उत्साहाला उधान आलेले. मी म्हणालो...ही महाराष्ट्राने काश्मीरींना दिलेली प्रेम आणि सद्भावाची भेट. आणि काश्मीरी प्रथेनुसार प्रत्येक भाविकाच्या मनगटावर स्नेहाचा धागा बांधला जातो. हा एक वेगळाच अनुभव. अशा रितीने श्रीगणेशाची संस्थापना होऊन दहा दिवसांच्या गणेशोत्सवाची सुरुवात झाली. लाल चौकात तर गणपती बसतच नाही कारण मुस्लिम बसवू देत नाही हेही एक धादांत असत्य. तेथे गेली सदतीस वर्ष नित्यनेमाने गणेशस्थापना होत आली आहे.

मी आजही सांगतो, त्या दिवशी खरेच मला लोकमानसातून हरवलेला गणेश भेटला. काश्मीरचे भविष्य आज ना उद्या उज्ज्वल होईल याची आशा जागली. प्रेम आणि सहृदयता सर्वांच्या हृदयात जागेल याची आस निर्माण झाली. हाच माझा गणपती. संजय नहार हाच गणपती देशातील सर्वच तणावग्रस्त भागात बसवायचा प्रयत्न करत आलेत. माझाही त्यात खारीचा वाटा झाला एवढेच.

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# हरित नोकऱ्यांचा शाश्वत पर्याय



हरित नोकऱ्या देशासाठी खूप महत्त्वाच्या असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. या नोकऱ्या हवामान बदलाशी लढण्यास मदत करतील. जागतिक स्तरावर 'ग्रीन हायड्रोजन मिशन'ची स्थापना करायची आहे आणि त्या दिशेने काम सुरू आहे. अशा परिस्थितीत आगामी काळात हरित नोकऱ्या वाढण्याची दाट शक्यता आहे. असे झाल्यास देशातील तरुण या क्षेत्रात आघाडीवर असतील. पृथ्वीवर वेगाने हवामान बदल होत आहे. पाणी आणि जंगले यासारखी संसाधने कमी होत आहेत. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण करणाऱ्या अशा कामांची नितांत गरज आहे. त्यांना 'ग्रीन जॉब्स' म्हणतात.

'ग्रीन जॉब्स' अशा नोकऱ्या आहेत, ज्या आपल्या पर्यावरणाचे संरक्षण करण्यास किंवा सुधारण्यास मदत करतात. त्यांच्या कामाचा पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे पर्यावरणाला कोणतीही हानी होत नाही. कमी पाणी वापरून उत्पादन करणे किंवा कचरा कमी करणे, 'इको-फ्रेंडली' इमारती बांधणे किंवा प्रदूषणमुक्त वाहने बनविण्याचे मार्ग शोधणे असे ते पर्याय आहेत. जलविद्युत, सौर ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने यासारख्या क्षेत्रातील नोकऱ्यांना 'ग्रीन जॉब्स' म्हणतात. कचरा आणि प्रदूषण कमी करणे तसेच पर्यावरणाला कमी हानिकारक ठरणारे पदार्थ निर्माण करणाऱ्या कामाच्या पद्धतींना प्रोत्साहन देणे हा 'ग्रीन जॉब्स'चा उद्देश आहे. या माध्यमातून जंगल, नद्या, पर्वत या नैसर्गिक गोष्टींचे संरक्षण केले जाते. याशिवाय वाढती उष्णता, बदलत्या पावसाचे स्वरूप यासारख्या हवामानातील बदलांना सामोरे जाण्यासही त्या मदत करतात. एखादी कंपनी सौर ऊर्जा पॅनेल बनवते. हे फलक घर आणि कारखान्यांमध्ये बसवून वीज निर्मिती केली जाते. या कंपनीत काम करणारे लोक हरित नोकऱ्यांमध्ये गुंतले आहेत. नवे पर्याय कोळसा किंवा पेट्रोलसारख्या इंधनाची जागा घेऊ शकतील आणि प्रदूषण कमी करू शकतील अशी उत्पादने निर्माण करत आहेत.

'ग्रीन जॉब'चे विविध प्रकार आहेत; ज्यामध्ये सर्व प्रकारचे कौशल्य आणि आवड असलेले लोक काम करू शकतात. अक्षय ऊर्जेमध्ये काम करणारे लोक वारा, सूर्य आणि पाणी यासारखे स्वच्छ ऊर्जा स्त्रोत वापरण्याचे मार्ग शोधतात. कमीत कमी ऊर्जेचा वापर करून जास्तीत जास्त काम करण्याचे मार्ग यामधून सापडतात. यामध्ये इमारतींमध्ये वीज वाचवण्याचे मार्ग समजावून सांगणारे लोक, पर्यावरणपूरक घरे बांधणारे वास्तुविशारद आणि

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून भाषण करताना भारताच्या हवामान बदल धोरणात हरित नोकऱ्यांच्या महत्त्वाच्या भूमिकेचा उल्लेख केला. हरित नोकऱ्या (ग्रीन जॉब्स) म्हणजे नेमके काय, त्यात जनसामान्यांना कितपत संधी आहे आणि प्रथमच उल्लेख केल्या गेलेल्या या हरित नोकऱ्यांचे जागतिक महत्त्व काय, याचा हा खास आढावा.**

ऊर्जा-बचत उत्पादने बनवणाऱ्या डिझाइनर्सचा समावेश आहे. पर्यावरण व्यवस्थापनामध्ये जंगले, प्राणी आणि नैसर्गिक गोष्टींचे संरक्षण करणे समाविष्ट आहे. वन्य प्राण्यांबद्दल माहिती असलेले, जंगलांची काळजी घेणारे आणि पर्यावरणविषयक सल्ला देणारे लोक येथे येतात. त्याचप्रमाणे, कृषी क्षेत्रात अशा पद्धती आढळतात, ज्याद्वारे शेती आणि अन्न उत्पादन पर्यावरणासाठी चांगले आहे. हे लोक सेंद्रिय शेती करतात, शेतकऱ्यांना सल्ला देतात आणि अन्नपदार्थ वाचवण्याचे मार्ग शोधतात. 'ग्रीन ट्रान्सपोर्टेशन'मध्ये असे काम केले जाते; ज्यामुळे प्रदूषण कमी होते. यामध्ये इलेक्ट्रिक वाहने बनवणे, सायकल चालविण्यासाठी जागा निर्माण करणे, उत्तम वाहतूक व्यवस्था निर्माण करणे यांचा समावेश आहे.

भारताने २०७० पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याचे लक्ष्य समोर ठेवले आहे. त्यामुळे हरित नोकऱ्यांची मागणी झपाट्याने वाढत आहे. अनेक कंपन्या प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नवीन प्रकारची ऊर्जा शोधण्याचे काम करत आहेत. या कंपन्यांना पर्यावरणीय कौशल्य असलेल्या लोकांची गरज आहे. 'स्यू', 'एनआरडीसी इंडिया' आणि 'स्किल कौन्सिल फॉर ग्रीन जॉब्स' यांच्या संयुक्त अभ्यासानुसार, २०२२ मध्ये भारतातील सौर आणि पवन ऊर्जा क्षेत्रात ५२ हजार ७०० नवीन कामगार घेतले गेले. २०२१२२ च्या तुलनेत ते आठ पट जास्त आहेत. पवन ऊर्जा क्षेत्रात फारच कमी म्हणजे ६०० नवीन कामगार भरती झाले. २०२२ मध्ये सौर आणि पवन ऊर्जा क्षेत्रात एकूण १.६४ लाख कामगार होते. २०२१ च्या तुलनेत ते ४७ टक्के अधिक आहे. 'लिंक्ड इन'च्या 'ग्लोबल स्किल्स रिपोर्ट' २०२३ नुसार, २०२२ ते २०२३ दरम्यान हरित जॉब करणाऱ्या लोकांच्या संख्येत सरासरी १२.३ टक्के वाढ झाली आहे. त्याच वेळी हरित कौशल्ये आवश्यक असलेल्या नोकऱ्यांची संख्या दुप्पट झाली आहे. 'ग्रीन इंडस्ट्री आऊटलूक'च्या अहवालानुसार सध्या भारतात सुमारे १.८५ कोटी लोक हरित नोकऱ्या करीत आहेत. जगातील सर्व देश पर्यावरण स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करीत असून प्रदूषण कमी करण्यावर भर देत आहेत. भारतही या बाबतीत मागे नाही. त्यामुळे पर्यावरण वाचवण्यास मदत करणाऱ्या अशा कामांना मोठी मागणी आहे. 'स्किल कौन्सिल फॉर ग्रीन जॉब्स'च्या अहवालानुसार २०४७ पर्यंत भारतात सुमारे ३.५ कोटी हरित नोकऱ्या निर्माण होऊ शकतात. या नोकऱ्या वेगवेगळ्या क्षेत्रात असतील.

इलेक्ट्रिक वाहनांच्या क्षेत्रातही बरेच नवीन रोजगार निर्माण होणार आहे. पुढील १० वर्षांमध्ये या क्षेत्रामध्ये दरवर्षी ९० टक्के वाढ होऊ शकते. इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीमुळे सुमारे एक कोटी प्रत्यक्ष आणि पाच कोटी अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण होऊ शकतात. कारण वाहनांच्या निर्मितीबरोबरच त्यांची दुरुस्ती, चार्जिंग स्टेशन उभारण्यासारखे कामही खूप महत्त्वाचे आहे. याशिवाय जुन्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची योग्य विल्हेवाट लावणे, पाण्याचा योग्य वापर, वस्त्रोद्योग पर्यावरणपूरक बनवणे, पर्यावरणाला हानी न पोहोचणारी घरे बांधणे, ही अशी क्षेत्रे आहेत, जिथे नोकऱ्यांची शक्यता सर्वाधिक आहे. सध्या शेती आणि खाद्यपदार्थांच्या उत्पादनांच्या नवीन पद्धतींकडेही लक्ष दिले जात आहे. हरित ऊर्जेला चालना देण्यासाठी भारत सरकारने अनेक पावले उचलली आहेत. प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना, ग्रीन एनर्जी कॉरिडॉर, हायब्रीड आणि इलेक्ट्रिक वाहने, इंटरनॅशनल सोलर अलायन्स ही त्याची काही उदाहरणे आहेत.

प्रत्येक घरात वीज पोहोचविणे हे 'प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजने'चे उद्दिष्ट आहे. लोकांना वीज पुरविण्यासोबतच भविष्यात सौरऊर्जेसारखे हरित पर्याय स्वीकारण्याचा मार्गही यामुळे खुला झाला आहे. 'ग्रीन एनर्जी कॉरिडॉर' अंतर्गत 'पॉवर लाईन्स'चे जाळे तयार केले जात आहे. त्यातून वारा आणि सूर्यापासून निर्माण होणारी वीज देशाच्या विविध भागात पोहोचविवली जाऊ शकते. यामुळे हरित ऊर्जेचे उत्पादन आणि वापर वाढण्यास मदत होईल. इलेक्ट्रिक वाहनांचा वेगवान अवलंब आणि उत्पादन योजनेचा उद्देश इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणे आहे. त्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि देशात इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन वाढेल. भारत या संघटनेचे नेतृत्व करत आहे. स्वच्छ इंधन म्हणून हायड्रोजनचा पर्याय विकसित करणे हे राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशनचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि ऊर्जा सुरक्षा वाढेल. पर्यावरणाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम न करता पृथ्वी आणि तिच्या कल्याणाचे रक्षण करणे, मानवी विकासाचे रक्षण करणे हे 'ग्रीन जॉब्स'च्या श्रेणीमध्ये मोडणारे व्यवसाय आहेत.


श्रमिक बाजारपेठेत या नोकऱ्या वेगाने वाढत आहेत. कारण हवामान बदलाच्या घटनांची सतत वाढत जाणारी वारंवारता आणि त्यामुळे सजीव परिसंस्थांना होणारे नुकसान पाहता पृथ्वीच्या आरोग्याकडे लक्ष देण्याचा कल वाढत आहे. २०२२ च्या एका अहवालानुसार २०२६ पर्यंत ऊर्जा संरक्षण आणि पर्यावरणीय स्थिरतेसाठी २.४ ते २.६ दशलक्ष रोजगारांची आवश्यकता असेल. ग्रीन किंवा 'इकोलॉजिकल इकॉनॉमी'ची कल्पना प्रत्यक्षात २००६ मध्ये ब्रिटिश सरकारने सुरू केलेल्या हवामान बदल आणि पर्यावरणीय जोखमींच्या अभ्यासातून पुढे आली. हरित अर्थव्यवस्था ही सामाजिक आणि पर्यावरणीय टिकाऊपणाला प्रोत्साहन देणारी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी गुंतवणुकीला पाठिंबा देऊन शाश्वत विकास वाढविणारी आहे. पर्यावरणाचे रक्षण करणाऱ्या आणि शाश्वत विकासाला चालना देणाऱ्या हरित करीअरमध्ये श्रम बाजार वाढत आहे. २०३० पर्यंत जागतिक स्तरावर एकट्या अक्षय ऊर्जा क्षेत्रात किमान ३८ दशलक्ष नोकऱ्या असतील. या अहवालानुसार ऊर्जा क्षेत्रातील नोकऱ्यांची संख्या १३९ दशलक्षपर्यंत वाढू शकते. त्यात ऊर्जा कार्यक्षमता, इलेक्ट्रिक वाहने, पॉवर/लवचीकता प्रणाली आणि हायड्रोजन क्षेत्रातील ७४ दशलक्ष नोकऱ्यांचा समावेश आहे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

**ज्येष्ठा आणि कनिष्ठा या माहेरवाशिणींचे काल घरोघरी आगमन झालेले आहे. स्वत:ची, परिवाराची, समाजाची आणि पर्यायाने राष्ट्राच्या सुखसंपन्नतेची कामना करण्याचा हा सण. या महालक्ष्मींचे आज आपण पूजन करणार आहोत. त्यांना भोजन-नैवेद्य अर्पण करणार आहोत. धनधान्याने विपुल अशा निरामय संपन्नतेची आपण कामना करणार आहोत. लक्ष्मीच्या आशीर्वादाची याचना करणार आहोत. तिच्या आराधनेचे 'श्रीसूक्त' यापेक्षा वेगळे काय सांगते?**

प्रासंगिक

प्रकाश एदलाबादकर

# कृषिसंपन्न जीवनाची कामना : श्रीसूक्त



**मानातीतप्रथित विभवां मंगलं मंगलानां। वक्ष:पीठीं मधुविजयीनीं भूषयंतीं स्वकांत्या।। प्रत्यक्षानुश्रविकमहिमप्रार्थिनीनां प्रजानां। श्रेयोमूर्ति, श्रियमशरणास्त्वां शरण्याम प्रपद्ये।। कल्याणनामविकलनिधि: कापि कारुण्यसीमा। नित्यमोदा निगमवचसां मौलिमंदारमाला।। संपद दिव्या मधुविजयिन: संनिधत्तां सदा मे। सैषा देवी सकलभुवनप्रार्थनाकामधेनु:।।**

आचार्य श्रीवेदान्तदेशिक यांनी रचलेल्या 'श्रीस्तुती'मधील वरील दोन श्लोक 'श्री'चे म्हणजेच लक्ष्मीचे मंगल, दिव्य, कामदायक आणि कल्याणमय स्वरूप विशद करतात. लक्ष्मी ही चंचल असते असे म्हणतात. परंतु, लक्ष्मीने हे चंचल रूप का बरे धारण केले असेल? आपल्या आशीर्वादाने मानव उन्मत्त होतो, तो अहंकारी होतो, धनमत्त माणसे अनिर्बंध लालसेने वागतात, याची तिला कल्पना आली म्हणूनच, ती 'चपला' आणि 'चंचला' झाली. ती आपल्या ठायी स्थिर राहावी, तिने आपले घर कधी सोडू नये, तिचा वरदहस्त सतत आपल्यावर असावा यासाठी मानवाची धडपड अनादिकालापासून सुरू आहे. या 'श्री'ची आराधना आणि आळवणी अनादिकालापासून मानव करीत आला आहे; आजही करतो आहे आणि पुढेही करीत राहील. या 'श्री'चे पूजन करण्याचे अनेक सण आणि कुळाचार आपल्या महाराष्ट्रात चैत्रापासून फाल्गुनापर्यंत आहेत. सर्व कुटुंबीयांना एकत्र आणणारा आणि भाद्रपदात येणारा महालक्ष्मीचा कुळाचार हा त्यापैकी अत्यंत महत्त्वाचा सण. देवीचे रूप कोणतेही असो, तिला श्रीसूक्ताने अभिषेक करणे, हा तिच्या षोडषोपचार पूजाविधीतील एक महत्त्वाचा भाग असतो. महालक्ष्मीच्या पूजनात अग्रभागी असलेल्या या 'श्रीसूक्ता'चे मर्म आहे तरी काय?

**श्री'चा पूर्णार्थ -** श्रीसूक्त' हे ऋग्वेदाच्या परिशिष्ट सूक्तात, खिलसूक्तात आढळते. या सूक्तात पंधरा ऋचा, एक फलश्रुतीची ऋचा, शिवाय नऊ ऋचांची एक स्वतंत्र फलश्रुती आहे. श्रीचे सूक्त म्हणजे केवळ लक्ष्मीचेच आराधन अशी आपली कल्पना आहे. लक्ष्मी म्हणजे पैसा, वैभव, धनकनक संपन्नता एवढेच नाही. 'श्री' या शब्दात अनेक शुभगुणांचा दरवळ आहे. या सुगंधाचा आस्वाद घ्यायचा असेल, तर त्याची पृष्ठभूमी समजून घेणे आवश्यक आहे. सत्ता, संपत्ती, अधिकार, आरोग्यसंपन्न जीवन, धान्य, धनवैपुल्य, पशुधन, पुत्रसंतती आणि यासाठी शंभर वर्षांचे दीर्घ आयुष्य हे सर्व एकत्रितपणे 'श्री' या शब्दात सामावलेले आहे. 'श्री'चा हा आविष्कार वरवर पाहता ऐहिकच वाटतो.

बाह्यजीवनाला व्यापणारा जाणवतो. तिच्या आगमनाने 'बाह्या-अलक्ष्मी' दूर होते हे जरी खरे असले, तरी त्याचबरोबर 'अंतराय माया' निर्माण होते. तीच आपल्यात ऐश्वर्याचा मद निर्माण करते. परिणामी लक्ष्मी 'अपगामिनी' होते; म्हणजे वाईट मार्गाने निघून जाते. बाह्या-अलक्ष्मी आणि अंतराय माया एकाच वेळी दूर व्हाव्या म्हणून 'तपासानुदंतु' सांगितला आहे. **आदित्यवर्णे तपसो ड धिजातो। वनपस्पतिस्तव वृक्षोथ बिल्व:।। तस्याफलानि तपासानुदंतु। मायांतरायाश्च बाह्या अलक्ष्मी:।।**

म्हणूनच लक्ष्मीच्या चंचलतेचे मर्म आपण समजून घेतले पाहिजे. बल आणि उन्माद हे लक्ष्मीचे पुत्र आहेत, असे पुराणात वर्णन आहे. लक्ष्मी ही जेव्हा, केवळ उपभोगाचे साधन होते, तेव्हा हे दोघे जन्माला येतात. यासाठी लक्ष्मी ही केवळ सत्पात्रांच्याच हाती राहावी, अशी कामना या सूक्ताच्या रचनाकारांनी त्या काळी केली होती. आज नेमके याच्या उलट चित्र दिसते आहे आणि त्याचे परिणामही आपल्याला प्रत्यही दूरचित्रवाणीवर दिसताहेत. परिश्रमानेच श्रीप्राप्ती होते. नव्हे, ती टिकवून ठेवता येते. परिश्रम आणि उपभोग यांच्यात एकदा का दुरावा निर्माण झाला की अलक्ष्मी वरचढ ठरते. लक्ष्मीला नेहमी आईच्याच सन्मानाने वागवावे. तिच्या कृपेने पुष्ट आणि तुष्ट व्हावे. लक्ष्मीला आपली बटीक म्हणून वागवायला सुरुवात केली की, भ्रष्टचर्य आणि नष्टचर्य यायला वेळ लागत नाही.

**अभाव व दारिद्र्य दूर कर -** वैदिक समाजाने दारिद्र्याची खोटी भलावण कधीच केली नाही. दारिद्र्याने माणसाचे जीवन कोळपून जाते. सर्वच वस्तूंच्या अभावाने माणसाचे सुसंस्कार आणि सद्गुण नष्ट होतात. आरोग्य, सौंदर्य, बल नष्ट होतात. भूक, तहान, दारिद्र्य यांनी गुणनाश होतो. हे सर्व अलक्ष्मीचे प्रताप आहेत. म्हणूनच **क्षुत्पिपासामलां ज्येष्ठामलक्ष्मीं नाशयाम्यहं। अभूतिमसमृद्धिंच सर्वां निर्णुद मे गृहात।।** अलक्ष्मीला दूर कर. माझ्या घरातून हाकलून लाव' अशी श्रीची प्रार्थना सूक्तकारांनी केली आहे. 'अलक्ष्मी'ला घालवून दे, अशी प्रार्थना केल्यानंतर येणाऱ्या ऋचा तर पूर्णत: कृषिवल संस्कृतीच्या रक्षणार्थ केलेली प्रार्थना आहे.

**श्रीचे साक्षात रूप -** या सूक्तातून दिसणारे श्रीचे साक्षात स्वरूपही सूक्ष्मतेने बघण्यासारखे आहे. ही लक्ष्मी सोन्याच्या रंगाची आहे. सोन्याचांदीच्या माळा धारण करणारी आहे. चंद्राप्रमाणे आल्हादक कांतीची आणि सुस्मितां आहे. कधी कधी ती तेजस्वी भासते. ती नित्यपुष्टा आहे. ही लक्ष्मी दयाळू आहे. मनोहर आहे. स्वत: तृप्त असून इतरांना तृप्त करणारी आहे. ती देवांनाही आश्रय देणारी आणि उदार आहे. या सर्वगुणवर्णनाचा साकल्याने विचार केला, तर शेतात तरारलेल्या पिकाच्या रूपात, शरदहेमंतच्या काळातील ही धान्यलक्ष्मी आहे, असे जाणवते. या पिकाला जन्म देणाऱ्या 'सुजलाम्-सुफलाम्' भूमीचे वर्णनही त्यात आलेच. सूर्याच्या उगवत्या किंवा मावळत्या किरणांमध्ये हे कृषिवैभव बघितले, तर या वर्णनाचा प्रत्यय येतो. शेतात कापणीला आलेल्या पिकांकडे बघावे आणि या वर्णनाचा अनुभव घ्यावा. शेतातील एका भागात किंवा शेत विस्तीर्ण असल्यास ठिकठिकाणी भरलेले तलाव, त्यातील कमळे, त्या तलावातून वाहणारे पाणी म्हणजे स्निग्ध भावाचे पाण्याचे पाट, बांधावर खतासाठी ठेवलेले गोमयाचे ढीग, पिकून पिवळी झालेली धान्याची लांब पाती वाऱ्याच्या लाटेबरोबर हरिणीच्या चापल्याने सळसळणारी पिके, कापणीला आलेल्या भरदार पिकांचा गंध असे दृश्य बघताच निसर्गाच्या सान्निध्यात रमणाऱ्या आणि कृषिजीवन जगणाऱ्या आर्ष ऋषींच्या मनात लक्ष्मीचे हेच रूप प्रकट झाले असल्यास नवल काय? कृषिसंस्कृतीच्या वास्तवाला कुठेही बाधा न आणता, चेतनगुणोक्तीचा उपयोग करून शेवटी कृषी हीच आपली खरी लक्ष्मी आहे, असे पटवून देणारे हे 'श्रीसूक्त' एक उत्कृष्ट रूपक आहे.

**परिश्रमांशिवाय श्रीप्राप्ती नाही-** या सूक्तातील अन्य बारकावेही समजून घेणे आवश्यक आहे. येथे श्रीप्राप्तीसाठी जातवेदानंतर प्रार्थना आहे ती कर्दमाची. याच्या योगाने श्री अपत्यवती झाली आहे. चिक्लीत हा दुसरा ऋषी. याने व कर्दमाने लक्ष्मीसह आपल्या घरी येऊन राहावे, अशी प्रार्थना आहे. कर्दम आणि चिक्लीत ही दोन्ही नावे अर्थपूर्ण आहेत. कर्दम म्हणजे चिखल आणि चिक्लित म्हणजे ओलावा. चिखलात-ओलाव्यात बी चांगले रुजते. अशा प्रकारे कर्दमाच्या योगाने धान्यलक्ष्मी अपत्यवती होते. म्हणून आपल्या जमिनीत ओलिताची सोय असावी, ही ऋषींची प्रार्थना आहे. या धान्यसमृद्धीतूनच देवांना आहुती मिळते म्हणून ती देवाजुष्टा आहे. अर्थशून्य श्रम असतील तर प्रत्यक्ष देवही मदत करीत नाही. डोळस परिश्रम असतील तरच देव साह्य करतो अन्यथा नाही. यामुळेच कृषी दुराधर्षा झाली आहे. या सूक्तात जातवेदाची प्रार्थना यासाठीच केली आहे. आज उपभोगाची अनेक साधने उपलब्ध आहेत. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाने त्यात भर घातली आहे. आजचे सुखसाधन दुसऱ्याच दिवशी टाकाऊ होते. साधनांमधील वैविध्यही चकित करणारे आहे. त्यातून प्राप्त होणाऱ्या सुखाची प्रतही बदललेली आहे. उपभोग आणि उपभोग्य वस्तूचे निर्माते यांच्यातील परस्पर वैयक्तिक जिव्हाळा संपल्यात जमा आहे. उरलेला आहे तो केवळ निर्जीव क्रयविक्रय व्यवहार आणि 'अर्थ'पूर्ण पण कोरडा स्वार्थ! म्हणूनच आपले कर्तव्य करीत शंभर वर्षे जगावे ही निकोप, नि:स्वार्थी आणि निरामय काम ना आर्ष ऋषींनी केली होती. उपभोगाची लालसा आणि त्यातून मिळणारा विकृत आनंद त्यांना नको होता. त्यांना जीवनाच्या मूळ प्रवाहाशी एकरूप व्हायचे होते. आज आपले बहुतेक सुखोपभोग हे 'रेडिमेड' आहेत. त्यामुळे त्यातील लज्जत निघून गेली आहे. आज पैसा भरपूर आहे, पण मन: शांती नाही. असे का होते, याचे उत्तर श्रीसूक्तात दडलेले आहे. जगण्यासाठी अर्थार्जन हवेच. परंतु अर्थार्जनाच्या मुळाशी जे परमेश्वरी अधिष्ठान हवे असते त्याचाच आज अभाव आहे. पैसा कोणत्या मार्गाने कमवावा आणि कोणत्या मार्गाने किती खर्च करावा, याचे भान नाहीसे झाल्याची भीती निर्माण झाल्याचे वाटते. जीवनावर सर्वार्थाने प्रेम करा न जातु काम: कामानां उपभोगेन शाम्यति उपभोगाची तहान उपभोगाने शमत नाही. असे वचन महाभारताच्या आदिपर्वात ययातीच्या तोंडी आहे. श्रीसूक्ताने जीवनावर प्रेम करण्याची आणि सुखोपभोगांचा आनंद एका मर्यादेत घेण्याची शिकवण दिली आहे. म्हणूनच श्रीसूक्ताने महालक्ष्मीचा अभिषेक करताना खालील ऋचेनुसार आचरण करायला हवे. न क्रोधो न च मात्सर्यं न लोभो नाशुभा मति:। भवन्ति कृतपुण्यानां भक्त्या श्रीसूक्त जापिनां।। म्हणूनच आर्ष ऋषींनी धान्याच्या गोण्या मागितल्या नाहीत तर ते पिकविणारी सुजलाम् सुफलांम् भूमी मागितली. दह्यादुधाने भरलेले घट मागितले नाहीत तर ते देणारे पशुधन मागितले. कोणतीही संपन्न संस्कृती मागितली नाही तर ती संस्कृती निर्माण करणारे पुत्र पौत्र मागितले. यासाठीच श्रीवर्चस्व आणि शतसंवत्सर दीर्घायु मागितले. निरामय जीवनाचा संदेश श्रीसूक्त म्हणजे अर्थव्यवहाराचे आणि कृषिसंस्कृतीचे वैदिक तत्त्वज्ञान आहे.

मागील दाराने आलेली लक्ष्मी अपव्ययात निघून जाते, हे शाश्वत सत्य आहे. वाईट मार्गाने मिळविलेला पैसा त्याच मार्गाने निघून जातो, हे सतत लक्षात ठेवायला हवे. धन कमाविण्याच्या आणि खर्च करण्याच्या सुसंस्कृत अभिरुचीचे दर्शन या सूक्तात आहे. आजच्या गतिमान आणि उपभोगप्रधान जीवनशैलीत अनुशासन आणि सौहार्द हवे असेल तर आज ज्येष्ठा आणि कनिष्ठा यांना श्रीसूक्ताने अभिषेक करताना त्यातील शिकवण आचरणात आणणे, हेच तिच्या पूजेचे फलित असायला हवे.